नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : २५६ | किंमत : ४ रूपये

Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक समर्थ गांवकरी
महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ मुंबई...
AVP NEWS | समर्थ गांवकरी NEWS
॥ जय भगवान ॥
समर्थ गांवकरी
संपादक : डॉ.विश्वास आनंदराव आरोटे
मा.नानजीभाई खेमजीभाई ठक्कर
न्याय, निष्पक्ष आणि निर्भीड पत्रकारिता... हीच आमची ओळख! | बातम्या, जाहिराती व सदस्यता साठी संपर्क साधा.

# महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

दशरथ चव्हाण
मॅनेजिंग डायरेक्टर
आदर्श इंजिनिअरिंग सर्विसेस
जनरेटर विक्री व दुरुस्ती
१५ के व्ही ए पासून २००० के व्ही ए
जनरेटर विक्री | दुरुस्ती व देखभाल | तज्ज्ञ तंत्रज्ञ | विश्वासार्ह सेवा वेळेत काम
संपर्क
+91-8286562340 / 9004511593
8652653990 / 8286562350
Mumbai off.: 203, Kokn Apt., Plot No. 1053, Sector - 5
Land Mark Mayur Bar Hotel, KoparKhairane, Navi Mumbai 400 709.
Pune Off.: At Post Vadaj, Taluka Junnar, Dist.- 410 502
Email: dasharathschavan@gmail.com | Website: www.adarshengineering.net

मंगळवार, दि. ०१ सप्टेंबर २०२६
मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## थोडक्यात...

### पाऊस रुसला!

नागपूर (स. गांवकरी) : ऑगस्ट महिन्यात पावसाने मोठी तूट नोंदवल्यानंतर आता सप्टेंबरमध्येही देशात सरासरीपेक्षा कमी पाऊस पडण्याची शक्यता आहे. सप्टेंबर महिन्यात देशभरातील पाऊस दीर्घकालीन सरासरीच्या (एलपीए) ९१ टक्क्यांपेक्षा कमी राहण्याची शक्यता भारतीय हवामान खात्याने व्यक्त केली आहे. सप्टेंबर महिन्यात देशातील पावसाची दीर्घकालीन सरासरी १६७.९ मिलिमीटर आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार, सप्टेंबरमध्ये देशाच्या बहुतांश भागांत पावसाचे प्रमाण सरासरीपेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे. मात्र, उत्तर-पश्चिम, ईशान्य, पूर्व आणि पूर्व-मध्य भारतातील काही भागांत तसेच दक्षिण-पूर्व द्वीपकल्पीय भारतातील काही तुरळक भागांत सरासरी ते सरासरीपेक्षा अधिक पाऊस होण्याची शक्यता आहे. त्यामुळे देशभरात पावसाचे वितरण असमान राहण्याचे संकेत आहेत.

### प्रारुप मतदार यादीत दोन कोटी नावांना कात्रीमतदार

मुंबई (स. गांवकरी) : राज्यातील मतदारयाद्यांच्या विशेष सखोल फेरतपासणी (एसआयआर) मोहिमेअंतर्गत राज्यातील २ कोटी ०६ लाख नावांचा प्रारुप मतदारयाद्यांमध्ये समावेश होऊ शकलेला नाही. मृत व दुबार नावे वगळता अन्य सर्व मतदारांना पुन्हा नाव नोंदविण्यासाठी महिनाभराची मुदत देण्यात आल्याची माहिती राज्याचे मुख्य निवडणूक निर्णय अधिकारी एस. चोकलिंगम यांनी दिली. राज्यातील सर्व २८८ विधानसभा मतदारसंघांच्या प्रारुप मतदार याद्या सोमवारी प्रसिध्द करण्यात आल्या. यात जुन्या मतदार यादीतील सुमारे दोन कोटी मतदारांची नावे विविध कारणांनी समाविष्ट करण्यात आलेली नाहीत. मृत व दुबार नावे वगळता आधीच्या मतदारयाद्यांमध्ये नावे असलेल्या पण प्रारुप यादीत स्थान न मिळालेल्या दीड कोटी मतदारांना पुन्हा नाव नोंदविता येऊ शकेल. राज्यात एकूण ९कोटी ७८ लाख ५४ हजार ४९ मतदारांच्या मतदार याद्यांची संखोल तपासणी करुन या याद्या परिपूर्ण आणि अद्ययावत करण्यासाठी निवडणूक आयोगामार्फत गेले तीन महिने राज्यभर विशेष मोहिम राबविण्यात आली होती. या मोहिमेला मतदारांचा अधिकाधिक प्रतिसाद मिळावा यासाठी तीनवेळा मुदत वाढही देण्यात आली होती. मतदारांकडून गणना प्रपत्र भरुन घेऊन त्याच्या आधारे प्रारुप मतदार यादी जाहीर करण्यात आली असून त्यात ७ कोटी ७१ लाख ६५ हजार ५६२ (७८.८६टक्के) मतदारांना समाविष्ट करण्यात आले आहे.

### अण्णा हजारेंची प्रकृती बिघडली

मुंबई (स. गांवकरी) : ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांची प्रकृती बिघडली आहे. त्यांना मुंबईतल्या बॉम्बे रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. अण्णा हजारे यांची प्रकृती अचानक बिघडल्याने त्यांना मुंबईतील प्रसिद्ध बॉम्बे हॉस्पिटलच्या अतिदक्षता विभागात दाखल करण्यात आले आहे. सध्या डॉक्टरांचे एक विशेष पथक त्यांच्या आरोग्यावर बारीक लक्ष ठेवून असून त्यांच्यावर तातडीने उपचार सुरू आहेत. समाजसेविका अंजली दमानिया यांनी एक पोस्ट करुन अण्णा हजारेंची प्रकृती बिघडल्याची माहिती दिली आहे. तसंच त्यांची प्रकृती आता स्थिर आहे असंही त्यांनी म्हटलं आहे. ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांना बॉम्बे हॉस्पिटलच्या ICU मध्ये दाखल करण्यात आल्याची बातमी अत्यंत चिंताजनक आहे. तीव्र डिहायड्रेशन, व्हायरल इन्फेक्शनमुळे त्यांच्यावर डॉ. गौतम भन्साळी यांच्या देखरेखीखाली उपचार सुरू आहेत. आत्ताच डॉ. भन्साळी यांच्याकडे त्यांच्या प्रकृतीची चौकशी केली. ते स्टेबल आहेत असे त्यांनी सांगितले.

# सत्यापलापाविरोधात लढाई

## कार्यपद्धती बदलण्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे भाजपा कार्यकर्त्यांना आवाहन



**फडणवीस म्हणाले....**

‘वंदे मातरम’ गीताहून मोठे मातृसत्ताक पद्धतीचे दुसरे कुठलेचे प्रतीक नाही.
काँग्रेस आणि ‘यूपीए’मधील पक्ष महिला आरक्षणाचे मारेकरी.
राहुल गांधी यांचा पुण्यातील कार्यक्रम ‘झूट की गूंज’.
गणेशोत्सव सांस्कृतिक पद्धतीने कसा साजरा करायचा,
याचे उदाहरण पुण्याने घालून द्यावे.

पुणे : (स. गांवकरी)

‘विरोधकांच्या सत्यापलाचा मुकाबला करायचा असेल, तर ते वापरतात, तीच अस्त्रेही लागतील, शस्त्रेही लागतील आणि कार्यपद्धती त्यांच्यापेक्षा वरचढ लागेल,’ असा कानमंत्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना सोमवारी दिला. ‘भाजपच्या विचारधारेला विरोध करण्याची विरोधकांची क्षमता संपल्यामुळे आता समस्या उकरून काढल्या जात आहेत. या खोट्या कथानकाविरोधात लढाई करण्यासाठी कार्यपद्धती बदलावी लागेल,’ असा संदेश त्यांनी दिला.

भाजपची प्रदेश कार्यकारिणीची बैठक पुण्यात झाली. या बैठकीच्या समारोपावेळी फडणवीस बोलत होते. पक्षाने युवा पिढीपर्यंत पोहोचण्यावर भर देण्यासाठी काय करायला हवे, याचाही उहापोह त्यांनी भाषणात केला. संज्ञापनाचे, संवादाचे माध्यम बदलले असल्याची जाणीव करून देतानाच फडणवीस यांनी, नवी कार्यपद्धती कशी असली पाहिजे, यावर टिप्पणी केली.

ते म्हणाले, ‘आजची पिढी सर्व माहिती मोबाइलवर वाचते, पाहते. त्यांचा कल ४० ते ६० सेकंदांत तयार केलेल्या बातम्या पाहण्याकडे दिसतो. या बातम्या त्यांच्यापर्यंत पोहोचविण्याचे माध्यम ‘इन्स्टाग्राम’ आहे. बातम्यांची ४० टक्के वाहतूक या माध्यमावर होते. पण, आपल्यापैकी ९० टक्के लोक अजून फेसबुकमध्ये अडकले आहेत. फेसबुक किंवा व्हॉट्सअॅप आवश्यक आहेच, पण खोट्या कथानकाचा मुकाबला करण्यासाठी अस्त्रेही तीच लागतील, शस्त्रेही तीच लागतील आणि कार्यपद्धती आणखी वरचढ लागेल.’ ‘विरोधकांनी भाजपच्या हिंदुत्वाच्या विचारसरणीला विरोध केला. राम मंदिराला विरोध दर्शविला. त्यामुळे लोकसभा निवडणुकीत त्यांना पराभूत व्हावे लागले. विचारसरणीला विरोध करून उपयोग होत नाही, हे लक्षात आल्यामुळे त्यांनी राम मंदिरातील दानपेटीतील घोटाळ्याचा मुद्दा पुढे करून खोटे कथानक पसरविण्याचा प्रयत्न केला. विरोधकांचे पुढील लक्ष्य नाशिक येथे होणारा कुंभमेळा आहे. त्यामुळे विरोधकांचे पोपट कुंभमेळ्यातील कामात भ्रष्टाचार झाल्याचा आरोप करत आहेत,’ असे फडणवीस म्हणाले. ‘देश आत्मनिर्भरतेकडे वाटचाल करत असल्याचे जगातील काही शक्तींना पाहवत नाही. भारताला वेळीच रोखले नाही, तर पुढे रोखता येणार नाही, हे माहिती असल्यामुळेच या शक्तींनी कार्यपद्धतीत बदल केला आहे. ते ज्यांचा वापर करत आहेत, त्यापैकी पाच टक्के लोकांना आपला वापर होत असल्याचे माहिती आहे. मात्र, ९५ टक्के लोकांना ते माहिती नाही. त्यामुळे अजाणतेपणे ते या शक्तींबरोबर जात आहेत,’ असेही त्यांनी सांगितले. ‘काँग्रेसने नक्षलवादापासून स्फूर्ती घेऊन देशात अराजक माजविण्याचा विडा उचलला आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अंतिम भाषणात अराजकतेचे संकट समजावून सांगितले होते. आज तेच अराजकतेचे संकट राज्यघटनेचे नाव घेऊन भाजप विरोधात वापरण्याचा प्रयत्न आहे. हा वापर केवळ भाजपच्या विरोधात नाही, तर सर्व समाजाविरोधात आहे. राज्यघटनेचे नाव घ्यायचे आणि मूल्ये पायदळी तुडवून अराजकता पसरविण्याचे काम सुरू आहे. मात्र, राज्यघटनेचा दुरुपयोग करणाऱ्यांचे हात जळल्याशिवाय राहणार नाहीत,’ अशा शब्दांत देवेंद्र फडणवीस यांनी काँग्रेसवर टीका केली.



## गडचिरोलीत सर्पदंशामुळे झालेल्या मृत्यूंचे प्रकरण


■ समस्येचे गांभीर्य विचारात घेऊन जनहित याचिकेत रुपांतर, उच्च न्यायालयाचा निर्णय

मुंबई : (स. गांवकरी)

राज्यभरातील आश्रमशाळांमधील परिस्थितीमुळे उपोषणाला बसलेल्या आदिवासी विद्यार्थ्यांच्या दुर्दशेकडे लक्ष वेधणाऱ्या याचिकेतील व्यापक मुद्दे आणि समस्येचे गार्भीर्य विचार घेऊन उच्च न्यायालयाने सोमवारी या याचिकेचे जनहित याचिकेत रूपांतर केले. गडचिरोली जिल्ह्यातील आश्रम शाळेत सर्पदंशामुळे तीन मुलींच्या झालेल्या मृत्यूच्या निषेधार्थ राज्यभरात उपोषणाला बसलेल्या आदिवासी विद्यार्थ्यांच्या आरोग्याबाबत उच्च न्यायालयाने शनिवारी चिंता व्यक्त केली होती. तसेच, त्यांची काळजी घ्या. यापुढे आणखी कोणाचाही मृत्यू होता कामा नये, असे सरकारला बजावले होते. त्या पार्श्वभूमीवर, प्रभारी मुख्य न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि न्यायमूर्ती गौतम अंखड यांच्या खंडपीठापुढे सोमवारी सुनावणी झाली. त्यावेळी, राज्य सरकार आणि आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रतिनिधी यांच्यात झालेल्या बैठकीचा तपशील महाधिवक्ता मिलिंद साठ्ये यांनी न्यायालयात सादर केला. त्याची दखल घेऊन खंडपीठाने याचिकेचे जनहित याचिकेत रुपांतर केले. दरम्यान, गडचिरोली जिल्ह्यातील जपतालाई गावातील एका आश्रम शाळेत सर्पदंशामुळे तीन मुलींच्या मृत्यूच्या निषेधार्थ राज्यातील, विशेषतः आदिवासी पट्ट्यातील आदिवासी विद्यार्थ्यांनी उपोषण सुरू केले होते. शाळेतील आणखी तीन विद्यार्थ्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्याची दखल घेऊन उपोषण करणाऱ्या विद्यार्थ्यांना पुरेसा आणि वेळेवर वैद्यकीय उपचार कसा मिळेल यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करा, त्यांना सतत डॉक्टर उपलब्ध असतील याची खात्री करा आणि गरज भासल्यास विद्यार्थ्यांना वैद्यकीय मदत किंवा अन्न देण्यासाठी रुग्णालयात दाखल करा, असेही न्यायालयाने राज्य सरकारला आदेश दिले होते.

## एक्सपायरी डेट बदलून विकला जातोय माल

नवी मुंबई : (स. गांवकरी)



नवी मुंबईत अन्नपदार्थांच्या पाकिटांवरील मुदत संपल्याची तारीख बदलण्याचं मोठं रॅकेट उघडकीस आलं आहे. महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई करण्यात आली असून, यामध्ये मॅगी आणि लेज यांसारख्या नामांकित ब्रँड्सचा साठा जप्त करण्यात आला आहे, अशी माहिती एफडीएने सोमवारी दिली. या कारवाईनंतर एफडीएने तुर्भे येथील टीटीसी इंडस्ट्रियल विभागात कार्यरत असलेल्या ‘साधना एंटरप्रायझेस’ या कंपनीचा परवाना निलंबित केला आहे. जप्त करण्यात आलेल्या साठ्यामध्ये लेज, कुरकुरेचे विविध प्रकार, फन फ्लिप्स यांसारखे बटाटा चिप्स आणि स्नॅक्स, तसेच मॅगी मसाला आणि आटा नूडल्सचा समावेश आहे. याशिवाय रेडी-टू-ईट आणि रेडी-टू-कुक अन्नपदार्थही जप्त करण्यात आले आहेत. एफडीए आणि नवी मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेने २४ ते २९ ऑगस्ट दरम्यान ही संयुक्त कारवाई केली. तपासणीदरम्यान अधिकाऱ्यांना आढळलं की, अन्नपदार्थांच्या पॅकेजिंगवर छापलेली उत्पादन तारीख आणि मुदत संपल्याची तारीख पुसून त्या जागी नवीन तारखा टाकल्या जात होत्या. तसंच, पदार्थांचे घटक आणि पौष्टिक मूल्यांची माहिती देणारी मूळ लेबल्स काढून त्या जागी नवीन स्टिकर्स लावले जात होते. हा सर्व साठा पुन्हा नव्याने पॅक केला जात असल्याचं विभागाने सांगितलं.

## ७५वा भटके-विमुक्त दिन उत्साहात; समाजाच्या संघर्षाला अभिवादन!

### कृषिमंत्री दत्तामामा भरणे यांच्या हस्ते ‘दैनिक समर्थ गांवकरी’च्या विशेषांकाचे प्रकाशन!





मुंबई : (स. गांवकरी)

३१ ऑगस्ट १९५२ हा दिवस भटके-विमुक्त समाजाच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाचा दिवस मानला जातो. इंग्रजांनी भटक्या-विमुक्त जमातींना ‘जन्मजात गुन्हेगारी जमाती’ म्हणून ठरविणारा अन्यायकारक कायदा याच दिवशी रद्द केला. त्यामुळे ३१ ऑगस्ट हा दिवस या समाजासाठी केवळ स्मरणदिन नसून, खऱ्या अर्थाने स्वातंत्र्याचा आणि स्वाभिमानाचा दिवस आहे. वर्षानुवर्षे अन्याय, उपेक्षा आणि सामाजिक विषमता सहन करणाऱ्या या समाजाच्या संघर्षाची आठवण करून देणारा हा दिवस दरवर्षी विविध उपक्रमांनी साजरा केला जातो. या ऐतिहासिक दिवसाचे औचित्य साधून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या भटके-विमुक्त जाती-जमाती सेलच्या वतीने भटके-विमुक्त परिषद व सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमात दैनिक समर्थ गांवकरीच्या विशेष अंकाचे प्रकाशन राज्याचे कृषिमंत्री दत्तामामा भरणे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी दैनिक समर्थ गांवकरीचे महाव्यवस्थापक संजय फुलसुंदर, ज्येष्ठ पत्रकार सुनील गीते, कृषक प्रदेशाध्यक्ष अॅड. वसंत मनकर यांच्यासह विविध मान्यवरांची उपस्थिती होती. भटके-विमुक्त समाजातील प्रत्येक घटकाला शिक्षण, रोजगार, सामाजिक सुरक्षा आणि सन्मानाने जगण्याच्या समान संधी मिळणे आवश्यक आहे. या समाजाने केलेला संघर्ष, त्याग आणि स्वाभिमानाची लढाई पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्याची गरज आहे. ७५ व्या भटके-विमुक्त दिनानिमित्त समाजाच्या संघर्षाला आणि त्यागाला मनःपूर्वक अभिवादन करत, सामाजिक न्याय, समानता आणि सन्मानासाठी सर्वांनी एकजुटीने प्रयत्न करण्याचा संकल्प करण्यात आला.


## कुंभच्या तयारीवर खर्चाचा विक्रम; ३५ हजार कोटींची कामे

### नाशिक-त्र्यंबकेश्वरसाठी ३५ हजार कोटी

नाशिक : (स. गांवकरी)

हिंदू धर्मीयांच्या आस्थेशी जोडलेल्या कुंभमेळ्याने गतवर्षी प्रयागराज येथे गर्दीचा नवा उच्चांक प्रस्थापित केला. आता २०२७ मधील नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा खर्चाच्या दृष्टीने नव्या विक्रमाची नोंद करणार आहे. मागील १२ वर्षांत देशात झालेल्या सहा कुंभमेळ्यांवर झालेल्या खर्चापेक्षा कित्येक पट अधिक खर्च यावेळी होणार आहे. तब्बल ३५ हजार कोटी रुपयांच्या पायाभूत सुविधांनी हा कुंभमेळा भारलेला असणार आहे. यात सर्वाधिक ५१ टक्के निधी रस्ते बांधणीवर, तर इमारती आणि संस्थात्मक पायाभूत सुविधांसाठी नऊ टक्के आणि पूल, उड्डाण पुलांसाठी आठ टक्के खर्च होणार आहे.

२०२५ मध्ये प्रयागराज येथे झालेल्या महाकुंभात गर्दीचे आजवरचे सर्व विक्रम मोडीत निघाले. अपेक्षेपेक्षा पाचपट भाविक या कुंभमेळ्यात सहभागी झाले. २०२७ मध्ये नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे पुढील कुंभमेळा होत असून, त्यात १२ कोटी भाविक सहभागी होण्याचा अंदाज आहे. त्याआधारे नियोजन आणि जय्यत तयारी सुरू आहे. त्यासाठी राज्य आणि केंद्र सरकार तसेच नाशिक महापालिकेकडून तब्बल ३५ हजार कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहेत. धार्मिक परंपरा, आधुनिक तंत्रज्ञान आणि दीर्घकालीन पायाभूत सुविधा यांचा समन्वय साधत नाशिक-त्र्यंबकेश्वरला देशाची प्रमुख आध्यात्मिक राजधानी म्हणून विकसित करण्याची तयारी कुंभमेळा प्राधिकरणाने केली आहे. कुंभमेळ्यात साधू-महंतांसह भाविकांची संख्या कोट्यवधींच्या घरात पोहोचते. त्यामुळे सोयी-सुविधांसाठी सरकार आणि स्थानिक स्वराज्य संस्थांना स्वतंत्र आर्थिक नियोजन करावे लागते. या संदर्भातील देशातील आकडेवारी प्रशासनाने नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा २०२७ चा आराखडा तयार करताना मांडली होती. त्यानुसार, २०१३ ते २०२५ या कालावधीत देशात सहा कुंभमेळे झाले. २०१३ मधील प्रयागराज कुंभमेळ्यासाठी शासनाने १,१४२ कोटी रुपये, नाशिक-त्र्यंबकेश्वर (२०१५) २,३७९ कोटी, उज्जैन (२०१६) २,८१० कोटी, प्रयागराज (अर्धकुंभ, २०१९) ३,६०० कोटी रुपयांहून




अधिक, हरिद्वार (२०२१) १०५० कोटी आणि प्रयागराज (२०२५) कुंभमेळ्यासाठी ७,३०३ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध केला होता. पुढील वर्षी नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी राज्य शासनाच्या अखत्यारीतील प्राधिकरणाने २२,४२५.३९ कोटी रुपयांच्या योजनांना मान्यता दिली आहे. या व्यतिरिक्त सार्वजनिक बांधकाम विभागाकडून २,२७०.६० कोटी रुपये, त्र्यंबकेश्वर तीर्थक्षेत्र विकासासाठी (एमएसआयडीसी) २७५ कोटी, महापारेषण ९४६.८१ कोटी आणि नाशिक जिल्हा परिषदेच्या ३५.०८ कोटींच्या कामांना मान्यता देण्यात आली आहे. केंद्र सरकारकडून ८,७६१ कोटी ५४ लाख रुपयांची कामे केली जात आहेत.

त्यात राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाची २,७६३.२४ कोटी, राष्ट्रीय महामार्ग सार्वजनिक बांधकाम विभागाची ४,३५५.९२ कोटी, रेल्वे १,३२९.२४ कोटी, रामकाल पथासाठी (महापालिका) ९९.१४ कोटी रुपये आणि एमएसआयडीसीच्या (द्वारका चौक) २१४ कोटी रुपयांच्या कामांचा अंतर्भाव आहे. कुंभमेळा आराखड्यात आतापर्यंत ३४ हजार ७३२.४२ कोटी रुपयांच्या कामांचा समावेश झाला आहे. कुंभमेळ्यासाठी खर्च होणाऱ्या एकूण निधीपैकी निम्म्याहून अधिक, म्हणजे ५१ टक्के रक्कम केवळ रस्ते विकासासाठी वापरली जाणार आहे.

## अहिल्यानगर जिल्ह्यात ३३.३८ लाख मतदार; ११.२२ टक्के वगळले

### प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध; हरकती घेता येणार

■ अंतिम मतदार यादी ४ नोव्हेंबरला होणार प्रसिद्ध; नमुना ६, ७ आणि ८ द्वारे नाव नोंदणी अन् दुरुस्तीची संधी.

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण मोहीम अंतर्गत (एसआयआर) पडताळणीत जिल्ह्यात ३८ लाख १० हजार मतदारांपैकी ४ लाख २६ हजार ९३० (११.२२ टक्के) मतदार मयत, दुबार किंवा कायमस्वरूपी स्थलांतरित (असंकलित मतदार) आढळले होते, ही नावे वगळून आज, सोमवारी जिल्ह्यातील ३३ लाख ३८ हजार १८७ मतदारांची प्रारूप यादी प्रसिध्द करण्यात आली. प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध झाल्यानंतर आता ३० सप्टेंबरपर्यंत दावे व हरकती दाखल करता येणार आहेत. त्यांचे निराकरण २९ ऑक्टोबरपर्यंत करण्यात येईल. अंतिम मतदार यादी ४ नोव्हेंबरला प्रसिद्ध होणार आहे. निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर मतदार यादी बघता येणार आहे. तसेच ‘बीएलओ’कडूनही त्याची माहिती घेता येईल. सुनावणी दरम्यान कागदपत्रांची पडताळणी करण्यासाठी जिल्हास्तरावर कक्ष तयार करण्यात आला आहे. तालुकास्तरावर समन्वयासाठी तालुकास्तरीय अधिकारी अथवा त्यांचे प्रतिनिधी यांचा मिळून एक कक्ष स्थापन करण्यात आला आहे. असंकलित मतदारांचे (मयत, दुबार, कायमस्वरूपी स्थलांतरित) आवश्यक ते माहिती ‘बीएलओं’नी जतन करून ठेवावी, तसेच प्रारूप मतदार यादी प्रसिद्धीनंतर नमुना ६, ७ व ८ पुरेशा प्रमाणात उपलब्ध ठेवावे, अशा सूचना देण्यात आलेल्या आहेत. मतदार यादीत नाव, स्पेलिंग, वय-जन्मतारीख, छायाचित्र, पत्ता, मतदार क्रमांक आणि मतदान केंद्र योग्य आहे का, हेही तपासून घ्यावे. मतदार यादीत नाव नसल्यास ३१ ऑगस्ट ते ३० सप्टेंबरपर्यंत दावे-हरकती दाखल करता येतील. त्यावर सुनावणी होईल. नवीन नाव नोंदणीसाठी, वगळलेले नाव पुन्हा समाविष्ट करण्यासाठी नमुना क्रमांक ६ आवश्यक कागदपत्रे आणि घोषणापत्रासह भरावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# थोडक्यात पण महत्वाचे



## 32 वी ठाणे महापौर वर्षा मॅरेथॉन उत्साहात साजरी

■ कोल्हापूरचा प्रविण कांबळे तर नाशिकची रविना गायकवाड विजेते

ठाणे (स. गांवकरी) : 'धाव प्रगतीची... गतीशील ठाण्याची' या घोषवाक्यासह आयोजित करण्यात आलेल्या 32 व्या ठाणे महापौर वर्षा मॅरेथॉनमध्ये पुरुष खुल्या गटातील 21 किलोमीटर स्पर्धेत कोल्हापूरच्या प्रविण कांबळे याने अव्वल क्रमांक पटकावला. कांबळे याने 1 तास 7 मिनिटे 21 सेकंदांत अंतर पूर्ण केले. महिला खुल्या गटात नाशिकच्या रविना गायकवाड यांनी 1 तास 26 मिनिटे 4 सेकंदांत शर्यत पूर्ण करून प्रथम क्रमांक मिळविला. ठाणे महानगरपालिका व ठाणे जिल्हा हौशी अॅथलेटिक्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या स्पर्धेत सुमारे 30 हजार धावपटूंनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि त्यांच्या पत्नी लता शिंदे यांनी मॅरेथॉनला झेंडा दाखवून स्पर्धेचा शुभारंभ केला. धावपटूंचा उत्साह पाहून उपमुख्यमंत्री शिंदे यांनी स्वतःही काही अंतर धावत सहभागी स्पर्धकांचा उत्साह वाढविला. पुरुष व महिला गटांसह विविध 14 गटांमध्ये स्पर्धा घेण्यात आली. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, खासदार नरेश म्हस्के, आमदार रवींद्र फाटक आदींच्या हस्ते विजेत्या धावपटूंना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. सहा वर्षांनंतर ठाणे महानगरपालिकेत महापौर, पदाधिकारी व नगरसेवक विराजमान झाल्यानंतर आयोजित करण्यात आलेली ही 32 वी महापौर वर्षा मॅरेथॉन महापौर शर्मिला पिंपळोलकर यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. यावेळी उपमुख्यमंत्री शिंदे यांनी मॅरेथॉनच्या 32 वर्षांच्या गौरवशाली इतिहासाचे स्मरण करत ठाण्यातील तरुणाईला क्रीडाक्षेत्रातून नवी ऊर्जा मिळत असल्याचे सांगितले. ठाणे जिल्ह्यातील आंतरराष्ट्रीय दर्जाच्या खेळाडूंना ऑलिम्पिकपर्यंत पोहोचविण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य केले जाईल, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.

## 'फ्रेमवर्क फॉर फर्टीलायझर सेल' अॅपद्वारे खत विक्री सुरळीत सुरू

ठाणे (स. गांवकरी) : केंद्र शासनाच्या 'फ्रेमवर्क फॉर फर्टीलायझर सेल' (Framework for Fertilizer Sale - FFS) अॅपद्वारे ठाणे जिल्ह्यामध्ये दि. २७ ऑगस्ट २०२६ पासून खत विक्रीची प्रक्रिया सुरळीतपणे सुरू झाली आहे. या नवीन डिजिटल खत विक्री प्रणालीमुळे शेतकऱ्यांना आपल्या गरजेनुसार खताचे घरबसल्या ऑनलाइन बुकिंग करता येणार असून, बुकिंगनंतर प्राप्त होणारा क्यूआर कोड निवडलेल्या कृषी सेवा केंद्रावर दाखवून खत खरेदी करता येणार आहे. खत विक्री व वितरण प्रक्रियेत अधिक पारदर्शकता आणणे, शेतकऱ्यांना त्यांच्या गरजेनुसार खत उपलब्ध करून देणे तसेच खताच्या संपूर्ण वितरण व्यवस्थेचे प्रभावी व्यवस्थापन करणे, हा या नवीन FFS प्रणालीचा प्रमुख उद्देश आहे. या प्रणालीमुळे शेतकऱ्यांना खताच्या उपलब्धतेची माहिती मिळविण्यासाठी कृषी सेवा केंद्रांवर अनावश्यक फेऱ्या मारण्याची गरज कमी होणार असून, त्यांचा वेळ, श्रम व आर्थिक खर्च वाचण्यास मदत होणार आहे. महाराष्ट्र राज्यात दि. २७ ऑगस्ट २०२६ रोजी ठाणे जिल्ह्यासह एकूण सात जिल्ह्यांमध्ये 'फ्रेमवर्क फॉर फर्टीलायझर सेल' या नवीन डिजिटल खत विक्री प्रणालीचा शुभारंभ करण्यात आला आहे. ठाणे जिल्ह्यात ही प्रणाली प्रभावीपणे कार्यान्वित करण्यासाठी कृषी विभागामार्फत आवश्यक पूर्वतयारी करण्यात आली होती.

## सापुतारा-मालेगाव घाटमार्गावर ट्रकचे ब्रेक फेल; एसटी बसला जोरदार धडक




डांग, गुजरात (स. गांवकरी) : डांग जिल्ह्यातील सापुतारा-मालेगाव राष्ट्रीय महामार्गावर मालेगाव फॉरेस्ट रेस्ट हाऊसजवळ आज एसटी बस आणि ट्रकचा भीषण अपघात झाला. उतारावरील यू-टर्न वळणावर ट्रकचे ब्रेक फेल झाल्याने ट्रकने गुजरात एसटी महामंडळाच्या नाशिक-सुरत बसला पाठीमागून जोरदार धडक दिली. सुदैवाने बसमधील सर्व प्रवाशांचा थोडक्यात बचाव झाल्याने मोठी जीवितहानी टळली. मिळालेल्या माहितीनुसार, नाशिकहून सुरतकडे जाणारी गुजरात एसटी महामंडळाची नाशिक-सुरत बस सापुतारा-मालेगाव राष्ट्रीय महामार्गावरून जात होती. यावेळी मालेगाव फॉरेस्ट रेस्ट हाऊसजवळील उतारावरील यू-टर्न वळणावर मागून येणाऱ्या ट्रकचे अचानक ब्रेक फेल झाले. ब्रेक निकामी झाल्याने चालकाचा ट्रकवरील ताबा सुटला आणि भरधाव ट्रकने एसटी बसला पाठीमागून जोरदार धडक दिली. धडकेनंतर एसटी बस रस्त्याच्या कडेला गेल्याने बसमधील प्रवाशांमध्ये काही काळ घबराटीचे वातावरण निर्माण झाले. या अपघातात दोन्ही वाहनांचे नुकसान झाले आहे. मात्र, सुदैवाने बसमधील सर्व प्रवासी सुरक्षित बचावले असून मोठी दुर्घटना टळली. घटनेची माहिती मिळताच संबंधित यंत्रणेने घटनास्थळी धाव घेत पुढील कार्यवाही सुरू केली.

## लहान मुलांच्या वादातून झालेल्या भांडणाची मध्यस्थी पडली महागात

■ सोलापुरात ४५ वर्षीय व्यक्तीचा लोखंडी पाईपने मारहाण करून खून

सोलापूर (स. गांवकरी) : लहान मुलांमध्ये झालेल्या जुन्या वादातून मध्यस्थी करण्यासाठी गेलेल्या एका ४५ वर्षीय व्यक्तीची लोखंडी पाईप आणि लाथाबुक्क्यांनी मारहाण करून निर्घृण हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना सोलापुरात घडली आहे. नई जिंदगी परिसरातील लोकमान्य नगर येथे रविवारी (३० ऑगस्ट) सायंकाळी साडेपाच वाजेच्या सुमारास हा प्रकार घडला. अल्ताफ बाशा शेख (वय ४५, रा. लोकमान्य नगर) असे मृत व्यक्तीचे नाव असून, या घटनेत त्यांचा भाचा सुफियान इर्शाद शेख हादेखील गंभीर जखमी झाला आहे. लोकमान्य नगर येथील जिल्हा परिषद शाळेजवळ अल्ताफ शेख हे नातेवाईकांमध्ये चाललेला वाद मिटवण्यासाठी गेले होते. त्यावेळी "तू का मध्यस्थी करतोस?" असा जाब विचारत चार संशयितांनी त्यांच्यावर लोखंडी पाईप आणि लाथाबुक्क्यांनी तुंबळ हल्ला चढवला. या मारहाणीत तोंडावर गंभीर दुखापत होऊन आणि सर्वांगावर मुका मार बसल्याने अल्ताफ शेख जागीच बेशुद्ध पडले. मध्यस्थीदरम्यान त्यांना वाचवण्यासाठी आलेला भाचा सुफियान हादेखील हल्ल्यात गंभीर जखमी झाला. गंभीर जखमी अल्ताफ शेख यांना तातडीने खासगी रुग्णालयात आणि तेथून पुढील उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. हत्येची बातमी पसरताच शासकीय रुग्णालयात नातेवाईक व स्थानिकांनी प्रचंड गर्दी केली होती.

# मोहटेश्वर मंदिराचे लोकार्पण संपन्न

### मोहटागाव व परिसराचा विकासासाठी देवस्थान समिती प्रयत्नशील राहणार : धर्मदाय उपआयुक्त नवनाथ जगताप

पाथर्डी : (स. गांवकरी)



तालुक्यातील श्रीक्षेत्र मोहटादेवी देवस्थान समितीच्या वतीने मोहटे गावातील जुने मोहटे येथे नव्याने उभारण्यात आलेल्या श्री महादेव मंदिराचा लोकार्पण सोहळा तसेच श्री शिवलिंग व नंदी देवता प्राणप्रतिष्ठा सोहळा रविवारी दि.३० ऑगस्ट २०२६ रोजी मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात पार पडला.

यावेळी बोलताना श्री क्षेत्र मोहटादेवी देवस्थान समितीचे अध्यक्ष तथा अहिल्यानगरचे धर्मदाय उपआयुक्त नवनाथ जगताप म्हणाले की, मोहटे गावाच्या सर्वांगीण विकासासाठी देवस्थान समितीच्या वतीने आवश्यक ते प्रयत्न करण्यात येतील. गावातील मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देणे, पाण्याची व्यवस्था करणे, जलसंधारणाची कामे हाती घेणे तसेच राज्य शासनाच्या विविध योजना गावात प्रभावीपणे राबविण्यासाठी आपण प्रयत्नशील राहू, अशी ग्वाही त्यांनी दिली. श्री महादेव मंदिर लोकार्पण व प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त सकाळी गावातून सुवासिनी पारंपरिक पद्धतीने कलश मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीत महिलांचा मोठा सहभाग होता. मंदिर उभारणीसाठी जागा दान स्वरुपात दिल्याबद्दल श्रीमती राधाबाई दहिफळे व श्रीमती सविता दहिफळे यांचा श्री मोहटादेवी देवस्थान समितीच्या वतीने सन्मान करण्यात आला.श्रीक्षेत्र ओंकारेश्वर येथून श्री नर्मदेश्वर शिवलिंग व नंदी मूर्ती मोहटे येथील माजी सैनिक ईश्वर आश्रूबा दहिफळे दिली. त्यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे पौराहित्य वेद्शात्र संपन्न नारायण देवा सुलाखे खोकरमोहकर, सच्चीतानंद देशपांडे, भूषण साकरे, रविदेवा जोशी यांनी भक्तिमय वातावरणात मंत्रोच्चार व धार्मिक विधी संपन्न झाला.

श्री शिवलिंग व नंदी देवतेची विधिवत प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. त्यानंतर श्री महादेव मंदिराचा लोकार्पण सोहळा मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला. या कार्यक्रमास देवस्थान समितीचे विश्वस्त अशोक दहिफळे, बाबासाहेब दहिफळे, शुभम दहिफळे, शशिकांत दहिफळे, राजेंद्र शिंदे, अँड. विक्रम वाडेकर अँड. कल्याण बडे, अँड. प्रसन्न दराडे, बाळासाहेब लाहोटी, राजेंद्र शिंदे, सामाजिक कार्यकर्ते अँड. मानसिंग पवार, कुंजीर भाऊ, राजकुमार पाटील, वास्तुविशारद प्रल्हाद जोशी , ठेकेदार मंगेश कुलकर्णी, बांधकाम सल्लागार मे. रामकृष्ण एन्टरप्राजेसचे संजय क्षीरसागर यांचेसह माजी विश्वस्त तसेच देवस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश भणगे, जनसंपर्क अधिकारी भीमराव खाडे, लेखापाल संदीप घुले यांच्यासह मोहटे गावातील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, वि.वि.सेवा. सो. चेअरमन व सदस्य तसेच सर्व ग्रामस्थ व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

धार्मिक सोहळ्यानंतर उपस्थित भाविकांसाठी श्री मोहटादेवी देवस्थान समितीच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

भाविकांनी मोठ्या संख्येने महाप्रसादाचा लाभ घेतला. संपूर्ण कार्यक्रम भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

## स्वीकृत सदस्य निवडीत भाजपचे पारडे जड

■ 'आठ'चा दबाव वाढणार!

■ मिनी मंत्रालयातील राजकीय गणिताला वेग

■ गोरे-मोहिते-पाटील पुन्हा आमनेसामने येण्याची शक्यता

सोलापूर : (स. गांवकरी)

सोलापूर जिल्हा परिषदेतील स्वीकृत सदस्य निवडीची अधिसूचना जाहीर झाल्यानंतर मिनी मंत्रालयातील राजकीय हालचालींना वेग आला आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून निवड कार्यक्रम कधीही जाहीर होण्याची शक्यता असून, ६८ सदस्यांच्या सभागृहात संख्याबळाच्या जोरावर भाजपचे पारडे सध्या सर्वाधिक जड दिसत आहे. मात्र भाजपचा मित्रपक्ष असलेल्या एकनाथ सेनेचे आठ सदस्य, तसेच स्वतंत्र गटातील सहा सदस्यांची भूमिका निर्णायक ठरण्याची शक्यता असल्याने निवड बिनविरोध होण्याऐवजी राजकीय रस्सीखेच होण्याची चिन्हे आहेत. दहा सदस्यांमागे एक स्वीकृत सदस्य या प्रमाणात जिल्हा परिषदेत स्वीकृत सदस्यांची निवड होणार आहे. भाजपकडे सर्वाधिक ३८ सदस्य असल्याने त्यांच्या वाट्याला चार स्वीकृत सदस्य येऊ शकतात. अजित पवार गटाच्या राष्ट्रवादीकडे दहा सदस्य असल्याने त्यांना एक सदस्य मिळण्याची शक्यता आहे. उर्वरित जागेसाठी मात्र राजकीय समीकरणे महत्त्वाची ठरणार आहेत. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाकडे सहा सदस्य आहेत. त्याचवेळी आमदार नारायण पाटील, आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख आणि भगीरथ भालके यांच्या नेतृत्वाखाली सहा सदस्यांचा स्वतंत्र गट आहे. या गटात सांगोला शेकाप आघाडीचे तीन, करमाळा तालुका आघाडीचे दोन आणि पंढरपूर तीर्थक्षेत्र आघाडीचा एक सदस्य आहे.

## कालकथीत मोहनराव गाडे यांचे प्रतिमेचे आंबेडकर भवन येथे अनावरण



पाथर्डी : (स. गांवकरी)

वंचित बहुजन आघाडीचे राज्य उपाध्यक्ष किसनराव चव्हाण यांच्या हस्ते कालकतीत ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक मोहनराव गाडेभाऊ तसेच भगवान महावीर, एपीजे अब्दुल कलाम आणि लोकशाहीर वामनदादा कर्डक यांच्या प्रतिमेचे अनावरण मोठ्या उत्साह पूर्ण वातावरणात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन येथे पार पडले. याप्रसंगी अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना प्रा. किसन चव्हाण म्हणाले की, जो व्यक्ती समाजासाठी काम करतो त्याला समाज डोक्यावर घेतो आणि त्याचे नाव अजरामर करतो. द्वेष भावना सोडून समाजाने एकत्र आले पाहिजे, विचारांची बैठक केली पाहिजे, त्यातून समाजाची प्रगती होते. आपले कर्म चांगले असतील तर त्याचे चांगले फळ मिळते. आज कालकथीत मोहनराव गाडेभाऊ यांचा फोटो सभागृहात लागल्यामुळे संपूर्ण समाजाला आनंद झाला आहे, असेही प्रा. किसन चव्हाण म्हणाले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. महेंद्र राजगुरू यांनी केले तर आभार वंचित बहुजन आघाडीचे पप्पू शेठ बोर्डे यांनी मानले.

कार्यक्रमासाठी भारतीय बौद्ध महासभेचे तालुकाध्यक्ष श्रीपत दादा बळीद, प्रा. संजय राजगुरू, उद्योजक एकनाथ ठोकळ, सेवानिवृत्त तहसीलदार जगदीश गाडे, प्रा. डोळस ,रोहिणीताई ठोंबे, संतोष काळोखे तसेच मोठ्या संख्येने धम्म बांधव आणि भगिनी उपस्थित होत्या.

यावेळी प्रा. किसन चव्हाण यांचा सन्मान सेवानिवृत्त तहसीलदार जगदीश गाडे आणि आयुष्मानिनी मंदाकिनीताई गाडे यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमानंतर भोजनदान आयु. विनोद थोरात यांनी दिले.

याप्रसंगी विनोद थोरात बोलताना म्हणाले की, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवनवरती अजून एक मजली बांधकाम होऊन त्या ठिकाणी अभ्यासिका करण्यात यावी. या अभ्यासिकेसाठी लागणारे सर्व स्पर्धा परीक्षेसाठी लागणारी पुस्तके मी मोफत देण्यास तयार आहे. अशी इच्छा प्रा. विनोद थोरात यांनी व्यक्त केली. सर्वांनी टाळ्यांच्या गजरात या सूचनेचे स्वागत केले.

## 'हर्र बोला हर्र...'च्या जयघोषात पहिल्यांदाच निघाली ६८ लिंग पदयात्रा

■ ९ तासांत १८ किलोमीटरचा पायी प्रवास

■ महिला-मुलींच्या संरक्षणासह पावसासाठी सिद्धेश्वर चरणी साकडे; ५१व्या वर्षी भक्तांचा उत्स्फूर्त सहभाग

■ वीरशैव व्हिजन तर्फे भक्तांसाठी प्रसादाचे वाटप पद यात्रेचे हे 51 वे वर्षे

■ पदयात्रेत भक्तांनी केला हर बोला हर चा जय घोष . तर तरुण युवती झाल्या मोठ्या प्रमाणात यात्रेत सहभागी



**पहिल्यांदाच केली ६८ लिंग पदयात्रा**

माहेश्वरी वाघमारे, राधिका अंगेरी, श्रुती गंगेरी, द्राक्षायणी अतने, हणमंत अतने, मीनाक्षी बशेट्टी, वंदना मस्कले, प्रतिभा चौगुले, रेश्मा पवार, वैष्णवी जावळे या सिद्धेश्वर भक्तांनी यंदा पहिल्यांदाच ६८ लिंग पदयात्रेत सहभाग घेतला होता.

सोलापूर : (स. गांवकरी)

'हर्र बोला हर्र...'च्या जयघोषाने सोलापूरचा परिसर दुमदुमला. तिसऱ्या श्रावणी रविवारचे औचित्य साधून ६८ लिंग भक्त मंडळ आणि वीरशैव व्हिजन यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रामदैवत शिवयोगी श्री सिद्धरामेश्वरांनी पंचक्रोशीत स्थापन केलेल्या ६८ लिंगांची पदयात्रा उत्साहात काढण्यात आली. यंदा या पदयात्रेचे ५१वे वर्ष होते.

सकाळी ७ वाजता ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वरांची आरती व पूजन करून पदयात्रेला सुरुवात झाली. तब्बल ९ तास आणि १८ किलोमीटरचा पायी प्रवास करत भक्तगणांनी महिला व मुलींच्या संरक्षणासाठी तसेच राज्यात समाधानकारक पाऊस पडावा, यासाठी सिद्धेश्वर चरणी साकडे घातले. बसवराज सावळगी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि ६८ लिंग भक्त मंडळाचे अध्यक्ष शिवानंद सावळगी यांच्या नेतृत्वाखाली ही पदयात्रा पार पडली. वीरशैव व्हिजनचे संस्थापक सहसचिव संजय साखरे, उत्सव समिती अध्यक्ष विजयकुमार बिराजदार यांच्यासह राजेश नीला, अरुण पाटील, मन्मथ कपाळे, गंगाधर झुरळे, शांतवीर बसवंती, शेखर गुजले, महादेव कलशेट्टी, प्रशांत गंचिनगोटे, किरण अजिंखाने, सुब्रमणी लोणारे, विश्वनाथ राठोड, परमेश्वर शहापुरे (पुणे), प्रतिक हारके, सिद्धाराम वच्चे, शिवशंकर जंगम आदींसह महिला व पुरुष भक्त मोठ्या संख्येने सहभागी झाले. पदयात्रेदरम्यान भक्तांनी 'हर्र बोला हर्र...'चा जयघोष करत धार्मिक वातावरण निर्माण केले. मीठ गल्ली येथील शिवानुभव मंगल कार्यालयात आस्था सामाजिक संस्थेचे अध्यक्ष आनंद तालिकोटी यांच्यातर्फे पदयात्रेकरूंसाठी फराळ व चहापानाची व्यवस्था करण्यात आली. दुपारी ३ वाजता श्री मल्लिकार्जुन मंदिर येथे आरती व पूजन करून पदयात्रेचा समारोप करण्यात आला.

## जी. के. एस. महाविद्यालयात एचआयव्ही समुपदेशन व जनजागृती कार्यक्रम

भिवंडी : (स. गांवकरी)



भिवंडी , इंदिरा गांधी रुग्णालय यांच्या वतीने जी. के. एस. कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, खडवली येथे विद्यार्थ्यांसाठी एचआयव्ही समुपदेशन व जनजागृती कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या प्रारंभी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. जी. सागर यांनी उपस्थित मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यानंतर समुपदेशक करुणा भवर यांनी विद्यार्थ्यांना एचआयव्ही/एड्सचा प्रसार, प्रतिबंधात्मक उपाययोजना, एचआयव्ही तपासणीचे महत्त्व, उपलब्ध उपचार व आरोग्यसेवा तसेच एचआयव्हीविषयी समाजात असलेले विविध गैरसमज याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत एचआयव्हीशी संबंधित विविध प्रश्न विचारले. समुपदेशकांनी विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन करून त्यांना योग्य व शास्त्रीय माहिती दिली. विद्यार्थ्यांमध्ये एचआयव्हीविषयी वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करणे, आरोग्यविषयक जागरूकता वाढविणे आणि सामाजिक संवेदनशीलता विकसित करणे, हा या जनजागृती कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. रसिका लोकरे यांनी केले. यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. प्रशांत तांडले, प्राध्यापकवर्ग, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यक्रमाला उत्साहपूर्ण वातावरण लाभले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी इंदिरा गांधी रुग्णालय, भिवंडी तसेच समुपदेशक करुणा भवर यांचे महाविद्यालयाच्या वतीने विशेष आभार मानण्यात आले.

# शीघ्रकवी हरिभाऊ वडगावकर यांच्या भव्य स्मारकासाठी निधीची मागणी

### विधानसभेचे उपसभापती नामदार अण्णा बनसोडे यांना निवेदन; वडगाव आनंदच्या विकासकामांसाठीही निधीची मागणी

वडगाव आनंद : (स. गांवकरी)



मराठी रंगभूमीवर अजरामर ठरलेल्या "गाढवाचे लग्न" या गाजलेल्या लोकनाट्याचे लिखितकार, शीघ्रकवी, वडगाव आनंदचे सुपुत्र तसेच राष्ट्रपती पुरस्काराने सन्मानित साहित्यिक कै. हरिभाऊ वडगावकर (काशीकेदार) यांच्या कार्याचा गौरव जतन करण्यासाठी त्यांच्या नावाने भव्य स्मारक व सुसज्ज सभा मंडप उभारण्यात यावा, यासाठी आवश्यक निधी मंजूर करण्यात यावा, अशी मागणी करणारे निवेदन विधानसभेचे उपसभापती तथा उपाध्यक्ष नामदार अण्णा बनसोडे यांना चिंचवड येथे प्रत्यक्ष भेटून सादर करण्यात आले. यावेळी वडगाव आनंद ग्रामपंचायतीचे उपसरपंच संतोष पादिर, सामाजिक कार्यकर्ते नवनाथ वाळुंज तसेच संदेश काशीकेदार यांनी संयुक्तपणे निवेदन सादर करून हरिभाऊ वडगावकर (काशीकेदार) यांच्या साहित्य, लोककला आणि सामाजिक योगदानाची माहिती दिली. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, हरिभाऊ वडगावकर (काशीकेदार) यांनी आपल्या साहित्यकृती, लोकनाट्य आणि काव्यलेखनातून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेला मोठे योगदान दिले आहे. विशेषतः "गाढवाचे लग्न" हे लोकनाट्य आजही राज्यभर लोकप्रिय असून ग्रामीण संस्कृती, विनोद आणि सामाजिक प्रबोधनाचा उत्कृष्ट संगम म्हणून ओळखले जाते. त्यांच्या कार्याचा सन्मान म्हणून वडगाव आनंद येथे त्यांच्या नावाने भव्य स्मारक, अत्याधुनिक सभा मंडप व अभ्यासकांसाठी प्रेरणास्थळ निर्माण करणे ही काळाची गरज असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. याचबरोबर वडगाव आनंद गावातील विविध प्रलंबित विकासकामांसाठी विशेष निधी उपलब्ध करून देण्याचीही मागणी करण्यात आली. गावातील अंतर्गत रस्ते, सभामंडप, सार्वजनिक सुविधा, सांस्कृतिक व सामाजिक विकासाच्या कामांना प्राधान्याने मंजुरी मिळावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. यावेळी नामदार अण्णा बनसोडे यांनी निवेदनाची दखल घेत संबंधित मागण्यांचा सकारात्मक विचार करून शासन स्तरावर आवश्यक पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले.

या भेटीमुळे वडगाव आनंद ग्रामस्थांमध्ये समाधान व्यक्त होत असून, शीघ्रकवी हरिभाऊ वडगावकर (काशीकेदार) यांच्या स्मृती जपण्यासाठी आणि गावाच्या सर्वांगीण विकासासाठी शासनाकडून लवकरच सकारात्मक निर्णय होईल, अशी आशा व्यक्त करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
समर्थ गांवकरी



## थोडक्यात पण महत्वाचे



### अन्नदान हेच श्रेष्ठदान! सिद्धेश्वरच्या पायथ्याशी आर्यन्स ग्रुपचा महाप्रसाद

- तिसऱ्या श्रावणी सोमवारी भाविकांची तुफान गर्दी
- जयदरच्या तरुणाईचा सालाबादप्रमाणे उपक्रम
- फराळ खिचडी आणि फळ प्रसादाने भाविक तृप्त

कनाशी (स. गांवकरी) : श्रावण महिन्यातील तिसऱ्या सोमवारच्या पावन पर्वावर तीर्थक्षेत्र सुळे सिद्धेश्वर नगरी भक्तिमय झाली असतानाच, कळवण तालुक्यात नेहमीच चर्चेत असणाऱ्या आर्यन्स ग्रुप, जयदर या तरुणांच्या ग्रुपने सामाजिक बांधिलकी जपत अन्नदानाचा अनोखा आदर्श घालून दिला आहे. सालाबादप्रमाणे याही वर्षी आर्यन्स ग्रुपच्या वतीने सिद्धेश्वर येथे येणाऱ्या हजारो शिवभक्तांसाठी फराळ खिचडी आणि फळांच्या महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी ठीक 8 वाजल्यापासूनच भाविकांनी प्रसादाचा लाभ घेतला. कळवण तालुक्यात आर्यन्स ग्रुप म्हटला की अन्नदान आलंच! कोणताही सण असो, यात्रा असो वा संकट असो, हा ग्रुप अन्नदानात कधीच कमी पडत नाही. त्यामुळेच या ग्रुपची तालुकाभर चर्चा असते आणि 'अन्नदान हेच श्रेष्ठ दान' हे वाक्य या ग्रुपने खरंच सिद्ध करून दाखवले आहे, अशी भावना भाविकांनी व्यक्त केली. या प्रसंगी आर्यन्स ग्रुपच्या सर्व सदस्यांनी मोठ्या मेहनतीने हा प्रसाद वाटपाचा कार्यक्रम यशस्वी केला.




### पुष्पावती विद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा

जुन्नर तालुका (स. गांवकरी) : ग्रामविकास मंडळ,ओतूर संचलित पुष्पावती विद्यालय, डिंगोरे येथे राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यालयाचे मुख्याध्यापक शरद माळवे यांच्या हस्ते हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी विद्यालयातील विद्यार्थिनी माया पालवे व स्वरा नलावडे* यांनी मेजर ध्यानचंद यांच्या जीवनकार्या ची तसेच क्रीडा क्षेत्रातील योगदानाची माहिती विद्यार्थ्यां ना दिली.मेजर ध्यानचंद यांना 'हॉकीचे जादूगार' म्हणून ओळखले जाते.त्यांनी १९२८, १९३२ आणि १९३६ या तीन ऑलिंपिक स्पर्धांमध्ये भारता चे प्रतिनिधित्व करत सलग तीन सुवर्णपदके मिळविण्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांच्या असामान्य कामगिरी बद्दल भारत सरकारने त्यांना पद्मभूषण सन्मानाने गौरविले. त्यांच्या जयंतीनिमित्त २९ ऑगस्ट हा दिवस देशभर राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून साजरा केला जातो. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी भारतीय क्रीडा क्षेत्रातील नामवंत खेळाडूंच्या कामगिरी चीही माहिती दिली. बॅडमिंटन पटू चिराग शेट्टी,पी.व्ही. सिंधू, नेमबाज मनू भाकर,भाला फेकपटू नीरज चोप्रा, ऑलिंम्पिक सुवर्णपदक विजेता अभिनव बिंद्रा आणि पॅराऑलिंम्पिक सुवर्णपदक विजेती अवनी लेखरा यांच्या क्रीडा कामगिरीविषयी विद्यार्थ्यांनी माहिती दिली.

### दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना संगणक व शालेय साहित्याची अनमोल भेट



जुन्नर तालुका (स. गांवकरी) : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा फोफसंडी या अतिदुर्गम भागातील विद्यार्थ्यांसाठी जल्लोष गणेश मंडळ,वारजे, पुणे यांच्यावतीने संगणक व विविध शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगती ला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड मिळावी तसेच शिक्षणा साठी आवश्यक साहित्य उपलब्ध व्हावे,या उद्देशाने हा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला.या कार्यक्रमास जांभळेवाडी केंद्राचे केंद्रप्रमुख निलेश वाकचौरे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.त्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना संगणक तसेच विविध शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले.कार्यक्रमास आदि सुरेश वळे:- सरपंच पळसुंदे तसेच आदि चिमाजी उंबरे, माजी सरपंच पळसुंदे यांची विशेष उपस्थिती लाभली त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले. विशेष म्हणजे, अतिदुर्गम भागात पर्यटकांना सदैव सेवा देणारे टुरिझमचे मालक आदि धनाजी वळे यांच्या विशेष प्रयत्नातून हा शैक्षणिक उपक्रम विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात महत्त्वाची भूमिका बजावण्यात आली. दुर्गम भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा ओळखून त्यांनी केलेले प्रयत्न निश्चितच कौतुकास्पद आहेत.दुर्गम व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सामाजिक संस्था, मंडळे व दानशूर व्यक्तींनी पुढाकार घेणे ही काळाची गरज आहे. जल्लोष गणेश मंडळ,वारजे, पुणे यांनी सामाजिक बांधिलकी जपत केलेल्या या उपक्रमाचे उपस्थित मान्यवर, शिक्षक, पालक व ग्रामस्थांनी मनापासून कौतुक केले.

### उंच उंच इमारती बाबत जुन्नर न. प. कडून माहिती मागणी

शिवनेरी (स. गांवकरी) : किल्ले शिवनेरीच्या पायथ्याशी उंच उंच इमारतीमुळे शिवनेरी किल्ल्याच्या दृश्यमानेला बाधा होत आहे . याबाबत कारवाई करावी असे निवेदन दि. १४ ऑगस्ट २०२६ रोजी जुन्नर नगरपरिषद येथे दिले आहे.निवेदन देऊनही अद्याप काहीही कारवाई जुन्नर नगरपरिषद यांनी केली नाही . बाबतची कारवाई प्रत मिळावी अशी मागणी माजी विधानसभा सदस्य बाळासाहेब दांगट यांनी केली आहे. माजी विधानसभा सदस्य बाळासाहेब दांगट यांनी शिवनेरीच्या पायथ्याशी उंच उंच इमारती बाबत दि. १ जुलै २०२४ तसेच दि . १२ मार्च २०२६ रोजी नगराध्यक्षा काजळे यांच्याकडे निवेदन दिले आहे . माजी आमदार अतुल बेनके विधानसभा सदस्य असताना , किल्ले शिवनेरीच्या पायथ्याशी वनविभाग कार्यालय येथे माजी आमदार बाळासाहेब दांगट कार्यक्रमाप्रसंगी म्हणाले की , जर मी आमदार असतो याबाबत तात्काळ कारवाई केली असती. असे जाहीर कार्यक्रमाला सांगितले होते . पण आजही उंच उंच इमारतीमुळे शिवनेरी किल्ला दिसून येत नाही . याबाबत शिवभक्त व मावळे गप्प का ?अशी जोरदार चर्चा ठिक ठिकाणी सुरू आहे . माजी आमदार बाळासाहेब दांगट यांच्याकडे शिवभक्त व कार्यकर्त्यांमध्ये याबाबत अमरण उपोषण किंवा धडक मोर्चा बाबत चर्चा जोरदार सुरू आहे.

# धार्मिक भावना दुखावल्याने जनआक्रोश 'जय श्रीराम'च्या घोषणा

- डांग कलेक्टर व पोलीस अधीक्षकांना आवेदन पत्र
- गारखडी-झरी गावाजवळील सीतावन येथे धार्मिक मूर्तींची विटंबना झाल्याच्या आरोपानंतर १ हजारांहून अधिक नागरिकांचा आक्रोश
- आरोपींना तात्काळ अटक करून कठोर कारवाईची मागणी



डांग, गुजरात : (स. गांवकरी)

डांग जिल्ह्याच्या पूर्व पट्ट्यातील गारखडी आणि झरी गावाजवळ असलेल्या सीतावन परिसरात धार्मिक मूर्तींची विटंबना झाल्याची गंभीर आणि संवेदनशील घटना समोर आली आहे. या ठिकाणी प्रभू श्रीराम, लक्ष्मण, हनुमान तसेच माता सीता यांच्या मूर्तींचे नुकसान करण्यात आल्याच्या आरोपामुळे संपूर्ण डांग जिल्ह्यात संतापाची लाट पसरली आहे.या घटनेमुळे स्थानिक नागरिक, भाविक तसेच विविध हिंदू संघटनांच्या धार्मिक भावना दुखावल्याचा आरोप करण्यात आला आहे.

घटनेच्या निषेधार्थ श्रावण महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी जिल्हा मुख्यालय आहवा येथे मोठ्या प्रमाणात आंदोलन करण्यात आले.

बिरसा मुंडा सर्कल येथून भव्य रॅली काढण्यात आली. रॅली शहरातील प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण करत जिल्हाधिकारी कार्यालयावर पोहोचली. यावेळी 'जय श्रीराम'च्या घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला होता. या आंदोलनात सुमारे १ हजार ते १ हजार २०० नागरिक सहभागी झाल्याचा दावा करण्यात आला आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयात पोहोचल्यानंतर आंदोलकांच्या वतीने जिल्हाधिकारी तसेच डांग जिल्हा पोलीस अधीक्षकांना निवेदन देण्यात आले. धार्मिक स्थळावरील मूर्तींचे नुकसान करणाऱ्या अज्ञात व्यक्तींची तात्काळ ओळख पटवून त्यांना अटक करावी आणि दोषींवर कठोरात कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.

तसेच भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी डांग जिल्ह्यातील महत्त्वाच्या आणि पौराणिक धार्मिक स्थळांवर सुरक्षा व्यवस्था अधिक कडक करण्याची मागणीही करण्यात आली.दरम्यान, या प्रकरणी डांग जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षक पूजा यादव यांनी अधिकृत माहिती देताना सांगितले की, वन परिसरातील माता सीतेची मूर्ती खंडित झाल्याच्या घटनेबाबत आहवा पोलीस ठाण्यात संबंधित कलमांनुसार नोंद करण्यात आली असून तपास सुरू आहे.

या प्रकरणाच्या तपासासाठी पोलिसांच्या विविध पथकांची नियुक्ती करण्यात आली असून परिसरातील १०० हून अधिक नागरिकांचे जबाब नोंदविण्यात आले आहेत. घटनास्थळाची वैज्ञानिक पद्धतीने तपासणी करण्यासाठी FSL अर्थात फॉरेन्सिक सायन्स लॅबोरेटरीच्या अधिकाऱ्यांचे पथक घटनास्थळी बोलावण्यात आले होते.

घटनास्थळावरून आवश्यक पुरावे गोळा करण्यात आले असून खंडित झालेली मूर्तीही पुढील वैज्ञानिक तपासणीसाठी FSLकडे पाठविण्यात आल्याचे पोलीस अधीक्षक पूजा यादव यांनी सांगितले.

तपासादरम्यान या घटनेत कोणाचीही भूमिका किंवा सहभाग आढळून आल्यास संबंधितांवर कायद्याच्या चौकटीत कठोर कारवाई करण्यात येईल, अशी स्पष्ट ग्वाही पोलीस अधीक्षकांनी दिली. तसेच जिल्ह्यातील कायदा आणि सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलीस यंत्रणा पूर्णपणे सतर्क असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. या आंदोलनावेळी डांगचे आमदार विजयभाई पटेल, भाजप जिल्हाध्यक्ष किशोरभाई गावित, पी.पी. स्वामीजी, साध्वी यशोदा दीदी, हेतल दीदी यांच्यासह डांग जिल्ह्यातील पाच राजे, विविध हिंदू संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते.

सीतावन येथील धार्मिक मूर्तींच्या विटंबनेच्या या प्रकरणाचा तपास आता पोलीस आणि FSLच्या अहवालावर केंद्रित झाला असून दोषींवर तातडीने कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे.

## नाभिक महामंडळ आंबेगाव तालुका अध्यक्षपदी सुनील शिंदे



जुन्नर तालुका : (स. गांवकरी)

महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे प्रदेशाध्यक्ष आदरणीय कल्याणराव दळे यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र नाभिक महामंडळ आंबेगाव तालुका अध्यक्षपदी सुनील आनंदा शिंदे यांची बिन विरोध निवड करण्यात आली. नवनिर्वाचित अध्यक्ष सुनील शिंदे यांचा महाराष्ट्र नाभिक महामंडळ पुणे जिल्हा अध्यक्ष अशोक नारायण मगर,जुन्नर व खेड तालुका संघटना यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी अशोक मगर म्हणाले की इतर मागासवर्गीय वंचित घटकांना न्याय देण्यासा ठी शासनाने रोहिणी आयोगा ची अंमलबजावणी करावी तसेच खेड,आंबेगाव, जुन्नर तालुक्यातील आदिवासी भागात राहणाऱ्या इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी पिंपरी चिंचवड शहर व पुणे शहरातील नामांकित महा विद्यालयात प्रवेश घेऊन शासनाच्या विविध शैक्षणिक सवलतीचा लाभ घेऊन आपली शैक्षणिक पात्रता वाढवावी असे प्रतिपादन केले. सुनील शिंदे यांना राजकीय व सामाजिक क्षेत्रातील खूप मोठा अनुभव आहे.नागापूर गावात उपसरपंच,सरपंच अशा विविध पदावर काम केल्याचा अनुभव आहे. कार्यक्रम संत सेना महाराज यांच्या प्रतिमेचे पुजन करुन उपस्थितांचे स्वागत सचिन देवडे यांनी केले.

## पिंपळगाव जोगा कॅनॉलची दुरवस्था

- आळे गावच्या हद्दीत कॅनॉल बनला कचरा कुंडी, प्रशासन सुस्त तर नागरिक त्रस्त

आळे (ता. जुन्नर) : (स. गांवकरी)

जुन्नर तालुक्याची जीवनवाहिनी समजल्या जाणाऱ्या पिंपळगाव जोगा धरणाच्या कॅनॉलची सध्या अत्यंत दयनीय अवस्था झाली असून, आळे गावच्या हद्दीतील कॅनॉलचा एक फोटो सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. या कॅनॉलच्या पाण्यात प्लास्टिक, घरगुती कचरा आणि घाणीचे प्रचंड ढीग साचलेले आहेत, ज्यामुळे संताप व्यक्त केला जात आहे.



आळे गावच्या हद्दीतून पिंपळगाव जोगा धरणाचा मुख्य कालवा जातो. या कालव्याचे पाणी आळे, पिंपळवंडी, आळेफाटा परिसरातील शेतकऱ्यांना शेतीसाठी आणि काही ठिकाणी पिण्यासाठी देखील वापरले जाते. मात्र गेल्या काही दिवसांपासून काही बेजबाबदार आणि अज्ञात व्यक्तींकडून रात्रीच्या वेळी या कॅनॉलमध्ये ट्रॅक्टर भरून कचरा आणून टाकला जात असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.कॅनॉलच्या जवळजवळ अर्धा भाग कचऱ्याने व्यापला आहे. प्लास्टिकच्या पिशव्या, थर्माकोल, खाद्य पदार्थांचे रॅपर्स, प्लास्टिक बाटल्या आणि घरातील उरलेला कचरा पाण्यावर तरंगत आहे. त्यामुळे पाण्याचा प्रवाह थांबला असून पाणी काळे आणि दुर्गंधीयुक्त झाले आहे.

सर्वात गंभीर बाब म्हणजे याच दूषित पाण्याच्या पाण्यामुळे डेंग्यू, मलेरिया, कॉलरा सारखे साथीचे रोग पसरण्याची दाट शक्यता आहे. तसेच हेच दूषित पाणी शेतात गेल्यास पिकांचेही मोठे नुकसान होण्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. वारंवार ग्रामपंचायत आणि पाटबंधारे विभागाला सांगूनही कोणी लक्ष देत नाही. हा कॅनॉल आहे की कचरा डेपो हेच कळत नाही. कचरा टाकणाऱ्यांना शोधून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी," अशी मागणी आळे येथील ग्रामस्थांनी केली आहे.

ग्रामस्थांच्या प्रमुख मागण्या -

१) पाटबंधारे विभागाने जेसीबीच्या सहाय्याने तातडीने कॅनॉलची स्वच्छता करावी.
२) कॅनॉलच्या दोन्ही बाजूला 'कॅनॉलमध्ये कचरा टाकण्यास सक्त मनाई, आढळल्यास ५००० रुपयांपर्यंत दंड' असे फलक लावावेत.
३) कचरा टाकणाऱ्या अज्ञात व्यक्तींवर कारवाई करण्यासाठी त्या ठिकाणी CCTV कॅमेरे बसवावेत.४)ग्रामपंचायतीने गावात घंटागाडी नियमित सुरु करावी जेणेकरून लोकांना कचरा कॅनॉलमध्ये टाकावा लागणार नाही.

या प्रकरणी पाटबंधारे विभागाचे अधिकारी आणि आळे ग्रामपंचायत प्रशासनाने तातडीने लक्ष घालून कायमस्वरूपी तोडगा काढावा, अशी मागणी होत आहे. अन्यथा ग्रामस्थांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

## हजारो मावळ्यांचे राजगडावर श्रमदान

- दुर्गसंवर्धनासाठी 'आपला मावळा'ची मोहीम
- खासदार नीलेश लंके यांच्या नेतृत्वाखाली १७ वी दुर्गसंवर्धन मोहीम
- पर्यटकांसाठी मूलभूत सुविधा उपलब्ध करण्यासाठी पाठपुराव्याची ग्वाही

पुणे : (स. गांवकरी)

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनात आणि स्वराज्याच्या इतिहासात अनन्यसाधारण महत्त्व असलेल्या किल्ले राजगडावर खासदार नीलेश लंके यांच्या नेतृत्वाखाली 'आपला मावळा' संघटनेच्या माध्यमातून रविवारी भव्य दुर्गसंवर्धन व स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. 'आपला मावळा' संघटनेची ही १७ वी दुर्गसंवर्धन मोहीम असून, या उपक्रमात हजारो स्वयंसेवकांनी उत्स्फूर्त सहभाग घेत राजगडाच्या संवर्धनासाठी श्रमदान केले. भल्या पहाटेच खासदार नीलेश लंके यांच्यासह 'आपला मावळा'चे शेकडो स्वयंसेवक राजगडाच्या पायथ्याशी दाखल झाले.इतिहासाचा अमूल्य वारसा जपण्याचा संकल्प करत स्वयंसेवकांनी गडावर विविध ठिकाणी स्वच्छता व संवर्धनाची कामे हाती घेतली. मोहिमेदरम्यान गडावरील कचरा संकलन, परिसराची स्वच्छता, आवश्यक ठिकाणी डागडुजी, दगड-दुरुस्ती



तसेच नामफलक लावण्यासह दुर्गसंवर्धनाचे विविध उपक्रम राबविण्यात आले. हजारो हातांनी केलेल्या श्रमदानामुळे गडाचा परिसर स्वच्छ करण्यास मोठी मदत झाली.

यावेळी खासदार नीलेश लंके यांनी राजगडाच्या ऐतिहासिक महत्त्वावर प्रकाश टाकला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासात राजगडाला अत्यंत विशेष स्थान असून, तब्बल २६ वर्षे हा किल्ला मराठा साम्राज्याची राजधानी होता. महाराजांच्या कारकिर्दीतील अनेक महत्त्वपूर्ण घडामोडींचा राजगड साक्षीदार राहिला आहे. त्यामुळे राजगड हा केवळ एक ऐतिहासिक किल्ला नसून स्वराज्याच्या गौरवशाली इतिहासाचा अत्यंत महत्त्वाचा ठेवा असल्याचे लंके यांनी सांगितले. मात्र, एवढे मोठे ऐतिहासिक आणि पर्यटनदृष्ट्या महत्त्व असलेल्या राजगडावर येणाऱ्या पर्यटक व शिवप्रेमींसाठी आवश्यक मूलभूत सुविधांचा अभाव असल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली. गडावर जाण्यासाठी पुरेसा व सुस्थितीतील रस्ता उपलब्ध नसल्याने पर्यटकांना अडचणींचा सामना करावा लागतो. विशेषतः महिलांसाठी आवश्यक शौचालयांची सुविधा नसल्याचे तसेच इतर मूलभूत सुविधाही अपुऱ्या असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले.

गड-किल्ल्यांचे जतन आणि संवर्धन करणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी असली, तरी या ऐतिहासिक ठिकाणी भेट देणाऱ्या पर्यटकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणेही तितकेच महत्त्वाचे असल्याचे लंके यांनी स्पष्ट केले. राजगडाच्या सर्वांगीण विकासासाठी शासन दरबारी सातत्याने पाठपुरावा करून आवश्यक सुविधा उपलब्ध करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, अशी ग्वाही त्यांनी दिली. 'आपला मावळा' संघटनेच्या माध्यमातून यापूर्वीही महाराष्ट्रातील विविध गड-किल्ल्यांवर दुर्गसंवर्धन, स्वच्छता आणि ऐतिहासिक वारसा जतनाच्या मोहिमा राबविण्यात आल्या आहेत. राजगडावरील १७ व्या मोहिमेत तब्बल हजार स्वयंसेवकांनी सहभाग घेत स्वराज्याच्या इतिहासाचा हा अनमोल वारसा जपण्यासाठी श्रमदान केले.

## MAHA ID कार्ड तयार करण्यासाठी नागरिकांची झाली प्रचंड गर्दी

मंचर : (स. गांवकरी)

आज दि.31,वार सोमवार रोजी मंचर मंचर शहरातील जनसेवक श्री संजय थोरात यांच्या जनसेवा जनसंपर्क कार्यालयात MAHA ID कार्ड तयार करण्यासाठी नागरिकांची मोठ्या प्रमाणात गर्दी झाल्याचे दिसून आले. राज्य सरकारच्या MAHA ID कार्डवर 93+ योजनांचा लाभ उपलब्ध असल्याची माहिती आहे विविध सरकारी योजना व सेवांचा लाभ घेण्यासाठी MAHA ID तयार असणे फायदेशीर ठरू शकते. विद्यार्थ्यांसाठी - शिष्यवृत्तीचा अर्ज करण्यासाठी महा आयडी बंधनकारक आहे. महा आयडी हे शेतकरी, कामगार,महिला,विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक,दिव्यांग व पात्र नागरिकासाठी आहे. ह्या कार्ड च्या माध्यमातून शिष्यवृत्ती, कामगार कल्याण योजना, महिला व बालकल्याण योजना,सामाजिक सुरक्षा योजना,विविध शासकीय अनुदान व सवलती साठी फायदेशीर



आहे. जनसेवक श्री संजय थोरात म्हणाले की,आजच महा आयडी काढा आणि शासकीय योजनांच्या लाभापासून वंचित राहू नका तुम्हाला जनसेवा जनसंपर्क कार्यालयाच्या माध्यमातून मोफत कार्ड काढून दिले जाईल काही अडचण,समस्या असल्यास व अधिक माहिती साठी जनसेवा जनसंपर्क कार्यालय,त्रिमूर्ती कॉम्प्लेक्स मंचर या ठिकाणी संपर्क करा. ह्या कार्ड मुळे एकाच डिजिटल ओळखीमुळे अनेक सरकारी सेवांपर्यंत सुलभ प्रवेश,ऑनलाइन प्रक्रिया, वेळेची बचत होणार आहे. इतर ठिकाणी 100 ते 200 रुपये घेऊन MAHA ID कार्ड काढून दिले जात आहे परंतु जनसेवक श्री संजय थोरात यांच्या माध्यमातून नि:शुल्क (मोफत) कार्ड बनून देण्यात येत आहे.

## तुरुकवाडी (ता. खेड) येथे गोहत्या प्रकरणी ११ जणांविरुद्ध गुन्हा दाखल

राजगुरुनगर : (स. गांवकरी)

खेड तालुक्यातील तुरुकवाडी (कडूस) येथे गोहत्या केल्याच्या आरोपावरून ११ जणांविरुद्ध खेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. खेड पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सोमवारी (दि.३१) ऑगस्ट रोजी रात्री सुमारे १२.४० वाजण्याच्या सुमारास पोलीस उपनिरीक्षक महेश गरड यांना डायल ११२ वरून मौजे तुरुकवाडी, कडूस (ता. खेड) येथे गोहत्या होत असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर पोलीस उपनिरीक्षक महेश गरड व पोलीस कर्मचारी विलास साबळे यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली. तुरुकवाडी येथील हबीब मनसुभ शेख यांच्या मालकीच्या मोकळ्या जागेत तसेच हसन चांद तुरुक यांच्या बंद घराच्या शेजारी रक्ताचे डाग व जनावराचे अवशेष आढळून आल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. याबाबत अधिक चौकशी केली असता काही संशयितांनी गाय कापून तिच्या मांसाचे तुकडे केल्याची माहिती समोर आली. या प्रकरणी सैफ असीफ शेख, मुक्तार गुलाब शेख, अरीफ सलीम शेख, जाकीर अब्बास शेख, असीफ महम्मद शेख, अजीज अब्दुलजलील शेख, शाकीर रज्जाक पठाण, अझाद गुलाब शेख, मुनीर मोहम्मद शेख, सद्दाम मकबुल शेख (सर्व रा. तुरुकवाडी, कडूस, ता. खेड) तसेच तोसीफ युसुफ शेख (रा. सांगवी, पुणे) अशा एकूण ११ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. योगीराज सुरेश करवंदे, रा. पाबळरोड राजगुरुनगर, दीपक पांडुरंग गावडे रा. राक्षेवाडी यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार रविवारी (दि.३०) ऑगस्ट रोजी रात्री ११ ते ११.३० वाजण्याच्या दरम्यान संबंधितांनी धारदार हत्याराने गाय कापून तिच्या मांसाचे तुकडे केले व ते आपापसात वाटून घेतले.

## लोकशाहीर अण्णाभाऊ साठेंनी साहित्य बरोबरच समाज जागृतीचे मोठे काम केले : सुनील उमाप

- बाभूळगाव खालसा येथे अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त रक्तदान शिबीर

कर्जत : (स. गांवकरी)

साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य आजही समता, स्वाभिमान, सामाजिक न्याय आणि माणूसकीचा संदेश देत राहिले आहे. त्यांनी साहित्य बरोबरच समाज जागृतीचे मोठे काम केले आहे, असे प्रतिपादन अनुसूचित जाती भारतीय जनता पार्टी मोर्चाचे जिल्हाध्यक्ष सुनिल उमाप यांनी केले. कर्जत तालुक्यातील बाभुळगाव खालसा येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त येथील




आईसाहेब बहुउद्देशीय सेवाभावी संस्था व साहित्यरत्न डॉ.अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव समिती, बाभूळगाव खालसा यांच्या वतीने रविवारी, दि.३० रोजी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या व महापुरुषांच्या प्रतिमेला उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाकरिता अनुसूचित जाती भारतीय जनता पार्टी मोर्चाचे जिल्हाध्यक्ष सुनिल उमाप, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गटाचे कर्जत तालुकाध्यक्ष रघुआबा काळदाते, आईसाहेब बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुनिल भाऊ शिंदे, सचिव परशुराम शिंदे, तसेच शुभम पुराणे, अनंता पुराणे, उद्योजक आयुब भाई शेख, ज्ञानदेव पाबळे सर, भास्कर कदम सर, विकास झोडगे, सुधीर गुंड, हरिभाऊ कापरे, गोपीनाथ उदमले, राजाराम काळे, अक्षय वायदंडे, बापू शिंदे, पांडू शिंदे, संतोष शिंदे, किरण शिंदे, ज्ञानेश्वर बाबर यांच्यासह करमाळा येथील श्री. कमला भवानी ब्लड बँकेचे कर्मचारी आणि जयंती उत्सव समितीचे सर्व पदाधिकारी समस्त ग्रामस्थ, मोठ्या संख्येने उपस्थित होते. सुनील शिंदे म्हणाले, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी शाहिरी आणि साहित्य प्रतिभेच्या माध्यमातून उपेक्षितांच्या व कामगारांच्या लढाईचा आवाज बुलंद केला. समाज मन जागृत केले. अण्णाभाऊ साठे यांचे समाजकार्य दीनदुबळ्या व तळागळातील समाजाकरिता प्रेरणादायी असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

# डॉ. फिक्सिटने आपले वचनकेले अधिक दृढ

पुणे : (स. गांवकरी)



पिडिलाइट इंडस्ट्रीज लिमिटेडचा वॉटरप्रूफिंग सोल्यूशन्स ब्रँड डॉ. फिक्सिट ने महाराष्ट्रातील सर्वाधिक पूजनीय आध्यात्मिक यात्रांपैकी एक असलेल्या पंढरपूर वारी 2026 मध्ये सहभागी झालेल्या वारकऱ्यांना सहकार्य करून घरांच्या पलीकडे जाऊन संरक्षणाचे आपले वचन अधिक दृढ केले. डॉ. फिक्सिट पंढरपूर वारी 2026 या ऑन-ग्राउंड उपक्रमांतर्गत पावसाळ्यातील वातावरणात यात्रा करणाऱ्या भाविकांचा प्रवास अधिक आरामदायी व्हावा, यासाठी विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. या उपक्रमाचा एक भाग म्हणून, चालते छत (Walking Roof Shades) वारकऱ्यांसोबत संपूर्ण प्रवासात होते, ज्यामुळे त्यांना पावसापासून संरक्षण मिळाले आणि मार्गात विश्रांतीचे क्षण अनुभवता आले. तसेच, तंबूंची व्यवस्था करून भाविकांना थांबून विश्रांती घेण्यासाठी जागा उपलब्ध करून देण्यात आली, तर विशेष ड्रायिंग स्टेशनमुळे पावसात भिजल्यानंतर स्वतःला कोरडे करून ताजेतवाने होण्याची सुविधा मिळाली. याशिवाय, अनिश्चित हवामानापासून अतिरिक्त संरक्षण मिळावे म्हणून रेनकोटचेही वितरण करण्यात आले, ज्यामुळे वारकऱ्यांना त्यांचा प्रवास अधिक आरामात सुरू ठेवता आला. या उपक्रमाविषयी बोलताना पिडिलाइट इंडस्ट्रीज लिमिटेडचे मुख्य विपणन अधिकारी श्री. संदीप तनवानी म्हणाले, "पिडिलाइटमध्ये आम्ही मानतो की, जिथे लोकांना संरक्षणाची सर्वाधिक गरज असते तिथे ते पोहोचले, तरच त्याला खरा अर्थ प्राप्त होतो.

# दावे (क्लेम्स) हेच विश्वासाचे आहे चलन - डॉ. पोरस पेश्तोतॉन

पुणे : (स. गांवकरी)

विमा हे आज दिलेले एक वचन आहे. ते अनेक वर्षांनंतर उद्भवणाऱ्या गरजेसाठी दिले जाते. परंतु, या वचनाची खरी कसोटी फक्त एकाच क्षणी लागते: विमा हप्ता भरला जातो तेव्हा. त्यामुळेच, विमा हप्ता भरण्याच्या प्रक्रियेकडे केवळ एक कार्यात्मक मापदंड म्हणून न पाहता, जीवन विमा कंपनीसाठी विश्वासाचे चलन म्हणून पाहिले पाहिजे. तसेच, एखादी विमा कंपनी आपला मूलभूत उद्देश पूर्ण करत आहे की नाही, याचे हे सर्वात स्पष्ट मोजमाप आहे. भारताची विमा बाजारपेठ विस्तारत असल्यामुळे या प्रश्नाचे महत्त्व वाढत आहे. आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये जीवन विमा उद्योगाने ८.८६ लाख कोटी रूपयांचा प्रीमियम गोळा केला, जो मागील वर्षाच्या तुलनेत ६.७३ टक्क्यांनी अधिक होता. तरीही, जीवन विम्याचा प्रसार जीडीपीच्या २.७ टक्क्यांपर्यंत घसरला. ॲक्सिस मॅक्स लाईफ इन्शुरन्स लिमिटेड चे मुख्य अंडररायटर डॉ. पोरस पेश्तोतॉन म्हणाले की ॲक्सिस मॅक्स लाईफमध्ये आमचा वैयक्तिक मृत्यू दाव्यांचा पेड रेशो सलग पाच वर्षे ९९% पेक्षा जास्त राहिला आहे.

# 1 Finance ने मंजू ढाके यांची पार्टनर म्हणून केली नियुक्ती

मुंबई : (स. गांवकरी)



वैयक्तिक आर्थिक सल्ला आणि वेल्थ-टेक क्षेत्रात काम करणाऱ्या 1 Finance या कंपनीने मंजू ढाके यांची पार्टनर म्हणून नियुक्ती केली आहे. 1 Finance कडे सध्या 17,000 कोटीं रुपयांपेक्षा जास्त ॲसेट्स अंडर ॲडव्हाइस (AUA) आहेत. पार्टनर म्हणून त्या पुण्यातील कंपनीच्या फायनान्शियल प्लॅनिंग सेंटरचे नेतृत्व करतील. तसेच पुण्यातील ग्राहकांसाठी आर्थिक सल्ला सेवा अधिक मजबूत करण्याची जबाबदारी त्यांच्याकडे असेल. मंजू ढाके यांना विमा, वितरण, आर्थिक सल्ला आणि वित्तीय सेवा क्षेत्रात 20 वर्षांहून अधिक अनुभव आहे. त्यांनी अनेक व्यवसाय आणि सेवा शून्यापासून उभ्या केल्या आहेत. व्यवसायाची रणनीती, उत्पादन आणि नियमांचे पालन (कंप्लायन्स), भागीदारी, वितरण आणि ग्राहककेंद्रित आर्थिक सल्ला या क्षेत्रांचा त्यांना चांगला अनुभव आहे. त्यांनी आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाइफ, एचडीएफसी लाइफ, एल अँड टी फायनान्स, सुशील इन्शुरन्स ब्रोकर्स तसेच फिनटेक क्षेत्रातील कंपन्यांमध्ये काम केले आहे. 1 Finance मध्ये त्यांनी विमा सल्ला सेवा सुरू करून ती मजबूत करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. तसेच ग्राहकांना त्यांच्या विमा आणि आर्थिक संरक्षणाबाबत योग्य निर्णय घेता यावा यासाठी संशोधनावर आधारित मार्गदर्शक पद्धती तयार करण्यात त्यांनी योगदान दिले आहे.

त्यांच्या कामामध्ये टर्म आणि हेल्थ इन्शुरन्सचे स्कोअरिंग आणि रँकिंग, मॉर्टेलिटी प्रोटेक्शन गॅप आणि सरेंडर व्हॅल्यू कॅल्क्युलेटर यांचा समावेश आहे.

## थोडक्यात बातम्या...



### अन्नदान हेच श्रेष्ठदान! सिद्धेश्वरच्या पायथ्याशी आर्यन्स ग्रुपचा महाप्रसाद

- तिसऱ्या श्रावणी सोमवारी भाविकांची तुफान गर्दी
- जयदरच्या तरुणाईचा सालाबादप्रमाणे उपक्रम
- फराळ खिचडी आणि फळ प्रसादाने भाविक तृप्त

कनाशी (स. गांवकरी) : श्रावण महिन्यातील तिसऱ्या सोमवारच्या पावन पर्वावर तीर्थक्षेत्र सुळे सिद्धेश्वर नगरी भक्तिमय झाली असतानाच, कळवण तालुक्यात नेहमीच चर्चेत असणाऱ्या आर्यन्स ग्रुप, जयदर या तरुणांच्या ग्रुपने सामाजिक बांधिलकी जपत अन्नदानाचा अनोखा आदर्श घालून दिला आहे. सालाबादप्रमाणे याही वर्षी आर्यन्स ग्रुपच्या वतीने सिद्धेश्वर येथे येणाऱ्या हजारो शिवभक्तांसाठी फराळ खिचडी आणि फळांच्या महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी ठीक 8 वाजल्यापासूनच भाविकांनी प्रसादाचा लाभ घेतला. कळवण तालुक्यात आर्यन्स ग्रुप म्हटला की अन्नदान आलंच! कोणताही सण असो, यात्रा असो वा संकट असो, हा ग्रुप अन्नदानात कधीच कमी पडत नाही. त्यामुळेच या ग्रुपची तालुकाभर चर्चा असते आणि 'अन्नदान हेच श्रेष्ठ दान' हे वाक्य या ग्रुपने खरंच सिद्ध करून दाखवले आहे, अशी भावना भाविकांनी व्यक्त केली. या प्रसंगी आर्यन्स ग्रुपच्या सर्व सदस्यांनी मोठ्या मेहनतीने हा प्रसाद वाटपाचा कार्यक्रम यशस्वी केला.



### दिव्यात मनसेची ताकद वाढली ; ६०० हून अधिकांचा पक्षप्रवेश

- मनसेला ऑनलाइन नोंदणी

ठाणे, दिवा (स. गांवकरी) : दिवा शहरात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने भव्य पक्षप्रवेश सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. सदर सोहळ्यात ६५० पेक्षा अधिक नागरिकांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेत जाहीर प्रवेश केला. मनसे नेते प्रमोद (राजू) रतन पाटील यांच्या हस्ते या सर्व नागरिकांना महाराष्ट्र नवनिर्माण सेनेत प्रवेश देण्यात आला. विशेष म्हणजे या नागरिकांनी कोणत्याही दबावाशिवाय स्वतःहून ऑनलाइन नोंदणी करून मनसेमध्ये काम करण्याची इच्छा व्यक्त केली होती. मनसेच्या वतीने दिव्यातील नागरिकांना महाराष्ट्र नवनिर्माण सेनेसोबत काम करण्याची इच्छा असल्यास ऑनलाइन लिंकच्या माध्यमातून नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले होते. या आवाहनाला दिवेकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने आपली नोंदणी केली. दिवा शहरातील सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न, स्थानिक समस्या, मूलभूत सुविधा, मराठी माणसाचे हक्क आणि दिव्याच्या विकासासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेना सातत्याने आक्रमकपणे काम करत आहे. या कामाची दखल घेत नागरिक स्वतःहून मनसेशी जोडले जात असल्याचे या पक्ष प्रवेश सोहळ्यातून स्पष्ट झाले आहे. पक्षात प्रवेश केलेल्या सर्व नवीन महाराष्ट्र सैनिकांचे मनसे नेते श्री. प्रमोद (राजू) रतन पाटील यांनी स्वागत केले. तसेच येणाऱ्या काळात दिवा शहराच्या विकासासाठी आणि नागरिकांच्या प्रश्नांसाठी संघटितपणे काम करण्याचे आवाहन करण्यात आले. स्वतःहून पक्षप्रवेश हा दिवा शहरातील नागरिकांचा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेवरील वाढता विश्वास आणि बदलाची इच्छा दर्शविणारा जनतेचा कौल आहे, अशी भावना यावेळी मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

### शेतकऱ्यांच्या उसाला ५००० हजार रुपये पेक्षा जास्त भाव देणार

शिवनेरी (स. गांवकरी) : साखरेचे बाजार भाव असेच वाढत राहावा अशी अपेक्षा आहे . साखरेचे बाजारभाव वाढले की , शेतकऱ्यांना ५००० हजार रुपये पेक्षा भाव देण्यास परवडणार आहे असे श्री विघ्नहर सहकारी साखर कारखाना चेअरमन सत्यशील शेरकर यांनी कार्यक्रमाप्रसंगी सांगितले. चेअरमन सत्यशील शेरकर पुढे म्हणाले की , आमचा शेतकरी सदन आहे .श्री विघ्नहर सहकारी साखर कारखाना कमी दिवसात जास्त उत्पादन करणार आहे . त्यामुळे शेतकऱ्यांना जास्त पैसे देणार आहे. बाजारात साखर नाही, त्यामुळे बाजारभाव वाढते आहे . महाराष्ट्रात ७०% जवळपास कारखान्यात साखर संपली आहे .सगळीकडे साखरेचा तोटा ,जोपर्यंत साखर बाजारात येत नाही ,तोपर्यंत साखरेचे बाजारभाव कमी होणार नाही . केंद्र सरकार व महाराष्ट्र सरकार यांनी कारखाने तपासले आहेत. एकही साखर पोते व्यापाराकडे व कारखाना गोडाऊनकडे शिल्लक राहणार नाही याची जबाबदारी सरकारने घेतली आहे. सरकार कारखाना गोडाऊनकडे साखर किती शिल्लक याबाबत पत्र व्यवहार सुरू आहे . यामुळे साखरेचे बाजार भाव वाढले की , उसाला बाजार भाव वाढणार असे चेअरमन शेरकर यांनी सांगितले.

# शिनोली येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे जंगी स्वागत

- रुग्णवाहिकेच्या मागणीवर सकारात्मक प्रतिसाद

शिनोली (ता. आंबेगाव): (स. गांवकरी)



श्री क्षेत्र भीमाशंकर ज्योतिर्लिंगाच्या दर्शनासाठी जात असताना महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री मा. एकनाथजी शिंदे यांचे शिनोली येथे शिवसेना पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थांच्या वतीने उत्स्फूर्त आणि जंगी स्वागत करण्यात आले. यावेळी शिनोली व परिसरातील नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या रुग्णवाहिकेच्या मागणीचे निवेदन उपमुख्यमंत्री शिंदे यांना देण्यात आले. या मागणीची गांभीर्याने दखल घेत त्यांनी संबंधित प्रशासनाला तातडीने कार्यवाही करण्याबाबत सकारात्मक आश्वासन दिले.

उपमुख्यमंत्री शिंदे हे भीमाशंकर दर्शनासाठी जात असताना शिनोली गावात काही वेळ थांबले. यावेळी शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थांनी त्यांचे उत्साहात स्वागत केले. या भेटीदरम्यान शिनोली व परिसरातील ग्रामीण भागातील आरोग्यसेवेचा प्रश्न त्यांच्या निदर्शनास आणून देण्यात आला. आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांना तातडीने उपचार मिळण्यासाठी तसेच गंभीर रुग्णांना पुणे किंवा मंचर येथील रुग्णालयात हलविण्यासाठी गावासाठी स्वतंत्र रुग्णवाहिका उपलब्ध असणे अत्यावश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले. शिनोली परिसरातील नागरिकांची रुग्णवाहिकेची मागणी अनेक दिवसांपासून प्रलंबित आहे. ग्रामीण भागात आपत्कालीन वैद्यकीय सुविधा वेळेत उपलब्ध न झाल्याने रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे गावासाठी हक्काची रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्यात यावी, अशी मागणी स्थानिक पदाधिकारी व ग्रामस्थांनी केली. निवेदन स्वीकारल्यानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या मागणीबाबत सकारात्मक भूमिका घेत संबंधित प्रशासनाशी तातडीने कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले.

याप्रसंगी माऊली सेवा फाउंडेशनचे संस्थापक माऊलीशेठ बोराडे, राजेंद्र नानाभाऊ बोराडे, गौरवशेठ बोराडे, वल्लभनाना बोराडे, शिवसेना विभागप्रमुख संदीपभाऊ ढेरंगे, शिवसेना उपशाखाप्रमुख दिलीप काळे तसेच शिवसेना बूथप्रमुख मारुती काळे यांच्यासह शिवसेनेचे स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कौटुंबिक वादातून पतीने पत्नीचा गळा आवळून खून

राजगुरुनगर : (स. गांवकरी)



कौटुंबिक वादातून पतीने ४० वर्षीय पत्नीचा गळा आवळून खून केल्याची आणि त्यानंतर १७ वर्षीय मुलावरही चाकूने जीवघेणा हल्ला करण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना राजगुरुनगर शहरातील वाडा रोड परिसरात घडली. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. महेंद्र शिवाजी दौंडकर (वय ४५, रा. संगम गार्डन, वाडा रोड, राजगुरुनगर; मूळ रा. कनेरसर, ता. खेड) असे फरार आरोपी पतीचे नाव आहे, तर दिपा महेंद्र दौंडकर (वय ४०) असे मृत महिलेचे नाव आहे. ही घटना रविवारी (दि. ३०) रात्री सुमारे ९.३० ते ११.३५ वाजण्याच्या दरम्यान वाडा रोड येथील त्यांच्या राहत्या घरात घडली. याप्रकरणी १७ वर्षीय मुलाने खेड पोलिस ठाण्यात फिर्याद दिली असून घटनेनंतर आरोपी महेंद्र दौंडकर फरार झाला आहे. पोलिसांकडे दाखल करण्यात आलेल्या फिर्यादीनुसार, बहिणीशी बोलत नसल्याच्या कारणावरून महेंद्र दौंडकर यांचा पत्नी दिपा यांच्याशी कौटुंबिक वाद झाला. या वादातून त्यांनी दिपा यांचा गळा आवळून खून केल्याचा आरोप आहे. घटनेच्या वेळी मुलगा शेजारील घरात होता. काही वेळाने तो घरी आल्यानंतर वडिलांनी आई बेडरूममध्ये झोपली असल्याचे सांगितले. त्यानंतर मुलगा आईला उठविण्यासाठी बेडरूममध्ये गेला असता त्याला संशयास्पद परिस्थिती जाणवली.

# रस्त्यावरची एक चूक एखाद्या कुटुंबाचे आयुष्य उद्ध्वस्त करू शकते'

ठाणे : (स. गांवकरी)



- रस्ता सुरक्षा जनआंदोलन करण्याचे परिवहन मंत्र्यांचे आवाहन

रस्त्यावर वाहतुकीचा नियम मोडणे ही केवळ कायदेशीर चूक नसून, एखाद्या कुटुंबाचे आयुष्य उद्ध्वस्त करणारी गंभीर बाब ठरू शकते. त्यामुळे रस्ता सुरक्षा ही पोलीस किंवा परिवहन विभागापुरती मर्यादित नसून प्रत्येक वाहनचालक, पादचारी आणि नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे, असे प्रतिपादन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले. ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या वतीने 'रस्ता सुरक्षा अभियान २०२६' अंतर्गत सुरू करण्यात आलेल्या 'Traffic School on Wheels' उपक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी ठाणे महापौर शर्मिला पिंपळोलकर, कल्याण-डोंबिवली महापौर हर्षाली चौधरी, आमदार संजय केळकर, आमदार रवींद्र फाटक, पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे, सहपोलीस आयुक्त डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण यांच्यासह अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. 'सडक सुरक्षा, जीवन रक्षा' हा केवळ घोषवाक्याचा विषय नसून प्रत्येकाच्या जीवनाशी जोडलेली जबाबदारी आहे. 'Traffic School on Wheels'च्या माध्यमातून विद्यार्थी, वाहनचालक, व्यावसायिक चालक आणि नागरिकांना हेल्मेट, सीटबेल्ट, वेगमर्यादा, सिग्नल व लेन शिस्त तसेच मद्यपान करून वाहन चालविण्याचे गंभीर परिणाम याबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे. मोबाईलवर बोलत किंवा संदेश पाठवत वाहन चालविणे, अतिवेग, हेल्मेट न वापरणे आणि वाहतूक नियमांकडे दुर्लक्ष करणे या सवयी अपघातांना निमंत्रण देतात. त्यामुळे विशेषतः तरुणांनी रस्ता सुरक्षेला दैनंदिन जीवनशैलीचा भाग बनवावा, असे आवाहन सरनाईक यांनी केले. २०२३च्या आकडेवारीनुसार भारतात रस्ते अपघातांत ३५,२०३ पादचारी आणि ७७,५३९ दुचाकीस्वारांचा मृत्यू झाला, तर महाराष्ट्रात ३,११० पादचारी आणि सुमारे ७,७८२ दुचाकीस्वारांना जीव गमवावा लागला.

# आनंदीबाई एरंडे यांचे निधन

अहिल्यानगर : (स. गांवकरी)



एरंडेमळा, वडझिरे,ता.पारनेर येथील ज्येष्ठ नागरिक, धार्मिक वृत्तीच्या आणि प्रेमळ स्वभावाच्या श्रीमती आनंदीबाई नारायण एरंडे (वय ८२) यांचे रविवार दि. २३ रोजी सकाळी ८ वाजता पुणे येथे वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने एरंडे कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून परिसरातही हळहळ व्यक्त होत आहे. कै. आनंदीबाई एरंडे यांच्या पार्थिवावर रविवारी सायंकाळी ५ वाजता एरंडेमळा, वडझिरे येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी नातेवाईक, मित्रपरिवार, ग्रामस्थ तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांसह मोठा जनसमुदाय उपस्थित होता. कर्जत-जामखेडचे आमदार रोहितदादा पवार यांनी उद्योजक रामचंद्र एरंडे यांची भेट घेत कुटुंबियांचे सांत्वन केले आणि कुटुंबाची विचारपूस केली. कै. आनंदीबाई एरंडे या धार्मिक वृत्तीच्या, मनमिळावू, प्रेमळ आणि माणुसकी जपणाऱ्या स्वभावाच्या म्हणून परिचित होत्या.

# लिटमॉसने पुण्यात नवीन कार्यालयाचे केले उद्घाटन

पुणे : (स. गांवकरी)




जागतिक लर्निंग ॲक्सीलरेशन प्लॅटफॉर्म असलेल्या लिटमॉसने पुण्यात आपले नवीन सुरू करून एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. लिटमॉस एआय युगात १५० देशांमधील ११,००० हून अधिक संस्थांना त्यांचे कार्यबल, भागीदार आणि ग्राहकांमध्ये मानवी क्षमता निर्माण करण्यास मदत करते. हे नवीन स्थान भारतामध्ये एक मजबूत अभियांत्रिकी समुदाय निर्माण करण्याच्या दृष्टीने एक धोरणात्मक गुंतवणूक आहे. ती जगभरातील विद्यमान डेव्हलपर कार्यक्रमाला पूरक असून लिटमॉसच्या जागतिक तंत्रज्ञान क्षमतांचा विस्तार करणारी आहे. लिटमॉसचे मुख्य कार्यकारी अधिकारी एरिक व्हर्मिलियन, लिटमॉसचे सीटीओ ब्रायन सोबस आणि इंडिया ऑपरेशन्सचे संचालक सरबजीत सिंग यांच्या उपस्थितीत फीत कापून या कार्यालयाचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले. लिटमॉसचे मुख्य कार्यकारी अधिकारी एरिक व्हर्मिलियन म्हणाले, "पुण्यातील आमच्या कार्यालयाची सुरुवात ही लिटमॉसच्या लोक, तंत्रज्ञान आणि जागतिक क्षमतांमध्ये सतत गुंतवणूक करण्याच्या दृष्टीने एक महत्त्वाचा टप्पा आहे. भारताकडे जगातील सर्वात सखोल आणि सर्वाधिक कुशल तंत्रज्ञान प्रतिभा आहे. इथे असाधारण अभियांत्रिकी कौशल्य, मजबूत शैक्षणिक पाया आणि जागतिक स्तरावरील जटिल आव्हाने सोडवण्याचा अनुभव आहे. विशेषतः पुण्यात अनुभवी व्यावसायिक आणि उदयोन्मुख प्रतिभा यांचा अपार साठा असल्यामुळे एक उत्साही तंत्रज्ञान परिसंस्था तयार झाली आहे. भारतामुळे आमच्या विद्यमान जागतिक अभियांत्रिकी प्रतिभेमध्ये सखोल अनुभवाची भर पडत असून या नवीन अध्यायामुळे निर्माण होणाऱ्या या शक्यतांबद्दल आम्ही उत्सुक आहोत." लिटमॉसच्या इंडिया ऑपरेशन्सचे संचालक सरबजीत सिंग म्हणाले, "या नवीन कार्यालयामुळे लिटमॉसला एकाच ठिकाणी एकत्र राहण्याचे खरे फायदे समजण्यास मदत होईल. यामध्ये स्वाभाविकपणे घडणारे मार्गदर्शन आणि ज्ञानाचे आदानप्रदान तसेच दूरून साध्य करता येणे अवघड असलेले शिक्षण आणि सहयोग यांचा समावेश आहे. पुण्यातील टीम स्वतःचे कौशल्य वाढवत असताना आणि लिटमॉसच्या जागतिक यशात योगदान देण्याची संधी प्राप्त करत असताना तिला पाठिंबा देण्याची ही संधी मिळाल्याबद्दल मी विशेष आनंदी आहे." पुण्यातील कार्यालयाचे हे उद्घाटन म्हणजे लिटमॉसमधील लक्षणीय वाढ आणि नावीन्यपूर्णतेच्या कालखंडाचा एक विस्तार आहे. त्याच्या उत्पादनांमधील सुधारणा, नवीन कार्यकारी नेमणुका आणि नवीन भागीदारी यांचा त्यात समावेश आहे.

# डीजे, लेझरमुक्त गणेशोत्सवाचा आदर्श 'पुणे पॅटर्न' निर्माण व्हावा

## गणेशोत्सव, दहीहंडीत अंगविक्षेप कृष्णाला व गणपतीला आवडेल का? खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णींचा परखड सवाल

पुणे : (स. गांवकरी)



महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी अशी पुण्याची ओळख असून, पुण्यातील गणेशोत्सव जगभर प्रसिद्ध आहे. त्यामुळे पुण्याने महाराष्ट्रासाठी गणेशोत्सवाचा आदर्श घालून देणारा 'पुणे पॅटर्न' तयार करावा. कोणत्याही जाती-धर्माचा सण, उत्सव असला, तरी कायद्याची कडक अंमलबजावणी व्हावी. डीजे, प्लाझ्मा, लेझर लाईटसारख्या गोष्टींवर पूर्णपणे बंदी आणावी," असे परखड मत राज्यसभा खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांनी व्यक्त केले. अर्धनग्न अवस्थेमध्ये जर का महिला दहीहंडीसाठी येऊन अंगविक्षेप करत असतील, तर हे श्रीकृष्णला तरी आवडणार आहे का? गणपतीला तरी आवडणार आहे का? याचा विचार मंडळांनी, कार्यकर्त्यांनी आणि लोकप्रतिनिधींनी करायला हवा, असेही त्यांनी स्पष्टपणे सांगितले. प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी म्हणाल्या, "गेल्या अनेक वर्षांपासून डीजे, गोंगाट आणि उत्सवाला गालबोट लावणाऱ्या गोष्टींविरोधात भूमिका मांडत आले आहे. त्यामुळे केवळ गणेशोत्सवच नाही, तर कोणत्याही सार्वजनिक कार्यक्रमांमध्येही डीजेचा दणदणाट बंद व्हावा, असे मला वाटते. सण-उत्सवांच्या काळात वाजणाऱ्या कर्णकर्कश डीजेमुळे लहान मुले, वृद्ध नागरिक, उच्च रक्तदाब व इतर गंभीर आजारांनी ग्रस्त असणाऱ्या रुग्णांना तीव्र त्रास सहन करावा लागतो. त्यामुळे उत्सव साजरा करत असताना या सगळ्याचा अवश्य विचार व्हायला हवा. गोंगाटामुळे उत्सवाच्या काळात नागरिकांना शहरातून स्थलांतरित होण्याची वेळ येऊ देऊ नये. न्यायालयाने घालून दिलेल्या आवाजाच्या मर्यादा आणि नियमांचे काटेकोर पालन करावे. गणेशोत्सवाच्या काळात गुटख्याच्या किंवा आरोग्यास घातक असणाऱ्या उत्पादनांच्या सरोगेट (छुप्या) जाहिराती स्वीकारु नयेत."

त्या पुढे म्हणाल्या, "लोकमान्य टिळक यांनी समाजप्रबोधनाच्या उद्देशाने गणेशोत्सव सार्वजनिक केला. यामध्ये व्याख्याने, वैचारिक देवाणघेवाण, मुलांसाठी विविध स्पर्धा आणि सांस्कृतिक उपक्रम यांसारख्या समाजासाठी उपयुक्त गोष्टी व्हायला हव्यात. पुण्यातील बरीच मंडळे अशाप्रकारे प्रबोधनपूर्ण उत्सव साजरा करतात. अशा मंडळांचा आदर्श सर्वांनी घ्यावा. पुण्यातील सुमारे २०० गणेश मंडळांनी यंदा डीजे न वापरता विधायक व पारंपरिक पद्धतीने गणेशोत्सव साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांचे अनुकरण इतर मंडळांनीही करावे आणि हा उत्सव समाजातील सगळ्यांनाच सुसह्य कसा होईल याकडे प्रामुख्याने लक्ष द्यायला हवे."

अश्लील गाणी, धर्माला न शोभणारे वर्तन अशाप्रकारे उत्सव साजरे करु नयेत. पोलीस प्रशासनाने कायदा व सुव्यवस्थेचे रक्षण करताना सभ्यता राखावी आणि सर्वसामान्य पुणेकरांना आपल्या हक्कासाठी रस्त्यावर उतरण्याची वेळ येऊ नये, अशी परिस्थिती निर्माण करावी, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. आपल्या देशात ध्वनीप्रदूषणाकडे मोठ्या प्रमाणात दुर्लक्ष केले जाते, इतर देशांत मात्र पर्यावरण जपण्यासाठी कडक नियम आहेत. आपल्या देशात मात्र पर्यावरणाकडे मोठ्या प्रमाणात दुर्लक्ष होताना दिसते. मात्र पर्यावरण, प्रदूषण याबाबत वैयक्तिक स्तरावर आणि सार्वजनिक स्तरावरही प्रत्येकाने योग्य पद्धतीने विचार आणि कृती करण्याची वेळ आली आहे, असेही त्यांनी सांगितले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ३८ए, सोमेश्वर अपार्टमेंट, अदाते/शिंदे हॉस्पिटलजवळ, पुरूषोत्तम व्हिला समोर, वडगांव बुद्रुक, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 । पाने : ४ । वर्ष : ४ थे । अंक : २५८ । किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
# समर्थ गांवकरी
संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




मंगळवार दि. ०१ सेप्टेंबर २०२६
मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## भटके-विमुक्तांच्या सर्वांगीण विकासासाठी आर्थिक सक्षमीकरणावर भर द्यावा : राज्यपाल जिष्णु देव वर्मा

### ‘भटके-विमुक्त दिवस’ निमित्त राज्यस्तरीय कार्यक्रम

**पुणे (समर्थ गांवकरी)**

भटके-विमुक्त समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण, कौशल्य विकास, स्वयंरोजगार आणि आर्थिक सक्षमीकरणाला प्राधान्य देण्याची गरज आहे. या समाजातील कोणत्याही बालकाचे शिक्षण त्यांच्या भटक्या जीवनपद्धतीमुळे बाधित होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी, असे आवाहन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केले.

फर्ग्युसन महाविद्यालयात महाराष्ट्र शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्यावतीने आयोजित ‘भटके-विमुक्त दिवस’ या राज्यस्तरीय कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, आमदार डॉ. नीलम गोऱ्हे, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, भटके-विमुक्त विकास परिषदेचे अध्यक्ष उद्धवराव काळे, इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सचिव आप्पासो धुळाज, संचालक सोनाली मुळे आदी उपस्थित होते.

‘भटके-विमुक्त दिवस’ अन्यायातून मुक्ती, आत्मसन्मान, अधिकार, शिक्षण, सक्षमीकरण आणि सामाजिक प्रतिष्ठेचा दिवस असल्याचे नमूद करीत राज्यपाल वर्मा म्हणाले, शिक्षण ही या समाजाच्या विकासाची सर्वात मोठी शक्ती असून, त्यासोबत कौशल्य विकास आणि पुनर्कौशल्य विकासावरही भर देणे आवश्यक आहे. पालकांच्या भटक्या जीवनपद्धतीमुळे मुलांचे शिक्षण खंडित होऊ नये, यासाठी कुटुंबे वास्तव्यास असलेल्या ठिकाणी मुलांच्या शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून द्यावी. वसतिगृहे, आश्रमशाळा, शिष्यवृत्ती, डिजिटल शिक्षण, उच्च व व्यावसायिक शिक्षण तसेच संशोधनाच्या संधी वाढविण्याची आवश्यकता आहे, असे त्यांनी सांगितले.

भटके-विमुक्त समाजातील मुलींच्या शिक्षणाला विशेष प्राधान्य देण्याची गरज असून, एक शिक्षित मुलगी संपूर्ण कुटुंबाचे आणि पुढील पिढ्यांचे भविष्य बदलू शकते, असेही त्यांनी नमूद केले. विद्यार्थ्यांना उच्च व व्यावसायिक शिक्षणाच्या संधींशी जोडण्यासाठी ‘स्कूल कनेक्ट’सारख्या उपक्रमांचा उपयोग होत असल्याचे त्यांनी सांगितले.

भटके-विमुक्त आणि घुमंतू समाजाचे शेती, शिल्पकला, पशुपालन, वाहतूक, लोककला क्षेत्रातील योगदानाचा विशेष उल्लेख करून राज्यपाल वर्मा म्हणाले, भटके-विमुक्त समाजाचा संघर्ष हा केवळ इतिहासाचा नाही तर सामाजिक न्यायाचा विषय आहे. स्थिर निवास, जमिनीचा अधिकार, नागरिकत्वाची कागदपत्रे, शिक्षण, आरोग्य, रोजगार, निवारा आणि शासकीय योजनांचा लाभ मिळविताना समाजाला अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. या अडचणी दूर करण्यासाठी शासन आणि समाजाने एकत्रितपणे काम करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. जन्म प्रमाणपत्र, आधारकार्ड, जात प्रमाणपत्र, मतदार ओळखपत्र आणि रेशनकार्ड यांसारखी आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करून देण्यासाठी विशेष शिबिरांच्या आयोजनाची सूचना त्यांनी केली.

पारंपरिक कौशल्यांना आधुनिक बाजारपेठेशी जोडून भटके-विमुक्त समाजाला आर्थिकदृष्ट्या सक्षम करावे. हस्तकला, लोककला, पशुपालन, छोटे व्यवसाय आणि पारंपरिक उपजीविकेच्या साधनांना आधुनिक तंत्रज्ञान व बाजारपेठेची जोड देऊन रोजगाराच्या नव्या संधी निर्माण कराव्यात. युवकांना कौशल्य विकास, डिजिटल तंत्रज्ञान, स्टार्टअप आणि स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यावर भर द्यावा, असे आवाहन राज्यपालांनी केले.

भटके-विमुक्त समाजाच्या विकासासाठी शासन कटिबद्ध - मंत्री अतुल सावे

भटके-विमुक्त समाजातील नागरिकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शिक्षण, शासकीय प्रमाणपत्रे, रोजगार,



स्वयंरोजगार आणि पायाभूत सुविधांवर शासनाच्या माध्यमातून विशेष भर देण्यात येत आहे. समाजातील प्रत्येक घटकाला शासनाच्या योजनांचा लाभ मिळावा, यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे मंत्री अतुल सावे यांनी सांगितले.

विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक ओळखपत्रे व प्रमाणपत्रे सुलभतेने मिळावीत सुलभ कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे. महसूल विभाग आणि इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या माध्यमातून आतापर्यंत ९ लाख २७ हजार ९७३ शासकीय प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले असून, यापुढे वस्तीस्तरावर शिबिरे घेऊन ही प्रक्रिया अधिक गतिमान करण्यात येणार असल्याचे मंत्री सावे यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांचे शिक्षण खंडित होऊ नये यासाठी प्री-मॅट्रिक, पोस्ट-मॅट्रिक शिष्यवृत्ती तसेच शिक्षण व परीक्षा शुल्क प्रतिपूर्तीच्या माध्यमातून आर्थिक मदत दिली जात आहे.

## सिंधू जल करार स्थगितच राहणार; आर्बिट्रेशन कोर्टाच्या निर्णयाला भारताचा विरोध

ट्रॅव्हल गाइड आणि प्रवासवर्णने वाचणे

**नवी दिल्ली (समर्थ गांवकरी)**

भारताने सोमवारी सिंधू जल कराराबाबत जागतिक बँकेच्या मध्यस्थीने स्थापन करण्यात आलेल्या कोर्ट ऑफ आर्बिट्रेशन (सीओए)च्या निर्णयाला फेटाळून लावले. भारताने या न्यायालयाला बेकायदेशीर ठरवत म्हटले की, या प्रकरणावर सुनावणी करण्याचा अधिकारक्षेत्र या न्यायालयाला नाही. परराष्ट्र मंत्रालयाने (एमइए) निवेदन जारी करून स्पष्ट केले की, सीओएने दिलेल्या निर्णयांचा भारताच्या कारवाईवर कोणताही परिणाम होणार नाही. भारताने सिंधू जल करार स्थगित ठेवण्याचा निर्णयही पुन्हा स्पष्ट केला आहे.

परराष्ट्र मंत्रालयाने कोर्ट ऑफ आर्बिट्रेशनला पूर्णपणे बेकायदेशीर ठरवले आहे. भारताचे म्हणणे आहे की, जागतिक बँकेने सिंधू जल करारातील नियमांचे उल्लंघन करून या न्यायालयाची स्थापना केली होती. त्यामुळे भारत या न्यायालयाचा कोणताही निर्णय किंवा आदेश मान्य करत नाही. एमइएने म्हटले, ‘भारताने या न्यायालयाचे कायदेशीर अस्तित्व कधीही मान्य केलेले नाही. या न्यायालयाची स्थापना हीच सिंधू जल कराराचे मोठे उल्लंघन असल्याचे भारताचे मत आहे. त्यामुळे भारत ना कधी या न्यायालयासमोर हजर झाला आहे, ना त्याच्या कोणत्याही निर्णयाची दखल घेतली आहे.’

## संक्षिप्त

### अग्निशमन अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी ७० हजारांचा गणवेश

पी पी पी गणवेशकरता तब्बल १६ कोटीचा खर्च!

**मुंबई (समर्थ गांवकरी)**

मुंबईतील आगींसह विविध आपत्कालीन परिस्थितीत जीव धोक्यात घालून काम करणाऱ्या अग्निशमन दलातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी पर्सनल प्रोटेक्टीव्ह इक्विपमेंट अर्थात गणवेशाची खरेदी केली जाणार आहे. यात कोट, ट्राऊजर, हुड आणि ग्लोव्हज या अत्यावश्यक गणवेश साहित्याचा समावेश आहे. या प्रत्येकी गणवेशासाठी सुमारे ७० हजार रुपये मोजले जाणार आहे.

मुंबई अग्निशमन दलाचे अधिकारी आणि जवान हे नागरिकांच्या जीवित व वित्ताचे रक्षण करण्याच्या दृष्टिकोनातून आग लागण्याच्या घटनांबरोबरच रेल्वे अपघात, इमारत कोसळणे, झाडे कोसळणे तसेच विविध ठिकाणी अडकलेल्या व्यक्तींची सुटका करण्याच्या मोहिमांमध्ये सक्रीय सहभाग नोंदवून कर्तव्य निभावत असतात.

### वीज चोरी प्रकरणांतील कामात हलगर्जीपणा नडला

महावितरणचे कार्यकारी अभियंता निलंबित

**नाशिक (समर्थ गांवकरी)**

१ कोटी ४६ लाख रुपयांच्या औद्योगिक वीज चोरी प्रकरणातील वसुली आणि कायदेशीर कारवाईचे प्रकरण रेंगाळत ठेवणे, तसेच इतर १० वीज चोरीच्या प्रकरणांत विलंब लावून कंपनीचे तब्बल ४ कोटी ६४ लाख रुपयांचे आर्थिक नुकसान केल्याप्रकरणी महावितरणच्या मालेगाव विभागाचे कार्यकारी अभियंता प्रदीप बोरकर यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. वीज चोरी प्रकरणांच्या कामांत हलगर्जीपणा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला. नाशिक परिमंडळाचे मुख्य अभियंता सुंदर लटपटे यांनी ही निलंबन कारवाई केली आहे. या कारवाईने एकच खळबळ उडाली आहे.

### कडक सुरक्षा आणि थेट प्रत्यक्ष देखरेखीत झाली नीट-पीजी परीक्षा

**नवी दिल्ली (समर्थ गांवकरी)**

नॅशनल बोर्ड ऑफ एक्झामिनेशन्स इन मेडिकल सायन्सेस (एनबीईएमएस) या राष्ट्रीय वैद्यकीय विज्ञान परीक्षा मंडळाने रविवार ३० ऑगस्ट २०२६ रोजी, कडक सुरक्षा, तांत्रिक सुविधा, मालवाहतूक व्यवस्थापन आणि पुरेशा मनुष्यबळाच्या व्यवस्थेसह देशभरात नीट-पीजी २०२६ परीक्षा यशस्वीरीत्या घेतली. परीक्षेची प्रक्रिया नि:पक्ष, सुरक्षित आणि सुरळीत राहावी, यासाठी विशेष व्यवस्था करण्यात आली होती. सर्व ३६ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील ३३९ शहरांमधील १११९ परीक्षा केंद्रांवर २,७३,०९६ उमेदवारांसाठी परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. परीक्षेला एकूण २,६५,९८० उमेदवार उपस्थित राहिले. यापैकी सुमारे २,६३,५३५ उमेदवारांची परीक्षा निर्विघ्नपणे झाली.

### भारताचा थायलंडवर ९४ धावांनी दणदणीत विजय

शेफाली वर्माची तुफानी खेळी

**दुबई/नवी दिल्ली (समर्थ गांवकरी)**

महिला टी-२० आशिया कप २०२६च्या सलामीच्या सामन्यात भारतीय महिला क्रिकेट संघाने थायलंडचा ९४ धावांनी पराभव करत स्पर्धेची दमदार सुरुवात केली. भारताने प्रथम फलंदाजी करत २० षटकांत ९ विकेट्स गमावत १५९ धावा केल्या. प्रत्युत्तरात थायलंडचा डाव अवघ्या ६५ धावांत १५.३ षटकांत आटोपला.

शेफाली वर्माची वादळी फलंदाजी :

भारताच्या विजयाची प्रमुख शिल्पकार ठरली शेफाली वर्मा. तिने अवघ्या ३६ चेंडूत ६४ धावांची आक्रमक खेळी केली. या खेळीत तिने ८ चौकार आणि ३ षटकार ठोकले. शेफालीने सुरुवातीपासूनच थायलंडच्या गोलंदाजांवर दबाव निर्माण केला.

## पी.एच डी. पदवी संपादनाबद्दल डॉ प्रमोद उगले व डॉ. प्रशांत उगले यांचा सन्मान

**डोंगरगाव (समर्थ गांवकरी)**

डोंगरगावचे युवक मा. श्री. डॉ. प्रमोद कचरू उगले आणि मा. श्री. डॉ. प्रशांत सूर्यभान उगले यांनी पीएच.डी. पदवी संपादन केल्याबद्दल त्यांचा स्नेह फाऊंडेशन डोंगरगाव, श्रीशा केक शॉप अँड बेकरी डोंगरगाव तसेच समस्त ग्रामस्थ डोंगरगाव यांच्या वतीने सन्मान करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवर व ग्रामस्थांनी दोन्ही युवा संशोधकांचे अभिनंदन करून त्यांच्या भावी शैक्षणिक व सामाजिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

संशोधक डॉ. प्रशांत सूर्यभान उगले यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथील वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेअंतर्गत ‘बँकिंग आणि वित्त’ विषयात विद्यावाचस्पती (Ph.D.) पदवी संपादन केली आहे. त्यांच्या संशोधन कार्यास मार्गदर्शक डॉ. रेखा आप्पासाहेब कढणे



यांचे मार्गदर्शन लाभले.

डोंगरगावसारख्या ग्रामीण भागातून उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत पीएच.डी. पदवी संपादन केल्याबद्दल डॉ. प्रमोद उगले व डॉ. प्रशांत उगले यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. त्यांच्या या यशामुळे गावातील विद्यार्थी व युवकांना निश्चितच प्रेरणा मिळणार आहे.

यावेळी स्नेह फाऊंडेशनचे पदाधिकारी, सर्व संस्थांचे पदाधिकारी व ग्रामस्थ,मित्र परिवार तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

## ‘अगस्ती पतसंस्था विश्वासार्हता निर्माण करणारी संस्था

### १५२ कोटींहून अधिक ठेवी; मागील वर्षात २८ कोटींची थकबाकी वसुली!

**अकोले (समर्थ गांवकरी)**

सभासदांनी संस्थेवर दाखविलेल्या विश्वासामुळे अगस्ती ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेच्या ठेवींनी तब्बल १५२ कोटी ४२ लाख रुपयांचा टप्पा गाठला आहे. संस्थेचे अध्यक्ष व संचालक मंडळाने सभासदांचा विश्वास कायम ठेवत संस्थेचा नावलौकिक आणखी वाढवावा. सभासदांमध्ये विश्वासार्हता निर्माण करणारी संस्था म्हणून आज अगस्ती पतसंस्थेकडे पाहिले जात असल्याचे प्रतिपादन अगस्ती कारखान्याचे अध्यक्ष सीताराम गायकर यांनी केले.

अगस्ती ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेची ३९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा महाराजा लॉन्स येथे सीताराम गायकर यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी जनलक्ष्मी पतसंस्थेचे अध्यक्ष भाऊ नवले, बाळासाहेब भोर, रोहिदास भोर, पतसंस्थेचे अध्यक्ष अशोकराव देशमुख, उपाध्यक्ष गणेश पापळ, संचालक अक्षय आभाळे, महिपाल देशमुख, अशोक नवले, व्यवस्थापक दिलीप उदमले यांच्यासह सर्व संचालक उपस्थित होते.

यावेळी सीताराम गायकर म्हणाले की, पतसंस्थेचे कामकाज प्रभावीपणे चालविण्यासाठी अध्यक्ष, संचालक मंडळ व अधिकाऱ्यांना मोठ्या मेहनतीसह वेळ द्यावा लागतो. चांगल्या कर्जदारांना कर्ज देणे, त्याची वेळेत वसुली करणे, ठेवी वाढविणे तसेच ठेवीदारांच्या पैशांचे योग्य संगोपन करणे ही मोठी जबाबदारी आहे. अगस्ती पतसंस्थेने मागील वर्षात २८ कोटी रुपयांची थकबाकी वसूल केली असून संस्थेचे कामकाज चांगल्या दिशेने सुरू असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

पतसंस्थेचे अध्यक्ष अशोकराव देशमुख यांनी संस्थेच्या आर्थिक प्रगतीची माहिती देताना सांगितले की, संस्थेचे कार्यक्षेत्र जिल्हास्तरीय असून त्यानुसार आवश्यक कार्यवाही होणे अपेक्षित आहे. सध्या संस्थेकडे १५२ कोटी ४२ लाख १५ हजार १२७ रुपयांच्या ठेवी असून ९१ कोटी ५० लाख ७० हजार रुपयांपेक्षा अधिक कर्जवाटप करण्यात आले आहे. थकबाकीदारांवरील कारवाईअंतर्गत संस्थेने ३२४ दावे दाखल केले असून कर्जदारांची २६७ हेक्टर म्हणजेच ६६७ एकर जमीन संस्थेच्या नावे झाली असल्याची माहिती त्यांनी दिली.

## शिर्डीतील पराभवामुळे शरद पवारांची साथ कायमची सुटली : केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले

### शिर्डीत पराभव झाला नसता तर पवारांसोबतच राहिलो असतो केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवलेंची मिश्किल टोलेबाजी

**जळगाव (समर्थ गांवकरी)**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे संस्थापक अध्यक्ष ज्येष्ठ नेते शरद पवार आणि केंद्रीय राज्यमंत्री ना . रामदास आठवले यांचे राजकीय मार्ग वेगळे झाले असले, तरी त्यांच्यातील व्यक्तिगत संबंध आजही कायम आहेत. मात्र शिर्डी मतदारसंघातील पराभवामुळे आपली राजकीय दिशा बदलली आणि शरद पवारांची साथ सुटली, अशी खंत रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी जिल्ह्यातील कोथळी (ता. मुक्ताईनगर) येथे व्यक्त केली. शिर्डीत पराभव झाला नसता तर कदाचित आपण आजही शरद पवारांसोबतच राहिलो असतो, असेही ना. रामदास आठवले यांनी सांगितले.

जळगाव जिल्ह्यातील मुक्ताईनगर येथे एकनाथ खडसे यांच्या अमृत महोत्सवी सोहळ्यात ना. रामदास आठवले आणि शरद पवार एकाच व्यासपीठावर आले.

शरद पवार गटाचे ज्येष्ठ नेते आमदार एकनाथ खडसे यांच्या अमृत महोत्सवी सोहळ्याला रविवारी कोथळी (ता. मुक्ताईनगर) येथे ना. रामदास आठवले आवर्जून उपस्थित राहिले. या कार्यक्रमाच्या निमित्ताने अनेक वर्षांनंतर शरद पवार, एकनाथ खडसे आणि ना. रामदास आठवले एकाच व्यासपीठावर आले. ना. रामदास आठवले यांनी आपल्या भाषणातून जुन्या राजकीय आठवणींना उजाळा दिला.

शरद पवारांसोबतचे संबंध आजही कायम

शरद पवार यांच्यासोबत आपण अनेक वर्षे काम केले आहे. राजकारणात मतभेद असले तरी व्यक्तिगत संबंध तोडण्याची गरज नाही, असे ना. रामदास आठवले यांनी सांगितले. राजकारणात कोणतेही वैर कायम ठेवू नये. लोकशाहीमध्ये सत्ताधारी आणि विरोधी पक्ष मिळून देश चालवतात, असेही त्यांनी नमूद केले. सध्या आपण नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारमध्ये मंत्री म्हणून कार्यरत असल्याने पुन्हा शरद पवारांसोबत जाणे शक्य नसल्याचे ना. रामदास आठवले यांनी स्पष्ट केले. एकनाथ खडसे आज राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये आहेत, तर आपण सध्या वेगळ्या राजकीय आघाडीत असल्याचे त्यांनी सांगितले.

शरद पवार गटाचे ज्येष्ठ नेते आमदार एकनाथ खडसे यांच्या अमृत महोत्सवी सोहळ्याला रविवारी कोथळी (ता. मुक्ताईनगर) येथे केंद्रीय मंत्री रामदास आठवले आवर्जून उपस्थित राहिले. या कार्यक्रमाच्या निमित्ताने अनेक वर्षांनंतर शरद पवार, एकनाथ खडसे आणि रामदास आठवले एकाच व्यासपीठावर आले. आठवले यांनी आपल्या भाषणातून जुन्या राजकीय आठवणींना उजाळा दिला.

आपल्या राजकीय प्रवासावर भाष्य करताना ना. रामदास आठवले यांनी नेहमीच्या मिश्किल शैलीत टिप्पणी केली. आपण ज्यांच्या बाजूला जातो, त्यांना नंतर सत्ता मिळते आणि आपल्यालाही मंत्रीपद मिळते, असे ते म्हणाले. मात्र, आपण केवळ मंत्रीपदासाठी कुठेही जात नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. ना. रामदास आठवले यांच्या



या वक्तव्यामुळे कार्यक्रमस्थळी हास्याची लकेर उमटली. विशेष म्हणजे, शरद पवार यांनीही त्यांच्या भाषणाला खळखळून हसत दाद दिली.

पँथरच्या चळवळीनंतर पवारांकडून मंत्रीपद

ना. रामदास आठवले यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीच्या सुरुवातीच्या काळातील आठवणीही सांगितल्या. सिद्धार्थ हॉस्टेलमध्ये शिक्षण घेत असताना पँथरच्या चळवळीनंतर शरद पवार यांनी आपल्याला मंत्रीपदाची पहिल्यांदा संधी दिली होती. त्यावेळी समाजकल्याणसह विविध खात्यांच्या जबाबदाऱ्या आपल्याकडे होत्या, असे ना. रामदास आठवले यांनी सांगितले. पवारांच्या नेतृत्वाखाली काम करताना आपल्याला राजकारणात महत्त्वाची संधी मिळाली, याची आठवण त्यांनी यावेळी करून दिली.

# नेत्रदान : मृत्यूनंतरही प्रकाश देणारे जीवन! : ह.भ.प. श्री. विशाल रघुनाथ गडगे, आळेफाटा

एखाद्या व्यक्तीचे डोळे कायमचे मिटतात, तेव्हा एका आयुष्याचा प्रवास संपतो; पण त्या डोळ्यांमधून दुसऱ्या कोणाच्या तरी आयुष्यात नवी पहाट उगवू शकते. एका घरात मृत्यूचे दुःख दाटून आलेले असताना, दुसऱ्या घरात पुन्हा जग पाहण्याची आशा जन्म घेऊ शकते. मृत्यूच्या अंधारातून जीवनाला प्रकाश देण्याची ही विलक्षण शक्ती म्हणजे नेत्रदान! माणसाच्या आयुष्याचा अंत म्हणजे त्याच्या अस्तित्वाचा पूर्णविराम असतो; पण माणुसकीचा नाही. पैसा, पद, प्रतिष्ठा आणि वैभव मृत्यूनंतर मागे राहते; मात्र आपल्या जाण्यानंतरही एखाद्याला जग पाहण्याची संधी देणारा माणूस मानवतेचा प्रकाश मागे ठेवून जातो. म्हणूनच नेत्रदान हे केवळ दान नाही, तर मृत्यूनंतरही माणुसकी जिवंत ठेवण्याचा संकल्प आहे.

दरवर्षी २५ ऑगस्ट ते ८ सप्टेंबर या कालावधीत देशभर राष्ट्रीय नेत्रदान पंधरवडा पाळला जातो. हा काळ केवळ जनजागृतीचा नसून नेत्रदानाबाबतचे गैरसमज दूर करण्याचा आणि नागरिकांना या मानवी कार्यासाठी प्रेरित करण्याचा आहे. आपल्या डोळ्यांतील प्रकाश मृत्यूनंतरही दुसऱ्याच्या आयुष्यात पोहोचू शकतो, हा विचार प्रत्येक घरापर्यंत पोहोचणे गरजेचे आहे.

देशातील अधिकृत आकडेवारी या विषयाचे गांभीर्य अधोरेखित करते. केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या २३ मार्च २०२६ रोजीच्या माहितीनुसार, देशात ३९६ नेत्रपेढ्या कार्यरत आहेत. २०२२-२३ मध्ये ६२ हजार ३७०, २०२३-२४ मध्ये ६६ हजार ४३४, तर २०२४-२५ मध्ये ६९ हजार ८४८ कॉर्निया संकलित करण्यात आले. कॉर्निया संकलनात झालेली ही वाढ आशादायक असली, तरी दृष्टीच्या प्रतीक्षेत असलेल्या प्रत्येक व्यक्तीपर्यंत प्रकाश पोहोचवण्यासाठी नेत्रदानाची चळवळ आणखी व्यापक होणे आवश्यक आहे. या आकड्यांमागे केवळ संख्या नाहीत; तर असंख्य स्वप्ने आहेत. कोणाला पुन्हा आईचा चेहरा पाहायचा आहे, कोणाला आपल्या लेकराचे हसू डोळ्यांनी अनुभवायचे आहे, तर कोणाला निसर्गाचे रंग आणि सूर्योदयाची सोनेरी किरणे पाहायची आहेत. दृष्टी गमावलेल्या व्यक्तीसाठी जगाचा प्रत्येक रंग हरवलेला असतो. अशा वेळी मृत्यूनंतर केलेले नेत्रदान एखाद्याच्या आयुष्यात आशेचा नवा किरण ठरू शकते.

महाराष्ट्रातील चित्रही महत्त्वाचे आहे. राष्ट्रीय आरोग्य अभियान, महाराष्ट्राच्या अधिकृत आकडेवारीनुसार, २०२३-२४ मध्ये ५ हजार ८७ नेत्रगोलक संकलित करण्यात आले आणि २ हजार ७१३ केरॅटोप्लास्टी शस्त्रक्रिया झाल्या. २०२४-२५ मध्ये डिसेंबर २०२४ पर्यंत ३ हजार ७९४ नेत्रगोलक संकलित झाले असून २ हजार ३१६ केरॅटोप्लास्टी शस्त्रक्रिया झाल्या. हा आकडा डिसेंबरपर्यंतचा असल्याने त्याची तुलना पूर्ण आर्थिक वर्षाशी करणे योग्य ठरणार नाही. महाराष्ट्रात ६९ नेत्रपेढ्या, ४६ नेत्रसंकलन केंद्रे आणि २०१ नेत्र प्रत्यारोपण केंद्रे कार्यरत असल्याची नोंद आहे.

नेत्रदानाबाबत एक महत्त्वाचा गैरसमज दूर करणे गरजेचे आहे. नेत्रदान म्हणजे संपूर्ण डोळा दुसऱ्या व्यक्तीच्या डोळ्यात बसविणे नव्हे. प्रामुख्याने डोळ्याच्या पुढील पारदर्शक भागाचा, म्हणजे कॉर्नियाचा, प्रत्यारोपणासाठी उपयोग केला जातो. एखादी व्यक्ती नेत्रदानासाठी वैद्यकीयदृष्ट्या योग्य आहे की नाही, याचा निर्णय प्रशिक्षित वैद्यकीय तज्ज्ञ घेतात. त्यामुळे अफवा, भीती आणि अंधश्रद्धेपेक्षा अधिकृत वैद्यकीय माहितीवर विश्वास ठेवला पाहिजे.

नेत्रदानाचा संकल्प करणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच तो कुटुंबीयांना सांगणे महत्त्वाचे आहे. मृत्यूनंतर प्रत्यक्ष प्रक्रिया सुरू करण्यासाठी कुटुंबीयांची भूमिका निर्णायक असते. त्यामुळे मी नेत्रदान करणार आहे हा विचार केवळ कागदावर न राहता आपल्या घरातील संवादाचा भाग झाला पाहिजे.

राष्ट्रीय नेत्रदान पंधरवडा घोषणांपुरता मर्यादित न राहता घराघरांत पोहोचणारी जनचळवळ बनली पाहिजे. शाळा, महाविद्यालये, सामाजिक संस्था, धार्मिक संघटना आणि प्रसारमाध्यमांनी या विषयावर सातत्याने संवाद घडवून आणला पाहिजे. कारण एका व्यक्तीचा संकल्प दुसऱ्याच्या आयुष्यातील अंधार दूर करण्याची शक्यता निर्माण करू शकतो.

मृत्यू हे आयुष्याचे अंतिम सत्य आहे. आपले डोळे मिटतील, आपला आवाज शांत होईल; पण आपल्या जाण्यानंतर कोणीतरी पुन्हा आईचा चेहरा पाहू शकतो, एखादे मूल आकाशातील इंद्रधनुष्य अनुभवू शकते आणि एखादा तरुण आपल्या स्वप्नांच्या वाटेवर पुन्हा चालू शकतो. चला, अंधाराला दोष देत बसण्यापेक्षा कोणाच्यातरी आयुष्यात प्रकाशाचा किरण बनूया. नेत्रदानाचा संकल्प करूया, तो आपल्या कुटुंबीयांना सांगूया आणि मृत्यूनंतरही माणुसकीचा दीप तेवत ठेवूया. कारण डोळे मिटले तरी मानवतेची दृष्टी कधीच मिटत नाही!

# पोषण आहाराच्या निकृष्ट दर्जाची चौकशीची मागणी करणार : सुप्रिया सुळे

**मंचर (समर्थ गांवकरी)**

अंगणवाडी तसेच जिल्हा परिषद शाळांमध्ये विद्यार्थ्यांना दिला जाणारा पोषण आहार निकृष्ट दर्जाचा असल्याच्या तक्रारींची गंभीर दखल घेऊन त्याची चौकशी झाली पाहिजे. केंद्र आणि राज्य सरकारने एकमेकांवर जबाबदारी ढकलण्याऐवजी या प्रश्नाचे उत्तर महाराष्ट्राला दिले पाहिजे, अशी मागणी खासदार सुप्रिया सुळे यांनी रविवार दि.३० रोजी केली.



श्री क्षेत्र भीमाशंकर येथे ज्योतिर्लिंगांचे दर्शन घेवून खासदार सुप्रिया सुळे माघारी येत असताना घोडेगाव येथे आयोजित पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या.यावेळी शरदचंद्रजी पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पुणे जिल्हाध्यक्ष देवदत्त निकम, युवक अध्यक्ष विशाल वाबळे,पंचायत समितीच्या सदस्या श्वेताताई ढोबळे, प्रियंकाताई वाघ, शरद बँकेचे माजी अध्यक्ष जयसिंग काळे,कपिल काळे, यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते. खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्या लहान मुलांच्या अन्नाच्या गुणवत्तेबाबत तक्रारी येत असतील तर त्याची चौकशी करण्यात गैर काहीच नाही.काही चुकीचे आढळल्यास ते तातडीने दुरुस्त केले पाहिजे.अन्नधान्य तसेच महिला व बालविकास विभागाशी संबंधित या प्रश्नावर मुख्यमंत्री यांनी कोणतेही राजकारण न आणता योग्य ती कार्यवाही करावी, असे सुळे यांनी सांगितले. दरम्यान, भीमाशंकरच्या विकासकामांबाबतही सुळे यांनी नाराजी व्यक्त केली. मागील वर्षाच्या तुलनेत यंदा भाविकांची गैरसोय अधिक जाणवत असल्याचे त्यांनी सांगितले.विकास आराखड्यासाठी मोठा निधी खर्च होत असताना त्याचा परिणाम प्रत्यक्षात दिसत नाही.याबाबत मुख्यमंत्री यांना पत्र लिहून भीमाशंकर विकास आराखड्याची पाहणी व आवश्यक कार्यवाहीची मागणी करणार असल्याचे सुळे यांनी स्पष्ट केले.

# जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सतर्फे श्रीमती भामाबाई शंकरराव शिंदे यांना 'आदर्श माता पुरस्कार' जाहीर

**जामखेड (समर्थ गांवकरी)**

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत कुटुंबाचा सांभाळ केला. मुलांचे शिक्षण.. विवाह केले.

मुलांवर चांगले संस्कार केले. त्याचे फलित म्हणजे प्रा. राम शिंदे सर हे आज विधान परिषद महाराष्ट्र राज्य. सभापती आहेत.

फार मोठी झेप आहे.

विधान परिषदेस सभापती प्रा. राम शिंदे यांनी मानले आभार...

महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध अशा जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सतर्फे विधान परिषदेस सभापती प्रा. राम शिंदे यांच्या मातोश्री श्रीमती भामाबाई शंकरराव शिंदे यांना 'आदर्श माता पुरस्कार' जाहीर झाला, त्यानिमित्ताने ही आमच्यासाठी अत्यंत गौरवाची बाब आहे. असे म्हणत विधान परिषदेस सभापती प्रा. राम शिंदे यांनी मानले आभार आहेत. आज दि. ३१ ऑगस्ट रोजी सकाळी साडेदहा वाजता प्राचार्य डॉ. सुधाकरराव जाधवर शैक्षणिक संकुल -१, जाधवर चौक, न्हे ४१ या ठिकाणी समारंभ पूर्वक हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

हा पुरस्कार जाहीर झाल्यानंतर सभापती प्रा. राम शिंदे यांनी आपल्या फेसबुक अकाउंट वर एक पोस्ट टाकून जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सचे आभार व्यक्त करताना म्हटले आहे की,

आज माझ्यासह सर्व शिंदे परिवारासाठी अभिमानाचा असा भावुक क्षण...

आ- आ म्हणजे आत्मा, ई - म्हणजे ईश्वर

ईश्वराला सगळ्या ठिकाणी पोहोचता येत नाही म्हणून त्याने आईची निर्मिती केली. आई घराचा श्वास असते, आई प्रेमाचीच भाषा असते ती त्यागाची व्याख्या असते आणि आईच आयुष्याची सर्वात मोठी प्रार्थना असते याच आमच्या कुटुंबातील प्रार्थनेला जाधवर ग्रुप ने सन्मानित करण्याचा मान दिला.

जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सतर्फे माझ्या आदरणीय मातोश्री श्रीमती भामाबाई शंकरराव शिंदे यांना 'आदर्श माता पुरस्कार' जाहीर ळप झाला, ही आमच्यासाठी अत्यंत गौरवाची बाब आहे.

एका सामान्य कुटुंबातून जीवनाचा प्रवास घडवत असताना आईने दिलेले संस्कार, सोसलेले इन कष्ट आणि प्रत्येक वळणावर दिलेली मायेची सावली यांनीच आम्हाला घडवले. आज तिच्या वाट्याला आलेला हा सन्मान म्हणजे तिच्या आयुष्यभराच्या त्यागाला आणि संस्कारांना मिळालेली मनःपूर्वक



मानवंदना आहे.


आईचा सन्मान म्हणजे केवळ एका व्यक्तीचा गौरव नाही; तो संपूर्ण कुटुंबाच्या संस्कारांचा गौरव असतो. हा सन्मान जाहीर केल्याबद्दल जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स आणि त्यांच्या संपूर्ण टीमचे मनःपूर्वक आभार. शिक्षण आणि सामाजिक कार्याच्या माध्यमातून समाजासाठी सुरू असलेली त्यांची वाटचाल अशीच प्रेरणादायी राहो, ही सदिच्छा!

# भगवान श्री जिव्हेश्वर जन्मोत्सवानिमित्त मोफत आरोग्य शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**सर्व रोग निदान शिबिरात २१०रुग्णांची तपासणी**

**विक्रम पाठक म्हणाले - समाजाच्या आरोग्यासाठी असे उपक्रम गरजेचे**

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**



आराध्य दैवत भगवान जिव्हेश्वरांच्या जन्मोत्सवानिमित्त केवळ धार्मिक कार्यक्रम न घेता सामाजिक बांधिलकी म्हणून आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. समाजातील प्रत्येक घटक निरोगी राहावा हाच या उपक्रमाचा उद्देश असून भविष्यातही असे सेवाभावी उपक्रम राबविले जातील, असे प्रतिपादन स्वकुळ साळी हितसंवर्धक मंडळाचे विश्वस्त प्रमुख विक्रम पाठक यांनी केले.

स्वकुळ साळी हितसंवर्धक मंडळ, अहिल्यानगर, साईदीप सह्याद्री हॉस्पिटल आणि अहमदनगर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने भगवान श्री जिव्हेश्वर जन्मोत्सवानिमित्त मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिराचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. यावेळी स्वकुळ साळी हितसंवर्धक मंडळाचे विश्वस्त प्रमुख विक्रम पाठक, कार्याध्यक्ष लक्ष्मीकांत तरोटे, संजय सागांवकर, बाबासाहेब वैद्य,उत्सव समिती प्रमुख निरज चांगटे,महेश सागांवकर,राम काळे, सुनील पावले,संजय दळवी, सुरेश इंगळे, सचिन मडके, अनिल भंडारे, गजेंद्र सोनवणे, श्रीमती वर्षा कोल्हे, श्रीमती छाया साळी, सौ. वनिता पाटेकर, अभिजीत अष्टेकर, गणेश झिंजे, किशोर विंचुरकर, प्रशांत भंडारे, प्रदीप दळवी, गणेश दळवी, प्रसाद कांबळे, योगेश पांढरपोरे आदी उपस्थित होते.

शिबिरामध्ये डॉ. रुषिकेश कराळे, डॉ.रमिज मुसानी, जनसंपर्क अधिकारी रविंद्र वाघाडे, डॉ.रच्चा कंचन (स्त्रीरोग तज्ज्ञ),डॉ.सुडके (म.न.पा.), सानप सिस्टर यांनी नागरिकांची आरोग्य तपासणी करून मार्गदर्शन केले.

या शिबिराला समाज बांधव व नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून अनेकांनी आरोग्य तपासणी करून लाभ घेतला.

# जामखेडः खर्डा परीसरातील बेकायदेशीर वेश्याव्यवसायाचा ग्रामस्थांकडून 'स्टिंग ऑपरेशन'द्वारे भांडाफोड


**अहिल्यानगर LCB पोलीस कर्मचारी रोहित मिसाळ हप्ता घेतल्याचा आरोप; वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून चौकशीची मागणी**

**कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलनाचा ग्रामस्थांचा इशारा**

**जामखेड (समर्थ गांवकरी)**

जामखेड तालुक्यातील खर्डा परिसरातील खर्डा-जामखेड मुख्य रस्त्यावरील एका हॉटेलच्या वरील लॉजमध्ये राजरोसपणे सुरू असलेल्या बेकायदेशीर वेश्याव्यवसायाचा स्थानिक ग्रामस्थांनी स्वतः 'स्टिंग ऑपरेशन' करून पर्दाफाश केला आहे. या गंभीर प्रकाराकडे खर्डा पोलीस जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला असून, सदर व्यवसाय कायमचा बंद न झाल्यास जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.जामखेड तालुक्यात स्थानिक पोलीस व गुन्हे शाखेकडून अवैध व्यवसायांवर कारवाया होत असल्याचा दावा केला जात असला, तरी खर्डा शहराजवळील एका पेट्रोल पंपाशेजारील हॉटेलच्या वर असलेल्या लॉजमध्ये वेश्याव्यवसाय मोठ्या प्रमाणावर सुरू होता. याबाबत अनेकदा तक्रारी करूनही पोलिसांनी दखल न घेतल्याने ३० ऑगस्ट रोजी संतप्त ग्रामस्थांनी स्वतः पुढाकार घेतला. ग्राहक बनून गेलेल्या ग्रामस्थांनी या वेश्याव्यवसायाचे थेट व्हिडिओ चित्रीकरण केले. यावेळी हॉटेल चालकाने तुम्ही हॉटेलमध्ये आलेल्या ग्राहकांची शुटींग का करता तुम्हाला वर लॉज मध्ये जाऊन काय करायचे ते करा असे म्हणत ग्रामस्थांशी वाद घालत, आम्ही कोणाला घाबरत नाही, तुम्हाला बघून घेऊ, अशी धमकी दिल्याने काही काळ तणाव निर्माण झाला होता.

घटनेनंतर ग्रामस्थांनी तत्काळ ११२ या आपत्कालीन नंबरवर संपर्क साधला. मात्र, एका तासापेक्षा जास्त वेळ उलटून आणि पुन्हा फोन



करूनही संध्याकाळी उशिरापर्यंत पोलीस घटनास्थळी लवकर पोहोचले नाहीत. यानंतर उशीरा पोलीसांची गाडी घटनास्थळी दाखल झाली. अखेर ग्रामस्थांनी सहाय्यक पोलीस निरीक्षक उज्वलसिंह राजपूत यांच्याशी संपर्क साधून या प्रकाराची माहिती दिली.हे हॉटेल बांधखडक, दरडवाडी, पांढरेवाडी आणि खर्डा शहर या मध्यवर्ती परिसरात खर्डा-जामखेड मुख्य रस्त्यावर आहे. या मार्गावरून दररोज शालेय मुले-मुली, नागरिक आणि व्यायामासाठी जाणारे तरुण ये-जा करतात. या हॉटेलवर आंबटशौकिनांची वर्दळ वाढत चालल्याने शिक्षण आणि करिअरवर लक्ष देण्याच्या वयात स्थानिक तरुण भरकटत असून, त्यांच्यावर याचा अत्यंत वाईट परिणाम होत आहे.परिसरातील सामाजिक आरोग्य धोक्यात आणणारा हा वेश्याव्यवसाय त्वरित व कायमचा बंद करण्यात यावा आणि हॉटेल चालकांवर कडक कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे. लवकरात लवकर कारवाई न झाल्यास बांधखडक, दरडवाडी, पांढरेवाडी व खर्डा परिसरातील नागरिक जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर मोठे आंदोलन उभारतील, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

# कॉलेज ऑफ नर्सिंगमध्ये अग्निशमन आपत्ती प्रात्यक्षिक सरावाचे आयोजन

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**



डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशनच्या कॉलेज ऑफ नर्सिंग, अहिल्यानगर येथे समुदाय आरोग्य परिचर्या विभागाच्या वतीने बी.एस्सी. नर्सिंगच्या विद्यार्थ्यांसाठी अग्निशमन आपत्ती प्रात्यक्षिक सराव (Fire Disaster Mock Drill) आयोजित करण्यात आला.

विद्यार्थ्यांमध्ये अग्निसुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करणे, तसेच आपत्कालीन परिस्थिती आणि आपत्ती व्यवस्थापनासाठी आवश्यक कौशल्ये विकसित करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

या प्रात्यक्षिक सरावामुळे विद्यार्थ्यांना आगीसारख्या आपत्कालीन परिस्थितीत तत्परतेने, प्रभावीपणे आणि सुरक्षितपणे प्रतिसाद देण्याचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला. विद्यार्थ्यांची आपत्कालीन परिस्थितीतील तयारी, आत्मविश्वास आणि व्यावसायिक क्षमता वाढविण्याच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचा एक भाग म्हणून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

आपत्ती किंवा आपत्कालीन परिस्थिती कोणत्याही वेळी उद्भवू शकते. अशा वेळी रुग्णांची सुरक्षितता सुनिश्चित करणे, तातडीने प्राथमिक उपचार देणे, सुरक्षित स्थलांतर करणे, आपत्कालीन पथकांशी समन्वय साधणे आणि आवश्यक वैद्यकीय मदत उपलब्ध करून देणे, यामध्ये परिचारिकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. ही बाब लक्षात घेऊन विद्यार्थ्यांना केवळ सैद्धांतिक ज्ञान न देता प्रत्यक्ष कृतीवर आधारित प्रशिक्षण देण्यात आले.

प्रात्यक्षिक सरावादरम्यान विद्यार्थ्यांना अग्निसुरक्षेची मूलभूत तत्त्वे, आपत्कालीन प्रतिसाद, सुरक्षित स्थलांतर प्रक्रिया आणि आपत्ती व्यवस्थापन याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. आग लागल्याची माहिती मिळाल्यानंतर तातडीने अलार्म देणे, संबंधित अधिकाऱ्यांना माहिती देणे, नागरिक व रुग्णांचे सुरक्षित स्थलांतर करणे, घाबरून न जाता शांतपणे परिस्थिती हाताळणे आणि बाधित व्यक्तींना तातडीने प्राथमिक उपचार देणे, याबाबत प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाद्वारे प्रशिक्षण देण्यात आले.

## जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोले यांचे कार्यालय ता. अकोले, जि. अहिल्यानगर**

क्र.कावि/फौजदारी / वारस नोंद/१९/२०२६ अकोले दि. ३१/०८/२०२६

श्रीम. चिमाबाई लक्ष्मण खोकले, रा.सांगवी, ता.अकोले, जि.अहिल्यानगर यांचे पती कै. लक्ष्मण एकनाथ खोकले हे दि. १८/०२/२०२६ रोजी मेडीकव्हर हॉस्पिटल गुंजाळवाडी संगमनेर येथे मयत झाले. सदर मयत व्यक्ती हे महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ संगमनेर आगार वाहक या पदावर कार्यरत होते. मयत व्यक्तीच्या वारसांना शासनाकडून देय रक्कमा मिळणेसाठी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज सादर केला असुन त्यात खालीलप्रमाणे वारस असल्याचे दर्शविले आहे.

| अक्र. | वारसाचे नाव | वय वर्ष | नाते |
|---|---|---|---|
| १ | चिमाबाई लक्ष्मण खोकले | ३७ | पत्नी |
| २ | अथर्व लक्ष्मण खोकले | १४ | मुलगा |

या जाहिर प्रगटनाद्वारे सुचित करण्यात येते की, वरील वारस प्रमाणपत्र बाबतचे कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रासह लेखी स्वरुपात या जाहीर प्रकटनाच्या तारखेपासून ७ दिवसाचे आत या कार्यालयास सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबंधितांस वारस प्रमाणपत्र निर्गमीत करण्यात येईल.

**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अकोले**

## रयत शिक्षण संस्थेचे न्यू इंग्लिश स्कूल, चांडगाव, ता. श्रीगोंदा, जिल्हा अहिल्यानगर.

**टेंडर नोटीस**

**लेबर कॉन्ट्रॅक्टर व मटेरियल सप्लायर नेमणेबाबत.**

आमच्या विद्यालयाच्या ए.आय लॅबसाठी फर्निचर तयार करणे. या करिता अनुभवी लेबर कॉन्ट्रॅक्टर कडून रेट बंद लिफाफ्यामध्ये न्यू इंग्लिश स्कूल, चांडगाव, ता. श्रीगोंदा, जिल्हा अहिल्यानगर येथे देण्यात यावेत. सदर कामाचे कोरे टेंडर फॉर्म विद्यालयाच्या कार्यालयात किंवा ओम साई कन्सल्टंटस् आर्किटेक्टस् इंजिनिअर्स, १/२, गोवर्धन अपार्टमेंट आंबेडकर रोड अहिल्यानगर यांचे कार्यालयात दि. ०१/०९/२०२६ ते ०८/०९/२०२६ पर्यंत रु. ५००/- भरून मिळतील व भरलेले टेंडर फॉर्म दि. ०९/०९/२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत न्यू इंग्लिश स्कूल, चांडगाव, ता. श्रीगोंदा, जिल्हा-अहिल्यानगर. यांच्या ऑफिसमध्ये स्वीकारण्यात येतील. टेंडर जमा करताना त्यासोबत रु. ३०००/- बयाना रक्कम भरावी लागेल वरील काम पूर्ण करण्याचा कालावधी ३ महिने राहील.

१) फर्निचर कामासाठी लागणारे मटिरीयल उदा. प्लायवूड, फोरमायका, फेव्हीकॉल, बिजगऱ्या, लाकूड, खिळे इत्यादी विद्यालय पुरविणार आहेत.

२) फर्निचर कामासाठी लागणारे मटिरीयल :- उदा. प्लायवूड, फोरमायका, फेव्हीकॉल, बिजगऱ्या, लाकूड, खिळे इत्यादी इत्यादीचे रेट बंद पाकीटामध्ये द्यावेत.

३) कोणतेही टेंडर मंजूर करणे अथवा कारण न देता सर्व टेंडर नाकारणे याबाबत सर्व अधिकार न्यू इंग्लिश स्कूल, चांडगाव, ता. श्रीगोंदा, जिल्हा अहिल्यानगर यांनी राखून ठेवले आहेत.

**मुख्याध्यापक**
**न्यू इंग्लिश स्कूल, चांडगाव, ता. श्रीगोंदा, जिल्हा-अहिल्यानगर**
**मोबाईल नंबर - ७५८८०२९५००**

## थोडक्यात पण महत्त्वाचे

### सुप्रिया सुळे यांनी भीमाशंकर ज्योतिर्लिंगाचे घेतले मनोभावे दर्शन



**मंचर (समर्थ गांवकरी)**

बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या श्री क्षेत्र भीमाशंकर येथे खासदार सुप्रिया सुळे यांनी रविवार दि.३० रोजी सकाळी ज्योतिर्लिंगाचे अभिषेक करून मनोभावे दर्शन घेतले.यावेळी मंदिर परिसरात धार्मिक वातावरण निर्माण झाले होते.

दर्शनानंतर उपस्थित पदाधिकारी, कार्यकर्ते व मान्यवरांशी सुळे यांनी विविध सामाजिक आणि स्थानिक विषयांवर चर्चा केली.परिसरातील विकासकामे, भाविकांच्या सुविधा तसेच स्थानिक नागरिकांच्या प्रश्नांबाबतही यावेळी चर्चा झाल्याचे सांगण्यात आले.यावेळी शरदचंद्रजी पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पुणे जिल्हाध्यक्ष देवदत्त निकम, युवक अध्यक्ष विशाल वाबळे,पंचायत समितीच्या सदस्या श्वेताताई ढोबळे, प्रियंकाताई वाघ, मंचर नगरपंचायतीच्या नगरसेविका अंजली निलेश बाणखेले, नगरसेवक लखन पारधी, साधना धुमाळ, राजश्री निकम, केतन वाघ यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि इतर मान्यवर उपस्थित होते.श्री भीमाशंकर येथील ज्योतीलिंगाच्या दर्शनासाठी आलेल्या सुळे यांनी मंदिरातील धार्मिक विधीमध्ये सहभागी होत पूजा-अभिषेक केला.यावेळी मंदिर परिसरातील व्यवस्थेबाबतही त्यांनी माहिती घेतली. भाविकांना दर्शनासाठी येताना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे, परिसराचा विकास आणि धार्मिक पर्यटनाला चालना देणे या विषयांवर उपस्थितांमध्ये चर्चा झाली. दर्शनानंतर सुळे यांनी उपस्थित कार्यकर्त्यांशी संवाद साधला.

### अहिल्यानगरच्या सुनील पावले यांना 'विश्वकर्मा पुरस्कार' जाहीर

अहिल्यानगर (स.गांवकरी):- विश्वकर्मा सोशल वेलफेअर फौंडेशन ट्रस्ट, पुणे यांच्या वतीने दरवर्षी दिला जाणारा मानाचा 'विश्वकर्मा पुरस्कार' यंदा अहिल्यानगरचे समाज भूषण श्री. सुनील अविनाश पावले यांना जाहीर



फौंडेशन गेली ... कार्यरत असून विद्यार्थी गु... पुरस्कार, वृक्षारोपण, रक्तदान ...वेत आहे. त्याचाच एक भाग ...द्धीपासून दूर राहून उल्लेखनी... करणाऱ्या व्यक्तिमत्त्वांना हा पु... येते.

श्री. पावले यां... शासकीय सेवा बजावली असून काव्य लेखन, कथा लेखन असे छंद जोपासत पुरस्कारही प्राप्त केले आहेत. शासकीय संस्था, सहकारी पतसंस्था तसेच जिव्हाळा प्रतिष्ठानसारख्या सामाजिक संस्थांचे प्रतिनिधित्व करीत त्यांनी सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांच्या या योगदानाची दखल घेऊन पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

हा पुरस्कार सोहळा व विद्यार्थी गुणगौरव समारंभ दि. ६ सप्टेंबर २०२६ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्यात त्यांना सन्म ानपूर्वक पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

संस्थापक विश्वस्त विवेकानंद पांडुरंग सुतार यांनी ही माहिती दिली आहे.

### कालकथीत मोहनराव गाडे यांचे प्रतिमेचे आंबेडकर भवन येथे अनावरण



**पाथर्डी (समर्थ गांवकरी)**

वंचित बहुजन आघाडीचे राज्य उपाध्यक्ष किसनराव चव्हाण यांच्या हस्ते कालकतीत ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक मोहनराव गाडेभाऊ तसेच भगवान महावीर, एपीजे अब्दुल कलाम आणि लोकशाहीर वामनदादा कर्डक यांच्या प्रतिमेचे अनावरण मोठ्या उत्साह पूर्ण वातावरणात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन येथे पार पडले. याप्रसंगी अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना प्रा. किसन चव्हाण म्हणाले की, जो व्यक्ती समाजासाठी काम करतो त्याला समाज डोक्यावर घेतो आणि त्याचे नाव अजरामर करतो. द्वेष भावना सोडून समाजाने एकत्र आले पाहिजे, विचारांची बैठक केली पाहिजे, त्यातून समाजाची प्रगती होते. आपले कर्म चांगले असतील तर त्याचे चांगले फळ मिळते. आज कालकथीत मोहनराव गाडेभाऊ यांचा फोटो सभागृहात लागल्यामुळे संपूर्ण समाजाला आनंद झाला आहे, असेही प्रा. किसन चव्हाण म्हणाले.

# पावसाने पाठ फिरवताच शेवगावात शेतकऱ्यांवर संकट! पिकं करपली, आता जनावरं जगवायची कशी

- ९९ टक्के क्षेत्रावर खरीप पेरणी
- पावसाअभावी सोयाबीन-कपाशीला फटका
- विहिरी, तलाव कोरडे; शेतकऱ्यांची मदतीची मागणी

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

शेवगाव तालुक्यात यंदाच्याखरीपहंगामावर पावसाचा मोठा परिणाम झाला आहे. जून अखेरपर्यंत पावसाने शेतकऱ्यांना चांगली साथ दिली. त्यामुळेच त्यांनी पेरण्या केल्या. त्यानंतर मात्र पावसाने बराच काळ पाठ फिरवल्याने शेतातील पिके अडचणीत आली आहेत. शेतामध्ये जमिनीला भेग्या पडू लागल्या, तसेच विहिर आणि तलाव देखील कोरडे पडू लागेल

'शेतकऱ्यांची आशा मावळताना'

तालुक्यात खरीप पिकांसाठी सुमारे ६५ हजार ११७ हेक्टर क्षेत्र निश्चित करण्यात आले होते. यापैंकी जवळपास ९९ टक्के क्षेत्रावर पेरणी झाली. सोयाबीन, कपाशी, बाजरी, मका, तूर, मूग आणि उडीद अशी विविध पिके शेतात उभी राहिली. सुरुवातीला पिकांची स्थिती चांगली असल्याने शेतकऱ्यांना यंदाचा हंगाम समाधानकारक जाईल, अशी अपेक्षा होती. मात्र पावसाने दडी मारल्याने ही आशा आता मावळताना दिसत आहे.

'सरकारने तातडीने मदत करावी'

सोयाबीनची पाने सुकू लागली असून कपाशीच्या वाढीवर देखील परिणाम दिसून लागला आहे.बाजरीआणि मक्याची पिके पाण्याअभावी वाकू लागली आहेत. तुरीसह चारा पिकांनाही मोठा फटका बसला आहे. काही शेतांमध्ये पीक वाचवण्यासाठी पाणी देण्याची गरज आहे; पण त्यासाठी आवश्यक पाणीच उपलब्ध नसल्याची परिस्थिती आहे.

शेतकरी गोवर्धन वाघमारे यांच्याकडे साडेतीन एकर शेती आहे. त्यांनी सोयाबीन, कपाशी आणि चारा पिकांची लागवड केली. बियाणे, खत, औषध, मशागत आणि मजुरीसाठी खर्च केल्यानंतर आता पिके वाचवण्याचे आव्हान त्यांच्यासमोर आहे. पाऊस न झाल्याने मोठे नुकसान होण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली असून सरकारने तातडीने मदत करावी, अशी मागणी केली आहे.

'बाजारपेठेवरही परिणाम'

महादेव गोलार यांची पाच एकर शेती आहे. त्यांच्या शेतात बाजरी, कपाशी, ऊस आणि चाऱ्याची पिके आहेत. मात्र पावसाअभावी चारा पिकेही संकटात आली आहेत. त्यामुळे शेतातील नुकसानाबरोबरच जनावरांना खाऊ घालायचे कसे, हा प्रश्न त्यांच्या कुटुंबासमोर उभा राहिला आहे. पिकांचे नुकसान झाले की त्याचा परिणाम थेट शेतकऱ्याच्या घरावर होतो. उत्पन्न घटते, कर्जाची चिंता वाढते आणि पुढील हंगामासाठी पैसे उभे करणे कठीण होते. त्यामुळे सध्याची परिस्थिती केवळ शेतीपुरती मर्यादित नसून गावातील बाजारपेठेवरही त्याचा परिणाम होण्याची शक्यता आहे.

१ सप्टेंबर रोजी आंदोलन

शेतकऱ्यांकडून आता केवळ आश्वासनांऐवजी प्रत्यक्ष मदतीची मागणी होत आहे. नुकसानग्रस्त पिकांचे पंचनामे, नुकसानभरपाई, जनावरांसाठी चारा आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था याबाबत तातडीने निर्णय घेण्याची गरज आहे. दरम्यान, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष दत्तात्रय फुंदे यांनीही शासनाने परिस्थितीची दखल न घेतल्यास १ सप्टेंबर रोजी आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

आज शेवगावच्या शेतकऱ्यांसाठी आभाळाकडे पाहण्याशिवाय दुसरा पर्याय उरलेला नाही. पाऊस कधी येईल याची खात्री नाही आणि हातातील पीक दिवसेंदिवस सुकत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांसाठी हा प्रश्न आता केवळ पावसाचा राहिलेला नसून शेती, जनावरे आणि कुटुंबाचा संसार कसा टिकवायचा, याचा झाला.

# पोंदेवाडी येथील शेतकरी मयूर रोडे यांच्या कांदा वखारीतून चोरट्यांनी केल्या ३० पिशव्या लंपास

**मंचर (समर्थ गांवकरी)**



पोंदेवाडी (ता. आंबेगाव) येथील शेतकरी मयूर आनंदराव रोडे यांच्या कांदा वखारीतून शनिवार दि.२९ रोजी पहाटे चोरट्यांनी २५ ते ३० पिशव्या कांदा लंपास केला.या चोरीत रोडे यांचे अंदाजे ५० ते ६० हजार रुपयांचे नुकसान झाले आहे.

शेतकरी मयूर रोडे यांची कांदा वखार काठापूर-पोंदेवाडी शिवेवर डिंभे उजवा कालव्यालगत असून, परिसरात मनुष्यवस्ती नाही.त्यामुळे रात्रीच्या वेळी चोरी झाल्यास तातडीने कोणाच्याही लक्षात येत नाही. याचाच फायदा घेत चोरट्यांनी चोरी केली असावी, असा अंदाज आहे.कांदा बराखीचा दरवाजा तोडून कांदा चोरून नेल्याचे दिसून आले. पारगाव कारखाना पोलिस ठाण्यात शनिवारी सायंकाळी घटनेची तक्रार दाखल करण्यात आली आहे.सध्या एका पिशवीला सुमारे दोन हजार रुपये बाजारभाव मिळत असल्याने शेतकरी धास्तावले आहेत.त्यामुळे एकांतातील वखारीतील कांदा लवकर विक्री करण्याकडे शेतकऱ्यांचा कल वाढला आहे.

कांद्याला चांगला बाजारभाव मिळू लागल्याने घरापासून दूर असलेल्या कांदा वखारींमधून चोरीच्या घटना वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे.कांद्याला चांगला भाव मिळत असल्याने वखारी सुरक्षित ठेवणे गरजेचे आहे. पोलिसांनी रात्रीची गस्त वाढवून शेतकऱ्यांच्या वखारींच्या परिसरात लक्ष द्यावे, जेणेकरून चोरीच्या घटना रोखता येतील. अनिल वाळूंज, माजी सरपंच पोंदेवाडी.

# खंडणीसह दरोड्याच्या गुन्ह्यातील फरार आरोपी अहिल्यानगर येथून जेरबंद; एलसीबीची कारवाई

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**



खंडणी मागून चाकू व गावठी कट्ट्याचा धाक दाखवत सोन्याची चैन जबरीने लुटल्याप्रकरणी फरार असलेल्या मुख्य आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने जेरबंद केले. सुधीर संभाजी शिरसाठ (वय ३०, रा. आसरानगर, पाथर्डी, जि. अहिल्यानगर) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दिनांक १२ ऑगस्ट २०२६ रोजी फिर्यादी राहुल रामराव गर्जे (रा. फुलेनगर, ता. पाथर्डी) हे घरी जात असताना आरोपी सुधीर शिरसाठ व त्याच्या साथीदारांनी त्यांची गाडी अडवली.

आरोपींनी फिर्यादीकडे अडीच लाख रुपयांची खंडणी मागितली. तसेच फिर्यादीच्या गळ्याला चाकू लावून व गावठी कट्ट्याचा धाक दाखवत त्यांच्या गळ्यातील सोन्याची चैन जबरीने काढून घेतली. या घटनेप्रकरणी पाथर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्हा दाखल झाल्यानंतर आरोपी फरार झाले होते.

आरोपींच्या शोधासाठी पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या सूचनेनुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी पोलीस उपनिरीक्षक संदीप दरवडे तसेच पोलीस अंमलदार विष्णू भागवत, सोमनाथ झांबरे, अशोक लिपणे, फुरकान शेख, किशोर शिरसाठ व आजिनाथ पाखरे यांचे पथक नियुक्त केले.

दरम्यान, २९ ऑगस्ट रोजी मुख्य आरोपी सुधीर शिरसाठ हा अहिल्यानगर येथील हॉटेल संगम येथे असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी शिरसाठला ताब्यात घेतले. त्याला पुढील तपासासाठी पाथर्डी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

# भद्रामारुती येथे तिसऱ्या श्रावणी शनिवारी लाखो भाविकांची गर्दी

## विविध फळांची सजावट ठरली भाविकांचे आकर्षण

**नेवासा (समर्थ गांवकरी)**

छत्रपती संभाजीनगर जिल्हयातील खुलताबाद (रत्नपूर )येथीलजागृत व लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या तीर्थक्षेत्र भद्रामारुती येथे तिसऱ्या श्रावणी शनिवारी लाखो भाविकांनी पवनपुत्र हनुमान की जय बजरंग बली की जयजय श्रीराम चा जयघोष करत भद्रा मारुतीरायाचे दर्शन घेतले.तिसऱ्या श्रावणी शनिवारीभद्रामारुतीरायाला विविध फळांची सजावट करण्यात आली होती





श्रावणातील तिसऱ्या श्रावणी शनिवारी पहाटेच्या सुमारास भद्रा मारुती देवतेला वेदमंत्राच्या जयघोषात अभिषेक घालण्यात आला.ब्रह्मवृंद मंडळींनी शास्त्रोक्त पद्धतीने पूजन केले.यावेळी छत्रपती संभाजीनगरचे माजी खासदार वभद्रामारुती संस्थानचे विश्वस्त चंद्रकांत खैरे, संस्थानचे सचिव मंत्री अतुल सावे,अध्यक्ष मिठूभाऊ बारगळ,उपाध्यक्ष बाबासाहेब बारगळ,कार्याध्यक्ष किशोर अग्रवाल, विश्वस्त कचरू पाटील बारगळ,भूषण अग्रवाल, खंडेराव बारगळ,संस्थानचे सुरक्षा व जनसंपर्क अधिकारी राजेंद्र जोंधळे,अर्थ कमिटीचे सदस्य योगेश अवचट,रमेश कर्पे उपस्थित होते.

मध्यरात्री रात्री १२ वाजता भाविकांना दर्शन सुरू करण्यात आले. भाविकांच्या सेवेसाठी आरोग्य सेवा, रुग्णवाहिका सेवा,पिण्याचे स्वच्छ पाणी व्यवस्था भद्राम ारुती मंदिर देवस्थानच्या वतीने करण्यात आली होती. पहाटे पासूनच भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी झाल्याने मंदिर प्रांगण भक्तांच्या गर्दीने फुलून गेले होते.

बेलपिंपळगाव येथील जनसेवा सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष आकाश बागुल यांच्या मार्गदर्शनाखाली सुमारे ३५ पोलीस जनसेवा पोलीस मित्रांनी चोख बंदोबस्तासाठी मोलाची भूमिका बजावली

आलेल्या सर्व भाविकांचेभद्रामारुती देवस्थानचे सुरक्षा अधिकारी राजेंद्र जोंधळे यांनी स्वागत केले. भाविकांना रांगेत दर्शन घेता यावे म्हणून पोलीस स्टेशन, होमगार्ड,पोलीस मित्र संघटनेच्या कर्मचाऱ्यांनी उत्कृष्ट कामगिरी केली.प्रभू रामचंद्र की जय पवन पुत्र हनुमान की जय च्या गजराने मंदिर परिसरातील वातावरण भक्तिमय बनले होते.

# मोहटेश्वर मंदिराचे लोकार्पण संपन्न

## मोहटागाव व परिसराचा विकासासाठी देवस्थान समिती प्रयत्नशील राहणार : धर्मदाय उपआयुक्त नवनाथ जगताप

**पाथर्डी (समर्थ गांवकरी)**



तालुक्यातील श्रीक्षेत्र मोहटादेवी देवस्थान समितीच्या वतीने मोहटे गावातील जुने मोहटे येथे नव्याने उभारण्यात आलेल्या श्री महादेव मंदिराचा लोकार्पण सोहळा तसेच श्री शिवलिंग व नंदी देवता प्राणप्रतिष्ठा सोहळा रविवारी दि.३० ऑगस्ट २०२६ रोजी मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात पार पडला.

यावेळी बोलताना श्री क्षेत्र मोहटादेवी देवस्थान समितीचे अध्यक्ष तथा अहिल्यानगरचे धर्मदाय उपआयुक्त नवनाथ जगताप म्हणाले की, मोहटे गावाच्या सर्वांगीण विकासासाठी देवस्थान समितीच्या वतीने आवश्यक ते प्रयत्न करण्यात येतील. गावातील मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देणे, पाण्याची व्यवस्था करणे, जलसंधारणाची कामे हाती घेणे तसेच राज्य शासनाच्या विविध योजना गावात प्रभावीपणे राबविण्यासाठी आपण प्रयत्नशील राहू, अशी ग्वाही त्यांनी दिली. श्री महादेव मंदिर लोकार्पण व प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त सकाळी गावातून सुवासिनी पारंपरिक पद्धतीने कलश मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीत महिलांचा मोठा सहभाग होता.

मंदिर उभारणीसाठी जागा दान स्वरुपात दिल्याबद्दल श्रीमती राधाबाई दहिफळे व श्रीमती सविता दहिफळे यांचा श्री मोहटादेवी देवस्थान समितीच्या वतीने सन्मान करण्यात आला. श्रीक्षेत्र ओंकारेश्वर येथून श्री नर्मदेश्वर शिवलिंग व नंदी मूर्ती मोहटे येथील माजी सैनिक ईश्वर आश्रूबा दहिफळे दिली. त्यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे पौराहित्य वेदशात्र संपन्न नारायण देवा सुलाखे खोकरमोहकर , सच्चीतानंद देशपांडे, भूषण साकरे, रविदेवा जोशी यांनी भक्तिमय वातावरणात मंत्रोच्चार व धार्मिक विधी संपन्न झाला. श्री शिवलिंग व नंदी देवतेची विधिवत प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. त्यानंतर श्री महादेव मंदिराचा लोकार्पण सोहळा मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला.

# 'घरसभा' म्हणजे कुटुंबासोबत घराला पवित्र मंदिर बनविण्याचा संकल्प : पूज्य श्रीजीकीर्तन स्वामी!

## श्रावण मासानिमित्त अकोल्यात बीएपीएस संस्थेचा संत सत्संग सोहळा; घरसभेतून कुटुंबात प्रेम, संस्कार आणि आनंद वाढतो!

**अकोले (समर्थ गांवकरी)**

अकोले : बोचासणवासी अक्षर पुरुषोत्तम स्वामिनारायण संस्थेच्या (बीएपीएस) वतीने श्रावण मासानिमि त्त देवठाण रोडवरील विठ्ठल लॉन्स येथे संत सत्संग सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. यावेळी प्रमुख संत पूज्य श्रीजीकीर्तन स्वामी यांनी 'घरसभा' या विषयावर मार्गदर्शन करताना, घरसभा म्हणजे कुटुंबियांसमवेत जीवनात सकारात्मक बदल घडवून आनंद निर्माण करण्याचा प्रसाद असून, घराला पवित्र मंदिर बनविण्याची प्रक्रिया आहे, असे प्रतिपादन केले.

पूज्य श्रीजीकीर्तन स्वामी म्हणाले की, प्रत्येक कुटुंबाने दिवसातून एकदा ठराविक वेळ काढून भ्रमणध्वनी, दूरदर्शन व इतर साधने बाजूला ठेवून एकत्र बसावे. दैनंदिन जीवनातील अडचणी, प्रश्न यावर प्रेमाने व सकारात्मक पद्धतीने चर्चा करावी आणि भगवंताचे स्मरण करावे. घरसभा दररोज २० ते ३० मि निटांची असावी. तिची सुरुवात प्रार्थना, धून किंवा कीर्तनाने करून धार्मिक व प्रेरणादायी वाचन, विचारमंथन करावे. घरसभेत एकमेकांना रागावणे किंवा दोष देणे टाळून प्रेमाने संवाद साधावा. यामुळे पती-पत्नीमधील गैरसमज दूर होतात, मुलांचा हट्टीपणा व राग कमी होतो, तसेच मुले आई-वडिलांशी मनमोकळेपणाने संवाद साधू लागतात. मुलांमध्ये संस्कार रुजवायचे असतील तर पालकांनी त्यांच्यासाठी वेळ दिलाच पाहिजे, असेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाची सुरुवात बीएपीएस प्रार्थना व कौटुंबिक हिंदी नाटिकेने झाली. प्रास्ताविक पूज्य योगी केशवबाबा चौधरी वीरगावकर यांनी केले, तर स्वागताध्यक्ष आमदार डॉ. किरण लहामटे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. यावेळी अगस्ति साखर कारखान्याचे अध्यक्ष सिताराम गायकर, अगस्ति देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष ॲड. के. डी. धुमाळ, रूंभोडी येथील दत्तवाडी महानुभाव पंथाचे धर्मगुरू अंकोनेलकर, नाशिक येथील कोषाध्यक्ष तथा कोठारी संत पूज्य महाव्रत स्वामी, पूज्य गौरवमुनि स्वामी, पूज्य अमरनिलय स्वामी यांच्यासह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. अगस्ति विद्यालयापासून विठ्ठल लॉन्सपर्यंत स्वामिनारायण व हरिनामाच्या जयघोषात संतांची अश्वरथातून शोभायात्रा काढण्यात आली. पूज्य योगी केशवबाबा चौधरी वीरगावकर यांनी जीवन क्षणभंगुर आहे. प्रत्येकाने देव, देश, स्वधर्म आणि स्वकर्म या चार गोष्टी जपल्या पाहिजेत. देवाचे स्मरण, देशाची सेवा, स्वधर्माचे पालन आणि स्वकर्मातील प्रामाणिकपणा हाच आनंदाचा मार्ग आहे. हे विचार घरसभेच्या माध्यमातून घराघरात रुजले पाहिजेत, असे सांगितले. आमदार डॉ. किरण लहामटे म्हणाले की, बीएपीएसने जगभर स्वामिनारायण मंदिरांची उभारणी करून संस्कार व अध्यात्माचा संदेश दिला आहे. क्षणभंगुर जीवनात कुटुंबातील प्रत्येक सदस्याने सुखी व आनंदी जीवन जगावे, यासाठी 'घरसभा' हा अत्यंत उपयुक्त उपक्रम आहे, असे त्यांनी नमूद केले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे - ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : अ-१, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# मुलांच्या आधारचे बायोमेट्रिक अपडेट वेळेत करा; पालकांनी विशेष दक्षता घ्यावी

## ५ व १५ वर्षे पूर्ण झाल्यानंतर Mandatory Biometric Update (MBU) आवश्यक; शासकीय योजना, शिष्यवृत्ती व शैक्षणिक सुविधांमध्ये अडचणी टाळण्याचे आवाहन

ठाणे (समर्थ गांवकरी)

मुलांचे आधार कार्ड विविध शैक्षणिक, शासकीय तसेच अन्य आवश्यक कामांसाठी मोठ्या प्रमाणावर वापरले जात असल्याने त्यामधील माहिती अद्ययावत ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे. विशेषतः मुलाचे वय ५ वर्षे आणि १५ वर्षे पूर्ण झाल्यानंतर आधारमधील बायोमेट्रिक माहिती अद्ययावत करणे आवश्यक आहे. या प्रक्रियेला चरपवरीॅ इळोशीीळल णविरींश (MBU) असे म्हटले जाते. त्यामुळे पालकांनी आपल्या पाल्याचे आधार बायोमेट्रिक अपडेट झाले आहे की नाही, याची खात्री करून घेऊन आवश्यकतेनुसार अधिकृत आधार केंद्रावर जाऊन ही प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हा परिषद, ठाणेच्या वतीने करण्यात येत आहे.

लहान मुलांसाठी आधार क्रमांक हा शाळेतील नोंदणी, शिष्यवृत्ती, विविध शासकीय योजना तसेच इतर शैक्षणिक व प्रशासकीय सुविधांसाठी महत्त्वाचा ठरतो. त्यामुळे मुलांचे आधार कार्ड केवळ काढणेच नव्हे, तर त्यातील आवश्यक माहिती वेळोवेळी अद्ययावत ठेवणेही तितकेच आवश्यक आहे.

५ व १५ वर्षांच्या मुलांसाठी बायोमेट्रिक अपडेट महत्त्वाचे

मुलाचे वय ५ वर्षे पूर्ण झाल्यानंतर पहिले Mandatory Biometric Update करणे आवश्यक असते. त्यानंतर मुलाचे वय १५ वर्षे पूर्ण झाल्यावर पुन्हा बायोमेट्रिक माहिती अद्ययावत करावी लागते. मुलांच्या वाढत्या वयानुसार त्यांच्या बायोमेट्रिक माहितीमध्ये बदल होत असल्याने आधार नोंदणीतील माहिती अद्ययावत ठेवण्याच्या दृष्टीने हे अपडेट महत्त्वाचे आहे.

या प्रक्रियेमध्ये आवश्यकतेनुसार मुलांचे बोटांचे ठसे, डोळ्यांच्या बुबुळांचे स्कॅन तसेच नवीन छायाचित्र यांसारखी बायोमेट्रिक माहिती आधार नोंदणीमध्ये अद्ययावत केली जाते.

MBU न केल्यास विविध सेवांमध्ये अडचणी येण्याची शक्यता

आधारचा वापर शासकीय योजना, शिष्यवृत्ती, शैक्षणिक सुविधा तसेच विविध सेवांसाठी होत असल्याने आधारमधील माहिती अद्ययावत असणे आवश्यक आहे. बायोमेट्रिक अपडेट प्रलंबित राहिल्यास आधारशी संबंधित काही सेवांचा लाभ घेताना अडचणी निर्माण होण्याची शक्यता असते.

त्यामुळे पालकांनी आपल्या पाल्याचे आधार बायोमेट्रिक अपडेट झाले आहे की नाही, याची वेळोवेळी तपासणी करावी. चइण प्रलंबित असल्यास जवळच्या अधिकृत आधार नोंदणी अथवा अपडेट केंद्रावर जाऊन आवश्यक प्रक्रिया पूर्ण करावी.

शैक्षणिक व शासकीय योजनांच्या लाभासाठी आधार महत्त्वाचा

शाळेतील विद्यार्थ्यांची नोंदणी, शिष्यवृत्ती, विविध शैक्षणिक सुविधा तसेच शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेताना आधार क्रमांकाचा वापर केला जातो. त्यामुळे मुलांच्या आधारशी संबंधित माहिती अचूक व अद्ययावत असणे आवश्यक आहे.

आधारमधील माहिती अद्ययावत नसल्यास काही प्रक्रियांमध्ये अडथळे येण्याची शक्यता असल्याने पालकांनी चइण प्रक्रियेकडे दुर्लक्ष करू नये. विशेषतः शालेय विद्यार्थ्यांच्या बाबतीत पालकांनी आपल्या पाल्याच्या आधारची स्थिती तपासून आवश्यक ती कार्यवाही वेळेत पूर्ण करावी.

अधिकृत आधार केंद्रावरच अपडेट प्रक्रिया पूर्ण करावी

Mandatory Biometric Update करण्यासाठी पालकांनी आपल्या पाल्याला घेऊन अधिकृत आधार नोंदणी किंवा अपडेट केंद्रावर जावे. तेथे आवश्यक बायोमेट्रिक माहिती, छायाचित्र आणि संबंधित नोंदी अद्ययावत करून प्रक्रिया पूर्ण करावी.

प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर मिळणारी पावती पालकांनी जतन करून ठेवावी. आधार अपडेटची प्रक्रिया पूर्ण झाली आहे की नाही, याची खात्री करण्यासाठी उपलब्ध अधिकृत माध्यमातून आधारची स्थिती तपासावी.

पालकांनी मुलांच्या आधारची स्थिती वेळोवेळी तपासावी

पालकांनी आपल्या मुलाच्या आधारमध्ये चइण प्रलंबित आहे का, याची माहिती अधिकृत आधार सेवेद्वारे तपासावी. चइण आवश्यक असल्यास विलंब न करता प्रक्रिया पूर्ण करावी. मुलाच्या आधारची स्थिती तपासल्यानंतर आवश्यकतेनुसार बायोमेट्रिक अपडेट करून आधारशी संबंधित सेवा सुरळीत ठेवण्यास मदत होईल.

जिल्ह्यातील पालकांनी आपल्या पाल्यांच्या आधारमधील बायोमेट्रिक माहिती वेळेत अद्ययावत करून घ्यावी आणि शैक्षणिक तसेच शासकीय योजनांच्या लाभासाठी आवश्यक असलेली कागदपत्रे व नोंदी अद्ययावत ठेवाव्यात, असे आवाहन जिल्हा परिषद, ठाणे यांच्या वतीने करण्यात येत आहे.

मुलाचे वय ५ आणि १५ वर्षे पूर्ण झाल्यानंतर आधारचे Mandatory Biometric Update वेळेत करून घेणे ही पालकांची महत्त्वाची जबाबदारी आहे. आधारचा वापर शैक्षणिक, शिष्यवृत्ती आणि विविध शासकीय योजनांसाठी होत असल्याने पालकांनी आपल्या पाल्याच्या आधारची स्थिती तपासून आवश्यक अपडेट वेळेत पूर्ण करावे, असे आवाहन जिल्हा परिषद, ठाणेच्या वतीने करण्यात आले आहे.

**पालकांसाठी महत्त्वाच्या सूचना**

मुलाचे वय ५ वर्षे पूर्ण झाल्यानंतर चइण करून घ्यावे.

मुलाचे वय १५ वर्षे पूर्ण झाल्यानंतर पुन्हा चइण करून घ्यावे.

आधारमधील बायोमेट्रिक व संबंधित माहिती अद्ययावत आहे की नाही, याची खात्री करावी.

MBU आवश्यक असल्यास मुलाला घेऊन अधिकृत आधार केंद्रावर जावे.

अपडेट प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर मिळालेली पावती जतन करावी.

शिष्यवृत्ती, शाळेतील नोंदणी व शासकीय योजनांसाठी आधारची माहिती अद्ययावत ठेवावी.

आधारशी संबंधित कोणतीही प्रक्रिया अनधिकृत व्यक्ती किंवा अनधिकृत केंद्रामार्फत करू नये.

# थोडक्यात पण महत्त्वाचे

## बाबुजी आव्हाड महाविद्यालयामध्ये रक्तदान शिबिर संपन्न



पाथर्डी (समर्थ गांवकरी)

येथील बाबुजी आव्हाड महाविद्यालयात पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष तथा पाथर्डी नगरपालिकेचे नगराध्यक्ष मा .अभय आव्हाड यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून उपजिल्हा रुग्णालय पाथर्डी व नित्यसेवा ब्लड सेंटर , श्रीरामपूर,राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना विभाग बाबूजी आव्हाड महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या शिबिरामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक व राष्ट्रीय छात्र सेनेचे छात्र यांनी सहभाग घेऊन रक्तदान केले. या शिबिराचे उद्घाटन मा. ऍड सुरेशराव आव्हाड यांच्या शुभहस्ते संपन्न झाले.

या शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी अध्यक्ष अभय आव्हाड, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बबन चौरे,याप्रसंगी उपजिल्हा रुग्णालय पाथर्डीचे मा.संदीप कांबळे मा.रवी भोईटे उपस्थित होते.

यावेळी मा.अँड सुरेशराव आव्हाड यांनी रक्तदान केल्यामुळे एखाद्या व्यक्तीचे प्राण वाचविले जाते. त्यामुळे प्रत्येक महाविद्यालयीन विद्यार्थ्यांने रक्तदान करावे असे आवाहन केले.

## मंदिर परिसर स्वच्छतेसाठी अवसरी खुर्द ग्रामपंचायतीचा पुढाकार

### ६० कचरापेट्यांचे वाटप



मंचर (समर्थ गांवकरी)

आंबेगाव तालुक्यातील अवसरी खुर्द गावातील मंदिर परिसर स्वच्छ व सुंदर राहावा,तसेच निर्माण होणाऱ्या कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावली जावी, यासाठी अवसरी खुर्द ग्रामपंचायतीच्या वतीने गावठाणासह वाड्या–वस्त्यांवरील विविध मंदिरांना एकूण ६० कचरापेट्यांचे वाटप करण्यात आले.पुणे जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील यांच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात आला.अशी माहिती सरपंच प्रसाद कराळे यांनी दिली.

मंदिरांच्या सभामंडपासाठी ३० मोठ्या, तर मंदिराच्या गाभाऱ्यासाठी ३० छोट्या कचरापेट्या पंचायत समितीचे सदस्य निलेश टेमकर यांच्या हस्ते वितरित करण्यात आल्या.यावेळी पंचायत समितीचे माजी उपसभापती संतोष भोर, भीमाशंकर साखर कारखान्याचे संचालक आनंदराव शिंदे,श्री काळभैरवनाथ देवस्थान ट्रस्टचे संचालक शांताराम अभंग, तंटामुक्त गाव समितीचे अध्यक्ष वसंतराव शिंदे, सोसायटीचे संचालक देविदास शिंदे, राजू राठोड आणि ग्रामविकास अधिकारी जगन्नाथ शिदोरे उपस्थित होते.गावातील श्री काळभैरवनाथ मंदिर, पेशवेकालीन गणेश मंदिर, रानुबाई माता मंदिर, दत्त मंदिर, नवतरुण गणेश मंदिर, श्री स्वामी समर्थ मंदिर, देवीआई मंदिर, कराळेवाडी श्री गणेश मंदिर, सटवाई माता मंदिर, पंधराबिघा भवानी माता मंदिर, शिंदेमळा वेताळेश्वर मंदिर, कानिफनाथ मंदिर, भोरवाडी कमलजादेवी मंदिर, वायळमळा सत्यदेव महाराज मंदिर यांसह अन्य मंदिरांना या कचरापेट्या देण्यात आल्या.नागरिकांनी तसेच देवदर्शनासाठी येणाऱ्या भाविकांनी प्लॅस्टिक व अन्य कचरा परिसरात न टाकता कचरापेटीतच टाकून मंदिर परिसर स्वच्छ ठेवावा, असे आवाहन सरपंच प्रसाद कराळे यांनी केले.

## मंचर येथील धर्मवीर संभाजी पतसंस्थेची वार्षिक सभा रविवारी

मंचर (समर्थ गांवकरी)

मंचर ता.आंबेगाव येथील धर्मवीर संभाजी नागरी सहकारी पतसंस्थेच्या २६ व्या अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे आयोजन रविवार, दि.३० रोजी सकाळी १० वाजता गणराज मंगल कार्यालय, मंचर येथे करण्यात आले आहे. संस्थेला १ कोटी २५ लाख ८०१ रुपये निव्वळ नफा झाला. संस्थेचे अध्यक्ष सिताराम मथाजी लोंढे यांच्या अध्यक्षतेखाली वार्षिक सभा होणार आहे.अशी माहिती संस्थेचे उपाध्यक्ष मंगेश बाणखेले यांनी दिली. ३१ मार्च २०२६ अखेर संस्थेची सभासद संख्या ५ हजार ४९३ असून वसूल भागभांडवल ४ कोटी ८१ लाख ९६ हजार ७०० रुपये आहे.संस्थेच्या ठेवी ७७ कोटी २८ लाख १७ हजार ३४७ रुपये, कर्ज ६३ कोटी ११ लाख ७७ हजार ८८४ रुपये, तर गुंतवणूक ३० कोटी २१ लाख ७६ हजार ८६६ रुपये आहे. संस्थेचा स्वनिधी १४ कोटी ५० लाख ६० हजार ६१९ रुपये असून खेळते भांडवल ९७ कोटी ६५ लाख ६५ हजार ४२९ रुपये आहे.संस्थेला १ कोटी २५ लाख ८०१ रुपये निव्वळ नफा झाला असून सभासदांना १२ टक्के लाभांश देण्यात येणार आहे. तसेच संस्थेला सतत ऑडिट वर्ग अ प्राप्त झाला आहे. सर्व सभासदांनी सभेस वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शेवाळे यांनी केले आहे.

# हिंगोली पोलिस दलात खळबळ!

## रेल्वेसमोर उडी मारून पोलिस उपनिरीक्षकाची आत्महत्या केल्याची माहिती; अमोल गंगलवाड यांचा मृत्यू

हिंगोली (समर्थ गांवकरी)

■ दोन महिन्यांपूर्वी परभणीतून हिंगोलीत बदली; पोलिस नियंत्रण कक्षात होते कार्यरत

■ मृत्यूचे कारण अद्याप अस्पष्ट; पोलिसांकडून तपास सुरू

जिल्हा पोलिस दलाला शनिवारी (२९ ऑगस्ट) सकाळी दु:खद धक्का बसला. पोलिस नियंत्रण कक्षात कार्यरत असलेले पोलिस उपनिरीक्षक अमोल गंगलवाड (वय ५०) यांचा रेल्वे मार्गावर मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. प्राथमिक माहितीनुसार, त्यांनी धावत्या रेल्वेसमोर उडी मारून आत्महत्या केल्याची माहिती समोर येत आहे. या घटनेमुळे पोलिस दलात खळबळ उडाली असून सहकाऱ्यांकडून हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शनिवारी सकाळी साडेआठ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. घटनेची माहिती रेल्वे लोकोपायलटकडून हिंगोली रेल्वे स्थानकाच्या स्टेशन मास्तरांना देण्यात आली. त्यानंतर हिंगोली शहर पोलिसांना याबाबत माहिती देण्यात आली.

घटनेची माहिती मिळताच पोलिस अधीक्षक श्रेणिक लोढा, अतिरिक्त पोलिस अधीक्षक कमलेश मीना यांच्यासह वरिष्ठ पोलिस अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी आवश्यक पंचनामा करून मृतदेह ताब्यात घेतला असून पुढील वैद्यकीय प्रक्रिया करण्यात आली.

अमोल गंगलवाड यांची सुमारे दोन महिन्यांपूर्वी परभणी पोलिस दलातून हिंगोली जिल्हा पोलिस दलात बदली झाली होती. ते हिंगोली पोलिस नियंत्रण कक्षात कार्यरत होते. मनमिळाऊ आणि कर्तव्यनिष्ठ अधिकारी म्हणून त्यांची सहकाऱ्यांमध्ये ओळख असल्याचे सांगण्यात येते.

दरम्यान, त्यांनी आत्महत्या का केली, याचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. घटनास्थळी कोणतीही सुसाइड नोट आढळून आली नसल्याची प्राथमिक माहिती आहे.

# ‘युक्ती २.०’ स्टार्टअप आयडियाथॉनला उत्स्फूर्त प्रतिसाद; ७६ संघांचा सहभाग




जुन्नर (समर्थ गांवकरी)

समर्थ रुरल एज्युकेशन इन्स्टिट्यूट संचलित समर्थ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट,बेल्हे येथील कॉम्प्युटर विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ‘युक्ती २.०’ स्टार्टअप आयडियाथॉनला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या स्पर्धेत तब्बल ७६ संघांनी सहभाग नोंदवत विद्यार्थ्यांच्या नवकल्पकता,तंत्रज्ञानविषयक दृष्टिकोन आणि उद्योजकीय क्षमतेचे दर्शन घडविले.

विद्यार्थ्यांच्या अभिनव संकल्प नां व्यासपीठ उपलब्ध करून देणे,त्यांच्यातील उद्योजकीय कौशल्यांना चालना देणे तसेच सामाजिक व औद्योगिक समस्यांवर नाविन्यपूर्ण उपाय शोधण्यासाठी प्रोत्साहन देणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता.प्रत्येक संघात १ ते ४ विद्यार्थ्यांचा समावेश होता.

या कार्यक्रमासाठी संस्थेचे विश्वस्त वल्लभ शेळके सावित्रीबाई फुले पुणे विद्या पीठाचे विज्ञान विभागाचे सह– अधिष्ठाता डॉ.पंडित शेळके प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.नवनाथ नरवडे व प्रशासकीय अधिकारी प्रा. प्रदीप गाडेकर उपस्थित होते. स्वप्नील पवार,स्वप्नील फुल सुंदर आणि जयेश नायर यांनी परीक्षक म्हणून काम पाहत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. स्पर्धेत विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रांतील नाविन्यपूर्ण, कल्पक आणि भविष्यवेधी स्टार्टअप संकल्पना सादर केल्या.समस्या निराकरणाची क्षमता,नाविन्यता, व्यवहार्यता आणि प्रभावी सादरीकरण या विविध निकषांच्या आधारे संकल्पनांचे परीक्षण करण्यात आले.उत्कृष्ट कामगिरी करणा ऱ्या संघांना प्रोत्साहन देण्या साठी प्रथम क्रमांकास ₹३,००० रोख पारितोषिक व सन्मानचिन्ह,द्वितीय क्रमांका स ₹२,००० व सन्मानचिन्ह, तर तृतीय क्रमांकास ₹१,००० व सन्मानचिन्ह देण्यात आले. तसेच सर्व सहभागी विद्यार्थ्यां ना प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. ‘युक्ती २.०’ ही केवळ स्पर्धा न ठरता विद्यार्थ्यांच्या कल्पनेपासून कृतीकडे आणि कृतीपासून स्टार्टअप कडे घेऊन जाणारा प्रेरणा दायी प्रवास ठरला.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना स्टार्टअप क्षेत्रातील संधी, व्यवसायाच्या मूलभूत संकल्पना, नवकल्पनांना व्यावसायिक स्वरूप देण्याची दिशा मिळाली.

# पुष्पावती विद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा

जुन्नर (समर्थ गांवकरी)



ग्रामविकास मंडळ, ओतूर संचलित पुष्पावती विद्यालय,डिंगोरे येथे राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा करण्यात आला कार्यक्रमाच्या प्रारंभी मुख्याध्यापक शरद माळवे यांच्या हस्ते हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी विद्यालयातील विद्यार्थिनी माया पालवे व स्वरा नलावडे यांनी मेजर ध्यानचंद यांच्या जीवनकार्याची तसेच क्रीडा क्षेत्रातील योगदानाची माहिती विद्यार्थ्यांना दिली.

मेजर ध्यानचंद यांना ‘हॉकीचे जादूगार’ म्हणून ओळखले जाते.त्यांनी १९२८, १९३२ आणि १९३६ या तीन ऑलिंपिक स्पर्धांमध्ये भारता चे प्रतिनिधित्व करत सलग तीन सुवर्णपदके मिळविण्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले त्यांच्या असामान्य कामगिरी बद्दल भारत सरकारने त्यांना पद्मभूषण सन्मानाने गौरविले. त्यांच्या जयंतीनिमित्त २९ ऑगस्ट हा दिवस देशभर राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून साजरा केला जातो.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी भारतीय क्रीडा क्षेत्रातील नामवंत खेळाडूंच्या कामगिरी चीही माहिती दिली बॅडमिंटन पटू चिराग शेट्टी,पी. व्ही.सिंधू, नेमबाज मनू भाकर,भाला फेकपटू नीरज चोप्रा, ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेता अभिनव बिंद्रा व पॅरा आलिम्पिक सुवर्णपदक विजेती अवनी लेखरा यांच्या क्रीडा काम गिरीविषयी विद्यार्थ्यांनी माहिती दिली.

यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना,खेळ म्हणजे केवळ पदक मिळवणे नाही;खेळ म्हणजे जीवन जगण्याची शाळा आहे.मैदान आपल्याला शिस्त,संघभावना,पराभव स्वीकारण्याची ताकद आणि पुन्हा नव्या जोमाने उभे राहण्याची प्रेरणा देते,असा संदेश देण्यात आला.आजच्या डिजिटल युगात मोबाईल, टीव्ही व संगणकाच्या स्क्रीन समोर वाढणारा वेळ लक्षात घेता विद्यार्थ्यांनी दररोज काही वेळ मैदानी खेळांसाठी द्यावा. कबड्डी,खो–खो,धावणे,लांब उडी,उंच उडी,क्रिकेट, फुटबॉल आदी खेळांमध्ये मनापासून सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले.

# मंचर येथील आवटे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी पोलीस व आरोग्य कर्मचाऱ्यांसोबत रक्षाबंधन सण साजरा केला

मंचर (समर्थ गांवकरी)




मंचर ता.आंबेगाव येथील अण्णासाहेब आवटे महाविद्यालयातील इतिहास विभागातील कार्यरत हेरिटेज क्लब आणि संस्थात्मक सामाजिक जबाबदारी व विस्तार कार्य विभाग यांच्या वतीने मंचर पोलीस ठाणे तसेच शासकीय उपजिल्हा रुग्णालय येथे रक्षाबंधनाचा सामाजिक उपक्रम उत्साहात पार पडला.

महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनींनी पोलीस अधिकारी, कर्मचारी तसेच रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी व परिचारकांना राखी बांधून रक्षाबंधनाच्या शुभेच्छा दिल्या.इतिहास विभागाच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपणारे विविध उपक्रम भविष्यातही राबविण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. नंतर मंचर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक महादेव वाघमोडे यांनी विद्यार्थ्यांशी हितगुज साधले.प्राचार्य डॉ. एन. एस. गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली इतिहास विभागप्रमुख प्रा. रविंद्र पारधी तसेच प्रा. राहुल सरोदे यांच्या पुढाकारातून हा उपक्रम यशस्वीपणे पार पडला.समितीचे सदस्य प्रा. मोनाली टेमकर, प्रा. अविनाश बर्डे प्रा. सचिन पारधी यांचे विशेष सहकार्य लाभले.

# ठाणे जिल्ह्यात फ्रेमवर्क फॉर फर्टीलायझर सेल प द्वारे खत विक्री सुरळीत सुरू

ठाणे (समर्थ गांवकरी)

केंद्र शासनाच्या ’फ्रेमवर्क फॉर फर्टीलायझर सेल’ (FFS) पद्वारे ठाणे जिल्ह्यामध्ये २७ ऑगस्ट पासून खत विक्रीची प्रक्रिया सुरळीतपणे सुरू झाली आहे. या नवीन खत विक्री प्रणालीमुळे शेतकऱ्यांना घरबसल्या आवश्यक खताचे बुकिंग करता येणार असून बुकिंग नंतर मिळणारा क्यू आर कोड निवडलेल्या कृषी सेवा केंद्रावर दाखवून खत खरेदी करता येणार आहे.

खत विक्री आणि वितरण प्रक्रियेत पारदर्शकता आणणे शेतकऱ्यांना गरजेनुसार खत उपलब्ध करून देणे तसेच संपूर्ण वितरण व्यवस्थेचे प्रभावी व्यवस्थापन करणे हा या नवीन एफ एफ एस प्रणालीचा मुख्य उद्देश आहे. या नवीन प्रणालीमुळे शेतकऱ्यांचा अनावश्यक वेळ तसेच त्रास कमी होणार आहे व आर्थिक बचतही होणार आहे.

महाराष्ट्र राज्यामध्ये २७ ऑगस्ट रोजी ठाणे सह सात जिल्ह्यामध्ये या प्रणालीचा शुभारंभ करण्यात आला.

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्री रामेश्वर पाचे यांनी टोकावडे येथील विशे अग्रो सेंटर व कृषी विकास अधिकारी श्री मुनिर बाचोटीकर यांनी पोगेरे अग्रो सेंटर बरडपाडा या ठिकाणी स्वतः उपस्थित राहून शेतकऱ्यांना याबाबत मार्गदर्शन करून क्यू आर कोड तयार करून घेतले व या प्रणालीचा शुभारंभ केला.

ठाणे जिल्ह्यामध्ये या नवीन प्रणालीच्या बाबत सर्व निविष्ठा विक्रेते, क्षेत्रीय स्तरावरील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना जिल्हास्तरीय मास्टर ट्रेनर्सच्या माध्यमातून प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. तसेच ग्रामसभा व इतर ग्रामस्थरीय कार्यक्रमांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना या प बाबत प्रचार प्रसिद्धी केलेली आहे. शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणी साठी तालुकास्तरीय व जिल्हास्तरीय हेल्प डेस्क ची निर्मिती केली असून त्याचे मोबाईल क्रमांक प्रसिद्ध करण्यात आले आहेत. फ्रेमवर्क फोर फर्टीलायझर सेल हे प प्ले स्टोअर वरती उपलब्ध असून शेतकऱ्यांनी ते प डाऊनलोड करून यामध्ये सर्वप्रथम ग्री स्टॅक आयडी तसेच आधारच्या माध्यमातून रजिस्ट्रेशन करावे. त्यानंतर आपल्या जमिनीची व पिकांची माहिती सत्यापित करावी. ऍग्री




स्टॅक आयडी च्या माध्यमातून लॉगिन केल्यानंतर जमिनीची माहिती आपोआप येते.परंतु आधारच्या माध्यमातून लॉगिन केल्यानंतर ती स्वतः भरावी लागते. त्यानंतर आपल्या आवश्यकतेनुसार गट निवडून आवश्यक असणाऱ्या खतासाठी अर्ज करावा. खत उपलब्ध असणाऱ्या निविष्ठा विक्रेत्यांच्या यादीमधून आपल्याला सोयीचा विक्रेता निवडावा. तयार झालेला क्यूआर कोडची मुदत तीन दिवस असेल. पुन्हा खरेदी करण्यासाठी नवीन तयार करावा लागेल. खत खरेदी विक्रीसाठी अत्यंत सोयीचे असे हे प असून सर्व शेतकऱ्यांनी पच्या माध्यमातून खत बुक करून खरेदी करावी असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.